# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९७ |
| वर्ष | : | पहिलें |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष पहिले / अंक ८ / फेब्रुवारी १९९७

## संपादकीय
### ऐ मेरे वतनके लोगो...

*ऐ मेरे वतनके लोगो जरा आँखमें भर लो पानी ।*
*जो शहीद हुए है उनकी जरा याद करो कुरबानी ॥*

सुप्रसिद्ध पार्श्वगायिका लता मंगेशकर यांनी गायलेले गीत भारतीय प्रजाजनांकरिता दूरदर्शनवरून हल्ली वारंवार ऐकविले जाते. आजच्या आपल्या स्वातंत्र्याची किंमत पूर्वीच्या पिढ्यांनी दिली आहे याची जाणीव अशा गीतामधून लोकांना दिली जाते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे...' हा लोकमान्य टिळकांचा संदेश भारतीयांना सुपरिचित आहे. स्वराज्याकरता स्वातंत्र्य हवे हा सिद्धांत ओघानेच येतो. आणि हे स्वातंत्र्य आणायचे म्हणजे नक्की काय करायचे याचा, स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत आपण निर्माण केलेल्या आजच्या परिस्थितीमुळे पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. आजच्या जगात 'मानवी स्वातंत्र्या'ला 'मानवी अधिकार' असा पर्यायी शब्दही प्रचलित होत आहे. उच्चारस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, जगायचे स्वातंत्र्य, मरायचेस्वातंत्र्य... सर्वच मानवी व्यवहार 'स्वातंत्र्या'च्या जन्मसिद्ध अधिकाराने व्यापले जात आहेत. या स्वातंत्र्यविचाराने सर्व 'बुद्धिवंत', 'विचारवंत' झिंगून गेले आहेत. यामुळेच, स्वातंत्र्याची 'किंमत' द्यायला लागते याची जाणीव किंवा संवेदना बधिर होत आहे. स्वातंत्र्य, अधिकार यांच्या 'भोळसट' संकल्पना जबाबदारी आणि पात्रतेचा संकोच करतात. असे स्वातंत्र्य स्वैराचाराचे रूप घेते. अशा स्वैराचारी स्वातंत्र्यामुळे अभिरुचिहीन बेजबाबदार लिखाण, कला आणि मूल्ये निर्माण होतात. समाज अधिक स्वैराचारी, चंगळवादी, भोगवादी होऊ लागतो, आणि शेवटी तो आपले स्वातंत्र्यच गमावून बसतो.

काही घटनांचे वास्तव बदलत नसले तरी त्यांचे संदर्भ फार लांबले तर कुठेतरी काहीतरी चुकत आहे एवढी जाणीव तरी समाजाला होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य मिळवायला जशी किंमत द्यावी लागते तशीच ते टिकवायलाही द्यावी लागते. स्वतंत्र समाजाचे नेतृत्व सतर्क, दूरदर्शी आणि विवेकी नसेल तर त्या कमतरतेची किंमत लोकांना द्यावी लागते. स्वातंत्र्य मिळाल्यापासून अवघ्या १५ वर्षांत १९६२ मध्ये चीनने आपल्यावर आक्रमण केले. आपल्या सीमेचे रक्षण आपण करू शकलो नाही व फार मोठा भूभाग चीनने पादाक्रांत केला. आजपर्यंत आपला गेलेला भूभाग आपण परत मिळवू शकलेलो नाही. जनता दुबळ्यांची स्वप्ने जगण्यापेक्षा मर्दांचा जुलूमही सहन करते, अशी इतिहासाची साक्ष आहे. भारतावर चीनने आक्रमण केल्यावर आपले तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या एका जाहीर सभेत लताबाईंनी हे गाणे गायले होते. पं. नेहरूंच्या डोळ्यांत या गाण्यामुळे अश्रू उभे राहिले असे काव्यमय वर्णन तेव्हापासून आपण ऐकत आलो आहोत. खरे म्हणजे देशाच्या या नामुश्कीला जे अव्यवहार्य, स्वप्नाळू आणि अदूरदर्शी धोरण जबाबदार होते त्याचे शिल्पकार स्वत: पं. नेहरूच होते. गीतकाराने हे गाणे लोकांनी हळवे, हतबल होऊन रडण्याकरता लिहिले नव्हते, तर काही घटनांचे संदर्भ देऊन, लोकांच्या

डोळ्यात अंजन घालून दृष्टी साफ करण्याचा तो एक प्रयत्न होता. मरगळ झटका, चुका ओळखा आणि राष्ट्रनिर्मितीच्या कामाला लागा हा संदेश त्या गीतात होता. ३५ वर्षांनंतर आजही हेच गाणे जनतेला जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी ऐकवावे लागते, यासारखी दुर्दैवाची दुसरी गोष्ट नाही. सवलतग्रस्त, लाचार आणि निस्तेज समाज दुबळेपणाने रडतो. अशा समाजातून निर्माण झालेले नेतृत्वही ढोंगी आणि भ्रष्ट असते.

समाजाने त्याग आणि सेवा करायची, आणि पुढाऱ्यांनी मात्र सत्तेची ऊब उपभोगून सवलतींचा मेवा खायचा. केंद्र आणि राज्य शासनातील अनेक सत्ताधाऱ्यांच्या सत्तेच्या गैरवापराचे नमुने आज लोकांसमोर येत आहेत ते याबाबत बोलके आहेत. जबाबदारीच्या जाणिवेशिवाय मिळालेले अधिकार जनतेच्या 'स्वातंत्र्या'ला काय किंमत द्यायला लावतात, याचे या घटना म्हणजे उत्कृष्ट उदाहरण आहे. स्वातंत्र्यानंतर पन्नास वर्षांत भारताने काहीच मिळवले नाही असे समजायला नको. जगातल्या सर्वांत भ्रष्ट देशांमध्ये भारताचा नववा क्रमांक लागला! दररोजच्या वर्तमानपत्रांतून राज्यकर्त्यांच्या भ्रष्टाचाराच्या कथा वाचल्या की, हा क्रमांक देण्यातही काही भ्रष्टाचार झाला आहे की काय अशी शंका येऊ लागते. भारतातील ५० टक्के जनता अशिक्षित आहे असे एक कारण याकरता नेहमीच पुढे केले जाते. जणू काही देशातील अशिक्षित मंडळींनी देशाची ही परिस्थिती आज निर्माण केली आहे. वस्तुस्थिती याच्या बरोबर विरुद्ध आहे. पं. नेहरूंपासून देवेगौडांपर्यंत आणि डॉ. राजेंद्रप्रसादांपासून डॉ. शंकर दयाळ शर्मांपर्यंत झालेले भारताचे बहुतेक सर्व पंतप्रधान व राष्ट्राध्यक्ष उच्चशिक्षित होते आणि आहेत. हीच परिस्थिती राज्यपाल व मंत्र्यांच्या बाबतीत आहे. हे सर्व राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री आणि राज्यपाल हेच खरे भारताच्या आजच्या दुर्दशेचे शिल्पकार आहेत. आज सर्वोच्च आणि राज्यातील इतर न्यायालये, या सत्ताधाऱ्यांनी केलेल्या सत्तेचा गैरवापर आणि इतर भ्रष्टाचाराबद्दलची वस्तुस्थिती जनतेसमोर उघड करीत आहेत. याबाबतीत न्यायसंस्थेला साह्य करण्याऐवजी कायद्यातील पळवाटा, तर्कवाद आणि युक्तिवाद यांचा आश्रय ज्या पद्धतीने ही मंडळी घेत आहेत ते उबग आणणारे आहे. निर्दोष माणसाला न्यायालयाचा आधार वाटला पाहिजे. गुन्हेगाराला मात्र कायद्याची भीती वाटते. त्यामुळे तो सर्व ताकदीनिशी कांगावा आणि भ्रमनिर्मितीने न्यायालय व लोक यांची दिशाभूल करीत असतो. पुन्हा 'स्वातंत्र्य' आणि 'मानवी अधिकाराचे' कवच गुन्हेगाराला मिळाले की नागरिकांच्या हिताची व स्वातंत्र्याच्या संकोचाची किंमत समाजालाच द्यावी लागते. या सर्व पुढारी मंडळींनी हे गाणे ऐकणे आज जास्त उपयुक्त ठरणार आहे.

आय.ए. एस. सारख्या स्पर्धात्मक परीक्षांना अशिक्षित लोक बसत नाहीत. भारतामध्ये काही हजारांनी असे आय.ए.एस. नोकरशहा प्रत्यक्ष राज्यकारभार चालवीत आहेत. जिल्हाधिकारी व महापालिका-आयुक्त हे देखील या उच्चविद्याविभूषित गटातीलच असतात. सर्व बँका आणि अनेक महामंडळांचे पदाधिकारी शिक्षितच असतात. सत्ताधाऱ्यांबरोबर या नोकरशहांच्या 'भ्रष्टाचारां'चे नग्न स्वरूप लाजिरवाणे आहे. या सर्व शिक्षित नोकरशहांनी आपले 'स्वातंत्र्य' आणि 'अधिकार' यांची मागितलेली 'किंमत' हाच आजच्या भ्रष्टाचाराचा पाया आहे. आपल्या कारकिर्दीत तोंडाला कुलूप लावलेले हे नोकरशहा निवृत्तीनंतर मात्र पोपटासारखे बोलू लागतात. यांच्यापैकी बरेच जण आजकाल आपली आत्मचरित्रे प्रसिद्ध करीत आहेत. 'तो मी नव्हेच' च्या धर्तीवर मूळ मुद्द्यांना बगल देऊन अनेक सनसनाटी अर्धसत्ये अशा आत्मकथनांमधून आलेली आहेत. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. बहुसंख्य नोकरशहा हे आपल्या वरिष्ठांची मर्जी राखण्यातच अधिक समाधानी दिसून येतात. सत्ताधारी आणि नोकरशहा या सोयीची 'किंमत' परस्पर एकमेकांना देत असतातच. यामुळेच आपले विशेष शिक्षण, राजकीय प्रगल्भता, राष्ट्रीय हित यावर आधारित धोरणरचना किंवा सल्ला देण्याऐवजी, या सर्व गोष्टी धाब्यावर बसवून सत्ताधाऱ्यांना सोयीस्कर असे सल्ले दिले जातात. याकरता, मिळालेल्या शिक्षणाचे सर्व कसब वापरण्यात येते. राष्ट्राच्या सुरक्षिततेचा प्रश्न असला तरी सुद्धा यामध्ये काहीही बदल दिसत नाही. बोफोर्स प्रकरणात जाहीर झालेला घटनाक्रम व व्यक्तिनामे बघितली तर मध्यमबुद्धीच्या माणसालाही जे उमगेल, ते 'सत्य' विशेषबुद्धीचे नोकरशहा, राजकारणी आणि इतर हितसंबंधी यांना दिसत नाही ही आश्चर्यापेक्षा चीड आणणारी गोष्ट आहे. ८०तल्या प्रत्येक घटकाला आपल्या 'स्वातंत्र्याची' 'किंमत' मिळालेली दिसते. देशाला मोजावी लागणारी किंमत मात्र 'न' मोजता येणारी आहे.

(मलपृष्ठ क्र. ३ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक



# दिशा

वर्ष पहिले / अंक ८ / फेब्रुवारी १९९७

संपादक
डॉ. विजय वा. बेडेकर

सहसंपादक
श्री. प्रकाश ल. वैद्य

कार्यकारी संपादक
डॉ. जी. व्ही. कुलकर्णी

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

वार्षिक देणगी
रु. २०० / -

मुद्रक :
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | शिक्षण, साक्षरता व विज्ञान | डॉ. विजय वा. बेडेकर | ५ |
| ४) | अफवा, प्रवाद; सुरचना व गोंधळ | श्री. प्रकाश ल. वैद्य | ११ |
| ५) | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (६) दक्षिण भारतीय शैलीचे देवालय | डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी | २४ |
| ६) | स्मृती : मेंदू संबंध किती ? | श्री. वसंत वि. अकोलकर | ३० |
| ७) | आला संतांचा मेळा | श्री. शं. बा. मठ | ३३ |
| ८) | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३७ |
| ९) | चर्चासत्रे | | ३९ |

# लेखक - परिचय

१. *डॉ. विजय वा. बेडेकर*

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. *प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर*

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधून निवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तवक या पुस्तकाचे लेखक.

३. *श्री. प्रकाश ल. वैद्य*

आय. आय. टी. पवई, मुंबई, येथून बी.टेक (इलेक्ट्रिकल) ही पदवी संपादन, व्यवसाय; इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात सल्लागार, विशेष आवड आणि संशोधन : भाषा आणि संगीत या विषयांत.

४. *श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी*

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

५. *श्री. वसंत वि. अकोलकर*

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६३) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

६. *श्री. शं. बा. मठ*

B.P.T. मधून निवृत्त. संस्कृत घेऊन M.A. धर्म, अध्यात्म या विषयात कार्य आणि लिखाण. संस्कृत नाटकातून कामे. ठाण्यातील कौपनेश्वर मंदिराच्या संदर्भ ग्रंथालय निर्मितीत योगदान.

७. *प्रा. मोहन पाठक*

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुललेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

*अस्मां सखे बधिरलोक निवासभूमौ*
*किं कूजितेन खलु कोकिल कोमलेन।*
*एते हि दैवहतकास्तदभिन्नवर्णं*
*त्वां काकमेव कलयन्ति कलानभिज्ञाः ॥१॥*
*रे रे रासभ वस्त्रभार वहनात् कुग्रासमश्नासि किं*
*राजाश्वावसथं प्रयाहि चणकाभ्यूषान् सुखं भक्षय।*
*सर्वान्पुच्छव तो हया : इति वदन्त्यत्राधिकारे स्थिताः*
*राजा तैरुपदिष्टमेव मनुते सत्यं तटस्थाः परे॥ २॥*

*हे कूप त्वं चिरं जीव स्वल्पतोये बहुल्ययः।*
*गुणवद् रिक्तपात्राणि प्राप्नुवन्ति हि पूर्णताम् ॥ ३॥*
*आश्वास्य पर्वतकुलं तपनोष्णदीप्त*
*मुद्दामदावविधुराणि च काननानि।*
*नानानदी नदशतानि च पूरयित्वा*
*रिक्तो ऽ सि यज्जलद सैव तवोत्तमा श्रीः ॥४॥*

## श्री. मोरेश्वर दि. पराडकर

संस्कृत सुभाषितांत अन्योक्तींचा स्वतंत्र समावेश करावा लागतो, यांचा बहुसंख्य सुभाषितांहून जाणवणारा वेगळेपणा डोळ्यात भरल्यावाचून राहत नाही. अन्य उक्ती म्हणजे प्रस्तुताऐवजी अप्रस्तुताचे वर्णन, म्हणजे साध्या भाषेत द्राविडी प्राणायाम किंवा वेड पांघरून पेडगावला जाण्याचाच प्रकार ! पण हे हेतुपूर्वक केलेले असते. कडू गोळी वरून साखर पेरून पुढे ठेवलेली असते. हुशार सासू सुनेला 'अमुक कर तमुक करू नको' असे प्रत्यक्ष सांगण्यापेक्षा आपल्या मुलीलाच ' अमुक कर तमुक करू नको' असे सांगणे पसंत करते. तसाच प्रकार या चार सुभाषितांत कौशल्याने कसा हाताळला ते बघण्यासारखे आहे.

१) पहिला श्लोक 'कोकिलान्योक्ती ' म्हणजे वरवर कोकिळाला उद्देशून कवीने रचलेला आहे. तो म्हणतो मित्रा, तुझे कूजन मधुर म्हणजे गोड हे खरे, परंतु ते सर्व बधिरनिवासभूमीत म्हणजे बहिऱ्यांच्या वस्तीत अगदी निरुपयोगी ठरणार म्हणूनच येथे 'किं' चा उपयोग कूजितेन या तृतीयान्त शब्दाबरोबर लोकांपुढे करून निरुपयोगित्व स्पष्ट केले. बहिऱ्या लोकांपुढे गाणे म्हणजे अरण्यरुदनच पण एवढ्याने कोकिळा च दैव थांबेल असे नव्हे. कारण हे करंटे बहिरे त्यांना किंमत न कळल्यामुळे बाह्यरूपाकडेच म्हणजे काळ्या रंगाकडे बघून तुला कावळाच समजतील कारण त्यांच्या दृष्टीने तुझा रंग कावळ्यासारखाच (अभिन्नवर्ण) ना ? कोकिला ला उद्देशून म्हणण्याचे कारण उघड आहे. अडाण्यापुढे गुणांचे प्रदर्शन करण्यात काही अर्थ नाही. यावरूनच मराठीत म्हण आली - 'गाढवापुढे गायली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता' अडाणी माणसांच्या गर्दीत असे म्हणण्याची पाळी शहाण्यावर येते म्हणून शहाण्यांनी संभाळून राहणे चांगले.

२) गाढवाचा संदर्भ आला हे चांगलेच झाले; दुसरा श्लोक 'रासभान्योक्ती' चा. गाढव बिचारे कपड्यांचा भार पाठीवर घेऊन दमले होते. त्याला कवीने सल्ला दिला वस्त्रांचा म्हणजे कपडयांचा भार सतत वाहून कुग्रास म्हणजे कदन्न कशाला खातोस ? हे टाळण्याचा उपाय आहे. तो म्हणजे तू सरळ राजाच्या अश्वशाळेत (अश्व + आवसथ) म्हणजे पागेतच जा आणि त्या घोड्यांत मिसळून जा, म्हणजे कदन्नाऐवजी चणक म्हणजे गरम गरम चणे आणि तेही चांगले तोंडभर (अभ्यूष= चुलीत मावणारे) खायला मिळतील. असे कसे होईल हे विचारू नकोस कारण त्या अश्वशाळेवरचे अधिकारी पुच्छ म्हणजे शेपूट असणाऱ्या सर्व प्राण्यांना घोडे असेच समजतात आणि राजासुद्धा त्यांचेच म्हणणे खरे मानतो हे मला माहीत आहे . आता इतर काही सत्य जाणणारे आजूबाजूला असतात परंतु ते 'तटस्थ' म्हणजे गप्प राहणे पसंत करतात. उगीच खरे बोलून राजाच्या अधिकाऱ्यांची आणि राजाची नाराजी ओढवून घेणे त्यांना मानवणारे नसते. दिखाव्यावर भाळून 'टके सेर माजा, टका सेर खाजा' अशी वृत्ती असलेल्यांकडे, राजे/रजवाड्यांकडे आणि त्यांच्या वल्लभांकडे बाह्य डामडौल करणाऱ्यांचे कसे फावते आणि खऱ्या अर्थाने गुणी व्यक्तींची कशी उपेक्षा होते याकडे लक्ष वेधणारी ही अन्योक्ती वस्तुतः चांगलीच तिखट आहे आणि अगदी आजच्या जगातही, अनुभवाला येणारी आहे, हे मान्य करावे लागेल. यावरून अन्योक्ती म्हणजे अप्रस्तुतशंसा किंवा अप्रस्तुताचे कथन

करणेच सोयीचे हेही पटण्यास हरकत नाही.

३) पुढची सूक्ती ही 'कूपान्योक्ती' म्हणजे अप्रस्तुत असणाऱ्या लहान विहिरीला उद्देशून म्हटलेली किंवा लिहिलेली. यात कूपाला संबोधित करून तू चिरंजीव हो अशी इच्छा व्यक्त केली, कारण मुळात तुझ्यात पाणी कमी परंतु तुला पाणी देण्याची म्हणजे लोकांसाठी खर्च करण्याची मोठी हौस. आपला आशय प्रभावीपणाने स्पष्ट करण्यासाठी या सूक्तीच्या दुसऱ्या ओळीत कूपाचे दातृत्व व्यक्त करण्याकरता संस्कृतातल्या श्लोकाचा उपयोग केलेला हा कूप गुणवान् म्हणजे दोरी असलेली रिकामी भांडी (रिक्तपात्राणि) पाण्याने भरून देत असतो. किंबहुना ते त्याचे व्रतच असते. हा झाला कूपाशी संबद्ध असलेला अर्थ. खरा अर्थ आहे थोडे धन असले तरी गुणवान् परंतु रिक्त म्हणजे अकिंचन व्यक्तींना दान करीत राहणाऱ्या उदार व्यक्तीचे हे वर्णन आहे. आणि गुणवन्त परंतु धनहीन व्यक्तींची गरज सर्वार्थाने भागवणारी अशी व्यक्ती फार मोठ्या हुद्द्यावर नसली, जगातल्या श्रीमंत माणसात त्याची गणना होत नसली तरी त्याने विषाद बाळगण्याची जरूर नाही. जल म्हणजे धन कमी असले तरी दोरी असलेली रिकामी भांडी भरून देणारा हा कूप त्या उदार माणसाप्रमाणे अधिक प्रशंसनीय नव्हे का ? गाठीला धन भरपूर परंतु सत्पात्री दान करण्याची प्रवृत्ती जर कमी असेल तर त्याचा उपयोग काय ?

४) किंबहुना सत्पात्री दान करता करता येणारे दारिद्य हि वैभवाहून अधिक मोलाचे हे सांगण्यासाठी पुढची ही 'मेघान्योक्ती.' हा मेघ जलवर्षावाने, प्रखर उन्हाने (तपन) होरपळलेल्या (दीप्तान्) पर्वत समुदायांचा ताप शांत करतो; भयानक (उद्दाम) वणव्याने (दाव) जळलेल्या वनांचा किंवा अरण्यांचा दाह शमवितो. इतकेच नव्हे तर नदीनदांना जलाने दुथडी भरून वाहण्याची संधी देतो आणि मगच स्वतः पूर्ण रिकामा होतो. तात्पर्य, मेघ हा ' जे का रंजले गांजले' त्यांना उन्मुक्तपणे मदत देण्यासाठी आपले सर्वस्व देतो; 'रवितापतप्त गिरिकुला'ला आश्वासन देतो, व देऊनच न थांबता दावानलाने होरपळलेल्या रानांना सुखाचा स्पर्श देतो आणि उन्हाळ्यात आटलेल्या नदीनदांना नवी गती प्रदान करतो. अर्थात या सर्व गोष्टी करताना त्याला आपल्या जवळचे सर्व धन म्हणजे पाणी देऊन टाकून रिकामे व्हावे लागते हे खरे, परंतु कवीच्या मताप्रमाणे हेच त्या मेघाचे खरे वैभव. 'काननानि', 'नानानदीशतानि' ही बहुवचने 'पर्वतकुलं' या एकवचनानंतर येतात हेही लक्षात ठेवण्यासारखे. तसे पाहिले तर पर्वतांचे कूळ किंवा समूह हे व्याकरणदृष्ट्या एकवचन असले तरी आशयाच्या दृष्टीने बहुवचनच आहे. किंबहुना अशी सुरवात करून रंजलेले आणि गांजलेले यांच्या समूहाला आश्वासन देणारा मेघ हा खऱ्या अर्थाने 'बहुजनहिताय' स्वेच्छेने दारिद्य पतकरायला तयार झालेल्या उदारधी व्यक्तीचा प्रतिनिधी आहे. आणि तो आपले व्रत अकिंचनत्वाची परवा न करता इतर आपत्तीनी होरपळलेल्या आणि धीर खचलेल्या (विधुर) व्यक्तींना मदत करतो, इतकेच नव्हे तर ज्यांच्याजवळचा धनाचा साठा आटलेला आहे अशा व्यक्तींना आपल्या बहुमोल मदतीमुळे पुन्हा दुथडीने भरून वाहण्यास म्हणजेच पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यास मदत करतो आणि मग स्वतः मात्र अकिंचन होऊन बसतो. हे स्वेच्छेने पतकरलेले व दातृत्वामुळेच निर्माण झालेले दारिद्य हे वैभवाहून थोर, हे कवीचे म्हणणे औचित्यपूर्णच आहे. ही अन्योक्ती वाचीत असताना कविकुलगुरु कालिदासाने रंगवलेल्या, 'सर्वस्वदक्षिण' नावाचा यज्ञ करून प्रजेला सर्व संपत्ती वाटून टाकणाऱ्या रघुवंशीय रघुराजाची आठवण होते आणि त्याला वरतन्तुशिष्य कौत्साचे स्वागत करण्याच्या वेळी मातीच्या भांड्यांचा वापर करावा लागतो, परंतु यामुळे वरतन्तूने त्याची प्रशंसा करतांना 'स्थाने भवानेकनराधिपः सत्नकिंचनत्वं मखजं व्यनक्ति' असे म्हटले ते योग्यच वाटते. असे असले तरी त्या रघुराजाचे वैभव थोर याची प्रचीती पुढे प्रत्यक्ष कुबेराने त्याच्यावर केलेल्या धनवृष्टीच्या कालिदासवर्णित कथेवरून येते.

•••

# शिक्षण, साक्षरता व विज्ञान

डॉ. विजय वा. बेडेकर

आज जगात अस्तित्वात असलेल्या देशांची विभागणी सर्वसाधारपणे ३ समूहांत केली जाते.

१) प्रगत (developed)

२) प्रगतीच्या मार्गावर (developing) आणि

३) अप्रगत (underdeveloped)

पश्चिम युरोपमधील बहुतेक देश, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया खंडातील जपान यांचा प्रगत देशांमध्ये प्रामुख्याने समावेश होतो. भारत, मलेशिया, इंडोनेशिया इ. आशिया खंडातील देश, ब्राझील, अर्जेंटिना इ. लॅटिन अमेरिकेतील देश व आफ्रिका खंडातील काही देश यांचा 'प्रगतीच्या मार्गावरील' देशांमध्ये समावेश होतो. अफगाणिस्थान, मंगोलिया इ. आशिया खंडातील, सुदान, इथियोपिया इ. आफ्रिका खंडातील व अनेक लॅटिन अमेरिकन देशांचा 'अप्रगत' राष्ट्रांमध्ये समावेश होतो. ही विभागणी देशादेशांची पैशांतील कमीअधिक श्रीमंती लक्षात घेऊन केलेली आहे. पण ती फसवी आणि म्हणूनच चुकीची आहे. एकूणच प्रगत-अप्रगत या स्थितीचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. खोट्या श्रीमंतीच्या मागे लागून फायद्यापेक्षा तोटा होण्याचीच शक्यता अधिक !

प्रगती म्हणजे काय? आणि तिचे निर्देशांक कोणते? 'प्रगती' म्हणजे काय ? व तिचे निकष कोणते? आज तरी या प्रगतीच्या मोजमापाची फूटपट्टी व निर्देशांक हे प्रगत राष्ट्रांच्या समूहात असलेल्या देशांच्या आर्थिक, वैज्ञानिक, सामाजिक, तांत्रिक, व शैक्षणिक वस्तुस्थितीला आणि शैक्षणिक संस्था, विचार आणि परिभाषा यांना मार्गदर्शक तत्त्वे मानून, आपल्या आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणीत आहेत. 'प्रगत' राष्ट्रांची प्रगती सांगणारे हे निर्देशांक फसवे व मानवी विकासाचे एकांगी चित्रण करणारे आहेत. 'प्रगत' राष्ट्रांमधील 'प्रमुख राष्ट्र' म्हणून आपण अमेरिकेचे उदाहरण घेऊ या. एकीकडे विलक्षण तांत्रिक व भौतिक प्रगतीचा आलेख तेथे दिसत असतानाच दुसरीकडे मानवी मूल्यांचा आणि मानवामानवामधील संबंधाच्या जाणिवांचा संपूर्णतया ऱ्हास झालेला आपल्याला दिसतो. व्यक्तिस्वातंत्र्याच्या आवाजवी आणि स्वप्नाळू संकल्पनेमुळे अमेरिकेत जवळ जवळ प्रत्येकाचे जीवन व सर्वच सामाजिक संस्थांचे स्वातंत्र्य आज धोक्यात आलेले दिसते. अल्पवयीन मुलामुलींवर आपल्याच पालकांकडून होणारे लैंगिक हल्ले; समलिंगी संभोगाला प्रमाणाबाहेर मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा आणि त्यातून उद्‌भवलेला एड्‌ससारखा महाभयंकर रोग, एकंदरीत लैंगिक स्वैराचारामुळे कुटुंबसंस्था, विवाहसंस्था यांची लागलेली वाट आणि त्यामुळे या संबंधांतून निर्माण झालेल्या पिढीचे व्यसनी औषधांचे आणि मादक द्रव्यांचे प्रमाणाबाहेर सेवन, या सर्व आघाड्यांवरसुद्धा अमेरिका राष्ट्र आघाडीवर आहे. स्वच्छता व सकस अन्न यांच्या उपलब्धतेचे निर्देशांक जसे अधिक आहेत, त्याचबरोबर गरजेपेक्षा जास्त अन्न खाल्ल्यामुळे, अन्ननिर्मिती वाढविताना वापरल्या गेलेल्या रासायनिक द्रव्यांच्या विपरीत परिणामामुळे, अपघात आणि बिघडलेल्या मानसिक असंतुलनामुळे शरीराच्या सर्व प्रकारच्या अवयवांचे कर्करोग, अल्पवयीन हृद्रोग (heart attacks) व बेसुमार मानसिक तणावांचे रोगी यांचेही प्रमाण तेथे प्रचंड वाढले आहे. म्हणूनच या राष्ट्रांचे हे प्रगतीचे निर्देशांक फसवे आहेत. दर माणशी उत्पन्न (per capita income) दर माणशी पेट्रोलचा, प्लास्टिकचा व इतर सर्वच उपयोगी वस्तूंचा खप (per capita consumption) हे माणसाच्या विवेकापेक्षा त्याच्या अविवेकी उपभोगशीलतेचे निर्देशांक आहेत, प्रगतीचे नाहीत. या अनिर्बंध उपयुक्ततावाद, जडवाद व भोगवादामुळे, विज्ञान, तंत्रज्ञान व प्रगतीच्या नावाखाली मानवाने या पृथ्वीवरील पर्यावरणाचे संतुलनच बिघडवून टाकले आहे. या उपयुक्ततावादी, भोगवादी प्रगतीची व्याप्ती जरी दोनचार राष्ट्रांपुरतीच मर्यादित असली तरी त्यांच्या याच प्रगतीमुळे पर्यावरणामध्ये निर्माण झालेले असंतुलन आणि मानव व

इतर प्राणिमात्र यांच्या स्वास्थ्यावर होत असलेले परिणाम कुठल्याही राष्ट्रांच्या सीमा ओळखत नाहीत. या असंतुलनाचे विपरीत परिणाम मात्र 'प्रगत,' 'प्रगतिपथावरील' आणि 'अप्रगत' राष्ट्रांमधील सर्व माणसांना सारखेच भोगावे लागत आहेत, आणि म्हणूनच 'प्रगती' दर्शविणारे हे जे निर्देशांक आहेत ते मानवाच्या व्यापक परिस्थितीचे प्रतिबिंब देत नाहीत. आजच्या वस्तुस्थितीची सत्यता मान्य करायची तर हे मानवी 'अधोगतीचे' निर्देशांक आहेत. तरीही आपल्याकडील अनेक विचारवंत या निर्देशांकांनाच यशाचे व प्रगतीचे निर्देशांक मानून या मृगजळाच्या मागे धावताना दिसतात. यामुळे साहजिकच दमछाक अधिक; आणि साध्य दृष्टिपथातही नाही.

व्यापक मानवी अंगांचा विचार केला तर अमेरिका हे 'प्रगत' राष्ट्र होऊच शकत नाही. आणि म्हणूनच पश्चिम युरोप काय, अमेरिका काय किंवा इतर तत्सम प्रगत पाश्चात्य राष्ट्रे काय, त्यांच्या 'आर्थिक,' 'सांस्कृतिक,' 'सामाजिक' आणि 'शैक्षणिक संस्था' या आपल्याकडील प्रगतीकरिता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून वापरली जाणे धोक्याचे आहे. स्त्रीमुक्ती या चळवळीचे उदाहरण घ्या. 'स्त्रीचा विकास' हा या चळवळीचा हेतू जाऊन स्त्रीविषयक पाश्चात्य सांस्कृतिक व सामाजिक संकल्पना जेव्हा या चळवळीची मार्गदर्शक तत्त्वे बनू लागल्या त्या वेळेस त्यांतील स्त्रीपण जाऊन 'नोकरीप्रधान', 'पुरुषद्वेषी' बनून कुटुंबसंस्था उद्ध्वस्त करताना आपल्याला या देशात दिसत आहेत. हीच गत अनेक आघाड्यांवर आहे. शिक्षणही त्याला अपवाद नाही.

कालची व आजची 'शिक्षण' संकल्पना आणि 'साक्षरता'

'शिक्षणा'च्या महत्त्वाविषयी दुमत होण्याचे काहीच कारण नाही. आजची शिक्षणपद्धती ही समाधानकारक नाही याबद्दल दुमत असेल असे मला वाटत नाही. या विषयाची व्याप्ती एवढी मोठी आहे की त्याच्या सर्व बाबींवर लिखाण करायचे तर काही खंड लिहावे लागतील. शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा घेणारे, इतर आकडेवारी देणारे, सरकारी धोरणांचा ऊहापोह करणारे बरेच चांगले लिखाण आजही उपलब्ध आहे. पण या सर्व लिखाणामध्ये अपेक्षित असलेली 'शिक्षण' ही संकल्पना व भारतीय विचारधारेमध्ये अभिप्रेत असलेली 'शिक्षणाची' संकल्पना भिन्न आहेत असे मला वाटते. आपण उदाहरण 'साक्षरतेचे' घेऊ या. आपल्या देशामध्ये अतिप्राचीन काळापासून 'शिक्षण' म्हणजे 'ज्ञान', 'अनुभव' वितरण करण्याचे अनेक मार्ग समाजाला उपलब्ध होते. दोन किंवा अधिक व्यक्तींना आपले विचार एकमेकांना सांगता यावेत म्हणून एकमेकांमध्ये संभाषण, चर्चा याचप्रमाणे अर्थवाही अक्षरनिर्मिती करून लिखाणाच्या माध्यमातून या ज्ञानवितरणाचे कार्य आज अनेक शतके होत आहे. परंतु ज्ञान, अनुभव इ. च्या वितरणामध्ये संभाषण, चर्चा आणि अक्षरओळख हे महत्त्वाचे घटक असले तरी व्यापक शिक्षणपद्धती फक्त या दोनच घटकांपुरती सीमित नव्हती. इतर अनेक घटकांचा अक्षरओळखीएवढाच वापर व्यक्तीला शिक्षित करण्याकरिता तितक्याच महत्त्वाने करून घेतला जात असे.

प्रसिद्ध संस्कृत आणि प्राच्यविद्या पंडित श्री. मॅक्समुल्लर यांचे खालील विधान स्पष्ट, आणि प्राचीन भारतातील शिक्षणवितरणपद्धतीच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचे आहे. भारतीय संस्कृतीची जी जाण आणि ओळख मॅक्समुल्लर दाखवतात त्याच्या जवळपासही तत्कालीन आणि आजचे भारतीय सुधारक शिक्षणमहर्षी पोहचू शकत नाहीत.

"There is such a thing as social education and education outside of books: and this education is distinctly higher in India than in any part of Christiandom. Through reciation of ancient stories and legends, through religious songs and passion plays, shows and pageants, through ceremonials and sacraments, through fairs and pilgrimages, the Hindu masses all over India receive a general culture and education which are in no way lower, but positively higher, than the general level of culture and education received through schools and newspapers, or even through the ministration of the Churches in Western Christian lands. It is an education, not in the so called three R's, but in humanity."

प्रत्यक्ष कार्यानुभव, परंपरागत कलांचा कुटुंबसंस्थेमार्फत विकास आणि वितरण, गुरुशिष्य परंपरा, ध्यान, अक्षराव्यतिरिक्त इतर संज्ञा व चिह्ने वापरून ज्ञानाच्या वितरणाची सोय, शुद्ध निरीक्षण, चिंतन इ. अनेक पर्यायांनी शिक्षण मिळवता येत होते, तसेच मिळवलेले ज्ञान याच अन्य मार्गांचा वापर करूनही वितरित करता येत होते. हे ज्ञान देताना विषयाच्या 'माहिती' एवढाच, ती माहिती प्राप्त करून घेणाऱ्या व्यक्तीच्या 'मानवी' गुणांच्या विकासावरही भर देण्यात येत होता. केवळ 'माहितीचे वितरण' वा 'उसनवारी' किंवा 'स्मरणशक्तीची कसोटी' असे त्या शिक्षणाचे स्वरूप नव्हते. म्हणूनच एखादा शिंपी, एखादा चित्रकार, काडीचीही अक्षरओळख नसताना उत्कृष्ट मूर्ती किंवा चित्र स्वतःच्या ज्ञान व कल्पनाशक्तीचा विकासावर, बळावर करू शकत होता. त्याला मिळालेले ज्ञान हे फक्त अक्षरवाङ्मयातून आलेले नसायचे तर त्याच्या कुटुंबाचा व्यवसाय, परिसर व अगदी संस्कारक्षम वयापासून त्याच विषयाशी सातत्याने संपर्क यामधून तो आपले कौशल्य निर्माण करू शकत होता. त्याच्या 'सृजनशीलतेला' त्याला 'अक्षर' ओळख नसल्यामुळे कोठेही बाधा येत नव्हती. अक्षरवाङ्मयाव्यतिरिक्त इतर सर्व ज्ञानाच्या, अनुभवाच्या वितरणसंस्थांमार्फत आपल्या वाढत्या वयाबरोबर तो आपली निरीक्षणशक्ती वाढवत होता आणि कायम शिकत होता. थोडक्यात, ब्रिटिशपूर्व काळात या देशामध्ये 'अक्षर' - ओळख असलेला म्हणजेच 'साक्षर' शिक्षित, आणि अक्षरओळख नसलेला तो निरक्षर, अशी विभागणी झालेली कुठेही दिसत नाही. मग हा अक्षरओळखीचा, चार भिंतीआड, वह्या, पुस्तके यांच्या माध्यमात, शाळा या एकाच वितरणसंस्थेला शिक्षण देता येते, आणि जो या वितरणसंस्थेचा सभासद नाही तो शिक्षणाला, आपली रोजीरोटी मिळवण्याकरिता निरुपयोगी, ही संकल्पना या देशात केव्हा आली ? आजपर्यंत सर्व शिक्षणविषयक लिखाण हे या ठराविक शिक्षणसंकल्पना व त्याच्या एकतर्फी वितरणसंस्था म्हणजे शाळा, महाविद्यालये हा 'एकमेव' पर्याय प्रमाण धरून लिहिले गेले आहे. आणि म्हणूनच या देशातील ५० टक्के जनता 'अशिक्षित' आहे, ७० टक्के स्त्रिया 'अशिक्षित' आहेत, अशी विधाने बेधडकपणे करण्यात येतात. शिक्षणनियोजनाकरिता हीच विधाने प्रमाण मानली जातात. प्रश्न येथेच संपत नाही. जो 'साक्षर' नाही तो 'सुसंस्कृत' नाही असाही सोयिस्कर गैरसमज यातून निर्माण केला जातो. साहजिकच या देशातील बहुसंख्य जनता ही असंस्कृत आहे, असाही निष्कर्ष अनेक विद्वान आपल्या चर्चेतून व लेखनातून काढतात. यामागील पार्श्वभूमी आणि इतिहास बघणेही महत्वाचे आहे.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला म्हणजेच सुमारे १८२० ते १८४० या दरम्यान या देशामध्ये ब्रिटिशांची सत्ता खऱ्या अर्थाने दृढमूल झाली, याचे मुख्य कारण याच कालावधीत ब्रिटिशांनी आपल्याला हव्या असलेल्या उद्देशांचा, जाणिवांचा व संस्कृतीचा समाज निर्माण होईल यानुरूप येथे शिक्षण, महसूल, शेती व न्यायदान इ. चे कायदे व वितरणसंस्था प्रस्थापित केल्या. साहजिकच त्यांची मार्गदर्शक तत्वे व मुखवटा ही संपूर्णतः ते ज्या संस्कृतीचे घटक होते त्या पाश्चात्त्य संस्कृतीनुरूप होत्या. भारतीय समाज, संस्कृती, सामाजिक संस्था, न्यायसंस्था, शिक्षण, धर्म शेती ही सर्व एका वेगळ्या विचारसूत्रामध्ये संस्कृतीमध्येच वावरत होती. साहजिकच हा बदल मूळ भारतीय संस्कृतीला मानवणारा नव्हता. मेकॉलेने प्रस्थापित केलेली शिक्षणपद्धती व वितरणसंस्था ब्रिटिशांना अभिप्रेत असलेल्या हेतूप्रमाणे कमालीची यशस्वी झाली.

मेकॉलेचे स्वतःचे, व प्रसिद्ध प्राच्यविद्या अभ्यासक श्री. फर्कुहर यांचे या संदर्भातील विधान स्पष्ट आहे :

"The famous Minute, which Macaulay wrote in 1835 remained unpublished till 1864. His nephew George Otto Trevelyan first published them in McMillan's Magazine of May, 1864. Macaulay proudly records :

"We are at present a Board for Printing Books which are of less value than the paper on which they are printed on was when it was blank, and for giving artificial encouragements to absurd history, absurd metaphysics, absurd physics, and absurd theology.

"We must do our best to form a class who may be interpreters between us and the millions whom we govern, a class of persons Indian in blood and colour, but English in taste, in opinions, words and intellects."

या नवीन शैक्षणिक धोरणाने कोणते परिणाम झाले त्याचे विश्लेषण करताना फर्कुहर लिहितात -

"The new educational policy of the Government created during these years the modern educated class of India. These are men who think and speak in English habitually, who are proud of their citizenship in the British Empire, who are devoted to English Literature, and whose intellectual life has been almost entirely formed by the thought of the West, large number of them enter governmnet services, while the rest practise law, medicine or teaching or take to journalism or business. We must also note that the powerful excitement which has sufficed to create the religious movements we have to deal with is almost entirely confined to those who have had an English education."

साहजिकच ब्रिटिशांना हे प्रस्थापित करायचे होते की, याआधीची भारतातील शिक्षणपद्धती ही शिक्षणपद्धतीच नव्हती. इंग्रजांचे या देशातील अस्तित्व हे भारतीय जनतेला 'शिक्षित' व 'सुसंस्कृत' करून तिच्या आजच्या 'रानटी' अवस्थेतून बाहेर काढून 'सुसंस्कृत' जगाकडे घेऊन जाईल, हा त्याचा दावा होता. ब्रिटिशांच्या या युक्तिवादाची, तर्कवादाची वकिली करणारे महाभाग (पुरोगामी विचारवंत?) आजही या देशात भरपूर आहेत. (या विषयावरील तपशीलवार माहिती व ऊहापोह मी माझ्या 'British Policies and Indian Culture' या पुस्तकात केला आहे.)

ब्रिटिशांच्या या धोरणांचाच परिणाम म्हणून १९ व्या शतकाच्या सुरुवातीला 'साक्षरता' म्हणजे 'सुसंस्कृतपणा', 'निरक्षरता' म्हणजे 'अशिक्षितपणा' व 'असंस्कृतपणा' अशा प्रकारच्या संकल्पना रूढ होऊ लागल्या. दुर्दैव असे की आजही, भारतात पहिली शाळा १८२० च्या सुमारास निघाली. इ. वर्णने आपण आपल्याच विचारवंतांनी लिहिलेली वाचतो आणि त्यांवर विश्वास ठेवतो. १८३५ सालाच्या आधी व त्याच सुमारास ब्रिटिशांच्याच अधिकाऱ्यांनी उत्तर, मध्य व दक्षिण हिंदुस्थानातील अनेक इलाख्यांमध्ये गोळा केलेल्या माहितीप्रमाणे, भारतात या सर्व ठिकाणी, अगदी खेड्यापाड्यांमध्येसुद्धा 'भारतीय पद्धतीने' 'शिक्षण' देणाऱ्या संस्था कित्येक लाखांनी अस्तित्वात होत्या. अनेकांना आज या गोष्टी विश्वासार्ह वाटणार नाहीत, पण सुदैवाने ते सर्व रिपोर्ट्स अभ्यासाकरिता आजही उपलब्ध आहेत. ब्रिटिशपूर्व काळातील शिक्षणपद्धतीत अक्षरओळख ही महत्त्वाची बाब असली तरी ती माणसाच्या प्रगतीची, संस्कृतीची, त्याच्या सृजनशीलतेची निर्देशक नव्हती. भारतीय समाजाची विभागणी 'साक्षर' आणि 'निरक्षर' अशी केली गेली नव्हती. व्यक्तीच्या वा मनुष्याच्या सुसंस्कृत-असंस्कृतपणाची ओळख तो आपल्या मानवी गुणांचे वा अवगुणांचे, उत्कर्ष किंवा अपकर्षाचे प्रदर्शन कितपत करतो, आपल्या कुटुंबातील व समाजातील इतर व्यक्तींशी कसा वागतो, सामाजिक नीतिमूल्ये तो पाळतो की नाही यावर अवलंबून होती. याउलट आज 'अक्षरओळख' म्हणजेच 'सुसंस्कृतपणा' असा आभास निर्माण करण्यात येत आहे. तो धोकादायक आणि तेवढाच विघातकही आहे. समाजातील सर्व भ्रष्टाचार, अपव्यवहार, फसवणूक ही 'अशिक्षितां' पेक्षा 'शिक्षितां' कडूनच जास्त होताना आज दिसते. पुस्तके 'माहिती' देऊ शकतात पण 'मनुष्य' घडवू शकत नाहीत. वैद्यकीय शिक्षण घेतलेली व्यक्ती शिकलेली असते. ती सर्वथा जाणते की धूम्रपानामुळे फुफ्फुसाचा कर्करोग होऊ शकतो, मद्यसेवनामुळे यकृताचा रोग होऊ शकतो. तरीही यातील अनेक मंडळी धूम्रपान, मद्यपान का करतात? त्यांना मिळालेली वैद्यकीय माहिती त्यांच्या आचरणामध्ये काहीच बदल का घडवून आणू शकत नाही? आजचे वकील, शिक्षक, हिशेब तपासणारे, अनेक सरकारी अधिकारी, नट वा वृत्तपत्रकार यांचे इतके किळसवाणे भ्रष्टाचार आणि व्यभिचाराचे प्रकार आपल्यासमोर रोज येत

आहेत, की कोणाचीही मान शरमेने खाली जाईल. याचा अर्थ एकच आहे की, नुसती 'अक्षरओळख' किंवा 'माहिती' किंवा व्यक्तीचे 'परीक्षेतील यश' हे माणसाच्या 'सुसंस्कृतपणाचे' निर्देशक होऊच शकत नाही. अक्षरशः भावनाशून्य, संवेदनाबधिर समाज शहरांमधून जगताना आज आपण बघतो. याचाच एक परिणाम म्हणजे खूप गाजावाजा करून केरळ राज्य आणि महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हा १००% सुशिक्षित झाल्याचा डांगोरा पिटण्यात येत आहे. यातून असा आभास निर्माण होतो की, येथील जनतेला अक्षरओळख झाल्यामुळे त्यांच्यामध्ये काही गुणात्मक बदल घडून आला आहे. गेल्या काही शतकांत ज्यांना ही अक्षरओळख झाली त्यांच्यामध्ये असा काही गुणात्मक बदल झाल्याची लक्षणे दिसत नाहीत. आज केरळ राज्यात व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण कमी झाले, रोगराई कमी झाली, न्यायालयात खटले कमी झाले, भ्रष्टाचाराची उदाहरणे जवळ जवळ नाहीशी झाली, गरिबांचे शोषण थांबले, अक्षरओळख झाल्यामुळे खेड्यापाड्यामधून चांगल्या पुस्तकांना मागणी वाढली, इतर मानवी संबंधांमध्ये सुधारणा झाली अशा गोष्टींची सुरुवात किंवा या घटनांमध्ये काही 'बदल ' झाल्याचे 'साक्षरतेमुळे' दिसत नाही. फक्त अक्षरओळख ही जर का सुसंस्कृत होण्यास पुरेशी असती तर छापखान्यातील खिळे जुळवणारा किंवा वाचनालयातील ग्रंथपाल हे सर्वात सुसंस्कृत व विद्वान झाले असते.

तेव्हा अक्षरओळख ही गोष्ट महत्वाची जरूर आहे पण 'साक्षरता' म्हणजेच 'सुसंस्कृतपणा' हा विचार आत्मघातक व समाजघातक आहे. शिक्षण या संकल्पनेच्या विरुद्ध आहे. काही सिद्धांतवाद्यांच्या सोयीकरता कदाचित समाजाची ही विभागणी उपयुक्त ठरत असेल, पण खऱ्याखुऱ्या शिक्षणप्रसाराकरता, सामाजिक प्रबोधनाकरता, हा विचार उपयुक्त नाही.

या देशातील अधिकाधिक जनतेला सृजनशील बनवायचे असेल, खऱ्या अर्थाने सुसंस्कृत बनवायचे असेल, तर 'शिक्षण' ला 'अक्षरओळख', 'स्मरणशक्तिपरीक्षा', 'माहितीचे ओझे', 'फळाखडू' या बंदिस्त संकल्पनांतून बाहेर काढून, व्यापक मानवी दृष्टिकोन द्यायला पाहिजे, आणि माणसाला सर्वांगपरिपूर्ण बनवू शकेल या स्तरावर शिक्षण आणून ठेवावे लागेल. म्हणजे, खरे बोला, एकमेकांवर प्रेम करा, हे अक्षरओळखीचे, वर्गातून लिहून शिकवायचे विषय नाहीत; याचे शिक्षण प्रत्यक्ष जीवनाच्या शाळेत, आचरणातून, व्यवहारातून आणि अनुभवाच्या माध्यमातून द्यावयाचे असते. जेव्हा मुलगा/मुलगी आपल्या आईवडिलांना खरे बोलताना बघेल, अनुभवेल, तेव्हा तो/ती ही खरे बोलायला लागेल. त्यामुळे त्याला आलेला दृष्टिकोन तो त्याच्या जीवनाच्या इतर अंगांनाही वापरू लागेल. त्याच्यामध्ये सदसद्विवेकबुद्धी वाढेल व रुजेल. शिक्षणाच्या या व्यापक संकल्पनेनुसार 'शिक्षण' घेण्याकरता, मग फक्त' शाळेचीच' गरज उरणार नाही आणि शाळा पुरणारही नाही. 'शाळे' व्यतिरिक्त आपला बहुतांश आयुष्याचा वेळ तो ज्या आपल्या कुटुंबात, परिसरात व समाजात व्यतीत करीत असतो तेथील घडामोडींमधून, स्वतःच्या अनुभवावरून, मानवी देवाणघेवाणीमधूनही तो 'शिक्षण' मिळवू लागेल. किंबहुना शाळेच्या भिंतींबाहेरील या शिक्षणालाच व्यवहारातही अधिक किंमत आहे. साहजिकच सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून व्यक्तीला मार्गदर्शन करील. अंतर्मुखी चिंतनाला प्रवृत्त करील, तिच्यातील विवेक व प्रज्ञा जागृत करील आणि सदाचार व सद्व्यवहार तिच्यात रुजवेल असा 'मार्गदर्शक' म्हणजे 'शिक्षक' हवा. पोटार्थी, व्यवसायाभिमुख, केवळ आर्थिक प्राप्तीकरिता उद्युक्त झालेली उपाधिधारी शिक्षित व्यक्ती 'शिक्षक' म्हणून हे काम कदापि करू शकणार नाही. ज्या दिवशी आपण असे 'शिक्षक' गमावले आणि त्यांची अवहेलना व टिंगल सुरू केली, त्यांचा 'भौतिक जीवनमूल्यांचा त्याग' व 'निस्वार्थीपणा' हा 'अव्यवहार' ठरवला, त्याच वेळी 'सृजनशील' शिक्षणाचा मूळ मानवी स्रोत आपण गमावून बसलो. प्रज्ञावंत शिक्षकाशिवाय आणि अक्षरांद्वारे मिळवलेल्या माहितीचा 'विवेकी' वापर केल्याशिवाय निव्वळ अक्षरी ज्ञान म्हणजे (आजची) 'साक्षरता' म्हणजेच 'सुसंस्कृत' पणा ही शिक्षणाची संकल्पना, ही शिक्षणाच्या नावाखाली चाललेली घोर फसवणूक आहे. 'साक्षरता', आजच्या 'शाळा आणि शिक्षक' या संकल्पना मूलतः बदलल्याशिवाय खरा सुसंस्कृत साक्षर तयार करणे कठीण आहे. हे समजून घेण्याकरिता माझे वरील विवेचन पुरेसे आहे असे मला वाटते.

### शिक्षण आणि फसवा विज्ञानवाद

या 'साक्षरता' प्रधान शिक्षणाच्या तर्कवाद व युक्तिवादाचाच आणखी एक अविभाज्य भाग म्हणजेच 'विज्ञान' म्हणजेच खरे 'शिक्षण' व प्रगतीची गुरुकिल्ली हा दावा. हा दावाही 'शिक्षण' विरोधी, फसवा आणि घातकच आहे. या विज्ञानभाटांना माहीत असलेले 'विज्ञान' म्हणजे फक्त फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स आणि बायॉलॉजी या शास्त्रांना लागू असलेल्या नियमांद्वारे व निष्कर्षांद्वारेच इतरही 'वस्तु' रूपी नसलेल्या मानवी व्यवहारांचा अभ्यास करावा असा यांचा अवैज्ञानिक दुराग्रह. या शास्त्रांच्या अगदी पराकोटीच्या, काटेकोर माहितीमुळे माणसाच्या 'मानवी' मूल्यांमध्ये काडीचाही फरक पडत नाही. अणुरेणूंचे अंतरंग जाणले, त्यांची सर्व माहिती मिळाली तर मनुष्य कदाचित त्या विशिष्ट शास्त्रांमध्ये माहितगार होऊ शकतो, पण म्हणून तो अधिक 'शिक्षित' झाला, 'सुसंस्कृत' झाला असा कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. आजची सर्व विध्वंसक अण्वस्त्रे, रासायनिक अस्त्रे व जैविक अस्त्रे ही त्या त्या विषयातील सर्वाधिक माहिती असलेल्या व्यक्तींनीच बनवलेली आहेत. यातल्या कित्येक शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिकही मिळालेले आहे. जर का अणूचे अंतरंग जाणून घेणे, त्याचे पदार्थविज्ञानी आणि रासायनिक गुणधर्म जाणून घेणे हे माणसातील पशुत्व कमी करत असते, माणसांच्या मानवी उत्कर्षाला, विकासाला पोषक काय व घातक काय ही जाण देत असते, तर ही माहिती असलेल्या शास्त्रज्ञांनी लाखो निरपराध लोकांची हत्या करणारी अशी विध्वंसक शस्त्रे व अस्त्रे बनवलीच नसती. अत्यंत हिडीस व पराकोटीचे अश्लील चित्रपट, कलेच्या नावाखाली निर्माण झाले नसते. 'लेखन' स्वातंत्र्य व 'अभिव्यक्ति' स्वातंत्र्याच्या नावाखाली शुद्ध चारित्र्यहनन व घोर फसवणूक, खोटारडेपणा, अश्लील लिखाण निर्माण झाले नसते. परंतु 'विज्ञान' म्हणजेच 'प्रगती' ही घोषणा 'विज्ञानाच्या' प्रेमापेक्षा सिद्धांतवाद्यांच्या फायद्याकरिता आज अधिक राबवली जात आहे. त्याचाच एक परिपाक म्हणजे 'विज्ञानवाद' म्हणजेच 'बुद्धिवाद', 'तर्कवाद', 'सुसंस्कृतपणा', 'निःश्रद्धपणा', 'मानवतावाद' हा दावा. विज्ञान हवे तर कुठलीच 'श्रद्धा' नको. विशेषतः 'देव', 'अध्यात्म' इ. वरील विश्वास आणि श्रद्धा म्हणजेच 'अंधश्रद्धा' आणि 'बिनविरोध' नास्तिकवादी, जडवादी, उपयुक्तवादी यांच्या प्रसाराचे व प्रचाराचे हत्यार म्हणून जेव्हा 'विज्ञानाचा' वापर होतो त्या वेळी 'देव' ही संकल्पना आणि सर्व 'श्रद्धा' या नुसत्याच 'अंधश्रद्धा' ठरतात असे नाही तर त्या 'गुन्हा' म्हणूनही ठरवण्यात येतात. खरे म्हणजे विज्ञानाच्या 'सीमा' ठरवण्याचा अधिकार, कुठले विषय 'वैज्ञानिक' व 'अवैज्ञानिक' हे सांगण्याचा अधिकार कुठल्याच 'एका' व्यक्तीचा वा पंथाचा नाही. निष्कर्ष जाहीर करून अभ्यास करतो तो वैज्ञानिकच नाही. वैज्ञानिकाला हवी असते तटस्थता (neutrality) आणि 'तटस्थता' म्हणजे 'निःश्रद्धपणा' नाही. जगातला कुठलाही अव्वल दर्जाचा शास्त्रज्ञ 'श्रद्धे' बद्दल किंवा 'देव' या संकल्पनेबद्दल उगाच वाष्कळ बडबड करीत नाही. न्यूटनसुद्धा नास्तिक नव्हता. आपल्या, शास्त्रीय, वैज्ञानिक सृजनशीलतेकरिता त्याला कुठलाही 'देव' या संकल्पनेपासून दूर जाण्याचा अट्टाहास करावा लागला नाही. 'तर्क' आणि 'भावुकता' या प्रत्येक माणसामध्ये कमीअधिक प्रमाणात अस्तित्वात असतात, हे शास्त्रीय सत्य आहे. कशाचाच अतिरेक होऊ न देणे हा विवेकाचाच भाग आहे. शास्त्राची माहिती मिळवण्याकरिता व अणुरेणूंचे अंतरंग जाणण्याकरिता 'तर्का' एवढीच 'भावुकते' चीही गरज आहे. तेव्हा 'नास्तिवाद्याचे विज्ञानाचे प्रेम' हे आपल्या सिद्धान्ताच्या प्रचाराचे एक 'साधन' आहे. 'शिक्षणप्रेमी' नी हे समाज सुधारण्याचे एक 'व्यासपीठ' म्हणून वापरू नये. अगदी या शतकातील भारतीय गणिती रामानुजन यांनी तर जाहीरपणे कबुली दिलेली आहे, की त्यांच्या सर्व गणिती सूत्रांमध्ये त्यांना 'देवीची' प्रेरणा होती. 'देवी' आहे की नाही हा मुद्दा कदाचित वादाचा होऊ शकेल. पण रामानुजन यांची 'देवी' वरील 'श्रद्धा' त्यांच्या गणिती संशोधनामध्ये तिळमात्र कमतरता आणू शकली नाही. तेव्हा विज्ञानाच्या 'सीमा' म्हणजे 'बुद्धिवाद' नाही. वा फक्त फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स वा बायॉलॉजी म्हणजेच 'विज्ञान' नाही. या देशातील संस्कृती, परंपरा या 'सनातन' आहेत. त्यांनी निर्माण केलेले 'साहित्य', 'कला', 'स्थापत्य', सर्व प्रकारची 'शास्त्रे' ही आज आपल्या समोर कुठल्या ना कुठल्या परिस्थितीत उभी आहेत, आणि त्यांची

(पान क्र. २१ वर)

# अफवा, प्रवाद; सुरचना व गोंधळ

श्री. प्रकाश ल. वैद्य

'कर्करोग व समाजजीवन' या सातव्या लेखात, कर्करोगाच्या प्रक्रियेचा संदर्भ घेऊन कर्करोग व जंतुसंसर्ग यांची तुलना पाहिली. जंतू हे बाह्य शत्रू असतात, पण कर्करोगात, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' याप्रमाणे शरीराच्याच घटकपेशी शरीरक्लेशास व नाशास कारणीभूत होतात. जंतूंविरुद्ध शरीरातील प्रतिकारयंत्रणा (Immune System) युद्ध करते. तसेच प्रतिजीवकांच्या (Antibiotics) साह्यानेही जंतूंना आटोक्यात आणता येते. जंतू हे शरीरपेशींपासून वेगळे ओळखता येत असल्यामुळे पांढऱ्या पेशी त्यांना निवडून टिपू शकतात. तसेच जैवरासायनिक भेदांमुळे प्रतिजीवके शरीरपेशींना अपाय न करता जंतूंना मात्र मारक ठरतात.

कर्करोगपेशी मात्र शरीरपेशींसारख्याच असतात. त्यामुळे पांढऱ्या पेशी त्यांचा प्रतिकार करीत नाहीत, व ही नैसर्गिक प्रतिकारयंत्रणा निष्प्रभ ठरते, आणि शरीर आतल्याआत पोखरले जाऊन कोसळते. तसेच कर्करोगपेशी व निरोगी शरीरपेशी यांच्यात जैवरासायनिक साम्य असल्यामुळे शरीराला अपाय न करता कर्करोगपेशींना घातक ठरतील अशी रसायने वा औषधे शोधणे कठीण जाते. म्हणूनच आरोग्यविषयक सोपे प्रश्न सोडवून मानव त्यांऐवजी कठीण प्रश्नांप्रत येऊन पोचलेला दिसतो.

समाजावरील मानवनिर्मित संकटांत बाह्य व आंतरिक उपद्रव दिसतात. बाह्य उपद्रवांत निर्वासित व्यक्ती व झुंडींपासून सशस्त्र आक्रमणांपर्यंत विविध पातळ्या संभवतात. त्याचप्रमाणे आंतरिक उपद्रवांत आळशी, ऐतखाऊ व्यक्ती, गुन्हेगार व्यक्ती, टोळ्या व संघटना, तसेच बंडखोर, अतिरेकी व तथाकथित क्रांतिकारी संघटना यांपासून यादवी व अराजकापर्यंत विविध शक्यता उद्भवतात. या सर्व तऱ्हेचे उपद्रव आजही आपल्याला जगभर दिसतात. त्यामुळे मानवजात खरोखरच प्रगत झाली आहे की नाही, अशी शंका येते.

भौतिक उपद्रवांचा विचार आपण केला. यांच्याविरुद्ध भौतिक साधनांचा उपयोग करता येतो. चिनी लोकांनी उत्तरेकडून होणारी आक्रमणे थोपविण्यासाठी पिढ्यान्‌पिढ्या कष्ट करून 'चीनची प्रचंड भिंत' बांधली. इंग्लंड हे बेटाच्या रूपात असल्यामुळे व नाविक सामर्थ्यामुळे त्याच्यावर कुणाचे आक्रमण हजारएक वर्षांत झाले नाही. आजही प्रगत देश बाह्य आक्रमणे भौतिक साधने वापरून थोपवितात. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाने जंतुजन्य रोगांवर मात करता येते. यामुळे आपण भयमुक्त व रोगमुक्त झालो असे मानवाला वाटू लागले आहे.

परंतु कर्करोगामुळे रोगमुक्तीच्या बाबतीत भ्रमनिरास झाला आहे. तसेच बाह्य आक्रमणे थांबली, तरी अंतर्गत गुन्हेगारी, व्यसनाधीनता, स्वैराचार, हिंसा यांमुळे समृद्ध देशातील समाजही निश्चिंत व सुखी झालेला नाही. मानवाचे आचरण हे त्याच्या विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे मानवनिर्मित भौतिक आक्रमणे ही विचारांतूनच उगम पावतात. अंतर्गत हासही विचारांमुळेच होतो. कर्करोग हा जरी शारीरिक रोग असला तरी जीवनपद्धती व मानसिकता यांवर तो अवलंबून असतो. म्हणजे त्याबाबतही विचारांशीच संबंध येतो. शिवाय भौतिक कृतीशिवाय केवळ विचारांमुळे व्यक्ती, समाज व संस्कृती यांचा ह्रास होऊ शकतो. त्यामुळे निरामय विचार व वैचारिक रोग यांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

आपण ईश्वराची प्रार्थना करताना 'मला चांगली बुद्धी दे' असे म्हणतो. आपला विचार योग्य असावा, व विवेक सुटू नये अशी आपली इच्छा असते. याउलट 'विनाशकाले विपरीतबुद्धी:' (Those whom the God wants to destroy, he first makes them mad) अशी म्हण आहे. चयामुळे शरीर वाढते व अपचयामुळे नाश पावते. त्याचप्रमाणे विधायक व्यक्ती व समाज यांची प्रगती होते. विज्ञान हे अशा रचनात्मक विधायक विचारांवर

आधारलेले असल्यामुळे विज्ञानाची व विज्ञानामुळे मानवजातीच्या सतत प्रगतीची चढती कमान राहणार असा काही विज्ञानवाद्यांचा भ्रम दिसतो. परंतु विज्ञान हे पूर्ण मानवी जीवनाचे प्रश्न सोडविण्याइतके समर्थ नाही. विविध मानसिक व वैचारिक प्रश्न मानवाला सतावत आले आहेत. यांपैकी अनेक विज्ञान सोडवू शकलेले नाही व कदाचित शकणारही नाही. अशा वैचारिक संकटांचा आपण आता विचार करू. ही संकटे व्यक्ती, संघटना; व विचार, प्रणाली अशा दोन पातळ्यांवर पाहता येतात.

व्यक्ती :

समाजातील व्यक्ती या शरीरातील पेशींप्रमाणे असतात. एकपेशीय जीव स्वैरपणे राहू शकतात, तसेच एकाकी व्यक्ती निर्जन ठिकाणी स्वतःला हवी तशी राहू शकते. परंतु एकपेशीय जीव प्रगत होऊ शकत नाहीत, तसेच एकांड्या व्यक्ती किंवा छोटे मानवसमूह प्रगत झालेले दिसत नाहीत. अनेकपेशीय जीवात पेशी निरनिराळ्या प्रकारच्या असतात. त्यांच्या पेशीगत स्वातंत्र्याला अर्थातच काही मर्यादा पडतात, पण त्याचबरोबर त्यांना एकपेशीय जीवांप्रमाणे जीवनकलहाला तोंड द्यावे लागत नाही. त्यांचे आयुष्य स्वस्थ व दीर्घ असते. याचप्रमाणे संघटित समाजात विविध प्रकारच्या व्यक्ती असतात, व त्या निरनिराळी कार्ये करतात. श्रमविभाजनामुळे प्रत्येकाला स्वतःला विशिष्ट कामच करावे लागते व इतर कामे दुसऱ्यांकडून होतात. अशा समाजरचनेत व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध येतात. सामाजिक वर्तनात काही नियम व संकेत पाळावे लागतात. या नियमप्रणालीमुळेच समाज बांधला जातो व टिकतो.

धर्मः

अशी नियमप्रणाली म्हणजेच 'धर्म' (धारयति इति धर्मः) ही आपल्याकडील धर्माची खरी कल्पना आहे. कुठल्या देवाची पूजा किंवा भक्ती करतात यावरून उपासनापद्धती वा पंथ ठरतो , म्हणजेच पाश्चात्यांचा Religion. पण धर्म म्हणजे Religion नव्हे. रिलिजनमध्ये एका उपासनापंथाने सर्वांना गवसणी घालण्याचा प्रयत्न असतो व त्यात पोथीप्रामाण्य येते. धर्मात असे नसते. त्यात उपासनापद्धती कुठलीही निवडता येते व कुठलीही रूढी बौद्धिक निकषावर घासून पाहता येते. त्या दृष्टीने धर्म हा आधुनिक विज्ञानाला जवळ आणता येईल. नीतिविषयक व कला इ. विषयक सर्व प्रणाली मिळून संस्कृती (Culture) बनते. आपल्याकडे धर्मात हेही अंतर्भूत असल्यामुळे 'संस्कृती' ही तशी आधुनिक संकल्पना आहे व ती Culture च्या भाषांतरामुळे आल्यासारखी दिसते. तसेच Civilisation ला तर नीटसा प्रतिशब्दच नाही!

साधारणपणे बहुसंख्य व्यक्ती हे नियम पाळतात. त्यामुळे समाज टिकतो. परंतु काही व्यक्ती मात्र वेगवेगळे नियम धुडकावतात. काही एकलकोंडे इतरांशी न मिसळता जगतात. काही विक्षिप्तपणे वागून इतरांना अवघडल्यासारखे करतात. काही रागावतात व तिरसटपणे वागतात इ. मोठ्या समूहात कुणीतरी असे तमाशे करणारा भेटतोच. काही वेडे तर इतरांच्या जगण्यात अडथळे आणतात व हिंसकही ठरतात. काही, विचित्र कल्पना उराशी बाळगून असतात, पण त्या पडताळून पाहण्याला त्यांची तयारी नसते. अशा व्यक्तींमुळे समाजात वैविध्य निर्माण होते व मनोरंजनही होते. थोड्या व्यक्ती अशा असल्या तरी समाजाचे विशेष बिघडत नाही. पण त्यांचे प्रमाण जास्त असेल तर मात्र समाजाची घडी विस्कटते.

संख्यावाद :

कर्करोगात रोगी पेशी मुळात एकच असू शकते, परंतु अनिर्बंध वाढ हा तिचा प्रमुख विशेष असल्यामुळे तिच्या विभाजनाचा वेग जास्त असतो. त्यामुळे जलद वाढणाऱ्या तणांप्रमाणे तिच्या विकृतकन्या प्रमाणाबाहेर वाढतात. असा धोका मानवी समाजातही संभवतो. एखाद्या समूहाचा वाढीचा वेग इतर समूहांच्यापेक्षा जास्त असेल तर काही पिढ्यांनंतर तो समूह इतरांपेक्षा मोठा होईल. दीर्घकाळाने इतर समूह नाहीसे सुद्धा होतील. प्रजननवेगांतील अशा भेदांमुळेच प्राणिजाती उत्क्रांत होतात हे उत्क्रांतिवादाचा विचार करताना स्पष्ट होईलच, पण मानवी समाजात प्रगतीबरोबरच प्रजननाचे प्रमाण कमी होते. म्हणूनच 'विकास हे संततिनियमनाचे सर्वोत्तम साधन' (Development is the best contraceptive) असे म्हटले जाते. परंतु अप्रगतांचा प्रजननवेग जास्त असतो व वाढीव लोकसंख्येची पीछेहाट होते. त्यामुळे दरिद्र्यांची संख्या व प्रमाण वाढत राहू शकते. तसे अनेक विकसनशील देशांत दिसूनही येते.

शिवाय प्रजनन हा 'हक्क' समजला जातो, पण अपत्यांचे संगोपन व शिक्षण करण्याचे 'कर्तव्य' मानले जात नाही. गरीब अधिक गरीब होतात याचे एक कारण, गरीब अधिक होतात हे असू शकेल.

वृद्धिवादी पंथ :

आर्थिक कारणांप्रमाणेच वैचारिक कारणांनीही संख्या वाढू शकते. काही धार्मिक पंथ कुटुंबनियोजन अनैसर्गिक आहे असे मानतात. माओचे असेच मत निराळ्या कारणांसाठी होते. पोपचेही मत काहीसे असेच आहे. त्यामुळे त्यांच्या अनुयायांना अनिर्बंध वाढीचा परवाना मिळतो. असे सर्व पंथ, साम्यवाद धरून, पंथप्रसार व प्रचार, पांथिक परिवर्तन (धर्मांतर) देखील महत्वाचे मानतात. (या पंथांच्या विचारांचे विश्लेषण नंतर करूच.)म्हणजेच मानसिक परिवर्तनाने अनुयायांची संख्या व प्रमाण वाढविण्यावर त्यांचा भर असतो. हा एक प्रकारचा वैचारिक आक्रमकपणाच. फक्त त्यांच्या अनुयायांनाच सद्‌गती, मुक्ती वा इहलोकीच्या सुखांचा लाभ होणार असल्याचा त्यांचा दावा असतो. मग अधिकाधिक जनांचे कल्याण होण्यासाठी अधिकाधिक जन तर हवेत. म्हणून हा परिवर्तनाचा खटाटोप. तसेच प्रजननावर भर दिल्यामुळे मुक्त करण्यासाठी जास्त जीव असणार, त्यामुळे अनिर्बंध प्रजनन हे पुण्यकर्मच ! परिवर्तन व प्रजनन हे दोन्ही संख्यावाढीचेच मार्ग आहेत. परिवर्तन मानसिक असते, तर प्रजनन शारीरिक. परिवर्तनवादी पंथ हे प्रजननवादी का असतात हे आता लक्षात येईल. प्रजननातले धोके त्यांना माहीत नसतात असे नाही, पण इतरांवर संख्याबळाने मात करण्यासाठी हे प्रभावी शस्त्र ठरते. असे पंथीय बहुसंख्याक असतात तेव्हा इतरांना नष्ट करण्यासाठी संख्यावाढीचा उपयोग होतो. ते अल्पसंख्याक असतात तेव्हा स्वतःचे सांस्कृतिक वेगळेपण म्हणून त्यांना प्रजनननिर्बंध नको असतात. प्रत्यक्षात आपली संख्या व प्रमाण वाढवून बहुसंख्याकांवर कुरघोडी करण्यासाठी ते हे शस्त्र वापरतात. आजच्या कुटुंबनियोजनाच्या आधुनिक युगातही काही पंथ असा उलटा विचार का करतात ते आता ध्यानात येईल. नियोजन करणारे समूह घटत जाणार व या प्रजननवाद्यांची सरशी होणार. हे सर्व ध्यानात न घेता काही सुधारक अशा पंथांना संख्यावृद्धीचा सांस्कृतिक विशेषाधिकार बहाल करताना दिसतात. एका समूहाची अनिर्बंध संख्यावाढ ही कर्करोगाप्रमाणे इतर संयमी समाजघटकांना मारक ठरते.

शारीरिक सुजनन :

शारीरिक भेदामुळे प्रजननक्षमता बदलते तेव्हा त्याचा जैविक उत्क्रांतीवर परिणाम होतो. जातिवंत वनस्पती व प्राणी यांची कृत्रिम पैदास करून मानवाने नैसर्गिक उत्क्रांतीच्या पुढचे पाऊल टाकले आहे. संकरीत जाती मानवाला उपयुक्त वाटत असल्या तरी, पूर्ण जीवसृष्टीवर त्यांचा काय परिणाम होईल याचा वेगळा विचार करावा लागेल. जे पिकांच्या बाबतीत करता येते ते मानवप्राण्याच्या बाबतीत का जमू नये ? असे प्रयत्न जगात ठिकठिकाणी पूर्वीपासून झाले आहेत. जन्माधिष्ठित जातिव्यवस्था हे त्याचेच एक रूप म्हणता येईल. याला सुजनन (Eugenics) असे म्हणतात. जनुकांच्या अभ्यासाने आनुवंशिकतेचे मूळ गवसले तर असे प्रयत्न डोळसपणे करता येतील. सध्या काही आनुवंशिक विकृतींची जनुके ओळखून मातापित्यांना संभाव्य धोक्याविषयी सावध करता येते. यामुळे 'कुजनन' टाळता येते. पण 'सुजनन' घडवता येते असे नाही. सध्या तरी जननियंत्रणातून सुजनन व श्रेष्ठमानवाची (Superman) निर्मिती हे कल्पनारंजनच आहे. जनुकांच्या अभ्यासातून अशी शक्यता मात्र दिसते.

शरीर व मन :

मानव हा शरीराने, पृष्ठवंशीय सस्तन प्राणी आहे. या दृष्टीने तो गाय, बैल किंवा वराह यांच्यासारखाच आहे. त्यांच्या दृष्टीने मानव हा केवळ एक प्राणी वाटेल. तो मात्र या प्राण्यांच्या शरीरांवर आवडीने शारीरिक ताव तरी मारतो किंवा तसे करणे त्याच्या मानसिकतेमुळे निषिद्ध तरी मानतो. प्राणिशरीरापलीकडे मानवाला मन, यात बुद्धीही आली, लाभले आहे. त्यामुळे मानवी व्यक्तीचा वा समूहाचा अभ्यास करताना मानससामाजिक घटक महत्वाचे ठरतात. व्यक्ती शरीराने भिन्न असतात, व या भेदातच उत्क्रांतीचे मर्म लपले आहे; मानवाच्या बाबतीत हा भेद मुख्यतः चेहऱ्यांत दिसतो. म्हणून तर मूल आई ओळखते, आपण एकमेकांना ओळखतो, व ओळखपत्रासाठी केवळ चेहऱ्याचे छायाचित्र पुरते. चेहऱ्यांची ही विविधता इतर प्राण्यांमध्ये

दिसत नाही. परंतु यापेक्षाही मानवांत भेद असतो तो मनोरचनेत. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्नः ।' असे त्यामुळेच म्हटले जाते. मने व चेहरे दोन्हींमध्ये विविधता असते. यावरूनच चेहरा व मन यांच्यात नाते शोधण्याचे प्रयत्न झाले आहेत, पण त्यांना फार मर्यादित यश आले आहे. अर्थात मानवी चेहरा भाव व्यक्त करू शकतो. यादृष्टीने चेहऱ्यावर मनाचे प्रतिबिंब पडते, पण ते तात्पुरते.

मानवी मन अनेक प्रकारचे असू शकते. मनांच्या जाती मानल्या तर त्यांनाही शारीरिक जातींप्रमाणे नियम लागू होतील. मानसिकता आनुवंशिक असेल तर या जाती पिढ्यानूपिढ्या टिकतील. मनाचे काही गुण हे कदाचित आनुवंशिक असू शकतील, विशेषतः भावना, राग, लोभ, प्रेम इ. हे मनोविकार प्राण्यांतही असतात त्यामुळे ते आनुवंशिक असण्याची शक्यता आहे. ते प्राणिजातिनिष्ठ दिसतात. उदा. कुत्रा स्वामिभक्त असतो, पण मांजर नसते; ते केवळ स्वार्थापोटी माणसाजवळ राहते. प्रशिक्षणाने यात फरक घडवता येत नाही, त्याअर्थी हे गुणदोष आनुवंशिकच असले पाहिजेत. असे असेल तर मानवी चित्तवृत्तीही आनुवंशिक असू शकतील. रागीट वडलांचा मुलगाही रागीट असेलच असे खात्रीने सांगता येत नाही, कारण हिरण्यकशिपूला प्रह्लादासारखा पुत्र असू शकतो. शिवाय संस्कारांमुळे मानसिकतेत फरक घडविता येत असेल. कदाचित वडलांना रागावताना पाहून मुलगा रागवायला शिकत असेल. बुद्ध्यंकाने मोजली जाणारी बुद्धी मात्र जन्मजात असते. त्याबाबतीत गाढवाचा घोडा करता येत नाही. तसेच ती काही प्रमाणात आनुवंशिकही असणे शक्य आहे. यापलीकडे 'गजस्तत्र न हन्यते' असे म्हणता येईल काय, हे अनिश्चित आहे. आनुवंशिकता व संस्कार यांच्या परिणामकारकतेचा वाद केवळ तात्त्विक भूमिका घेऊन सुटणार नाही, त्यासाठी निरीक्षण व विश्लेषण करणे आवश्यक आहे.

विचारसंस्कार :

भावनिकता व विचारग्रहणशक्ती, उदा. बुद्ध्यंक, जन्मजात व कदाचित आनुवंशिक असू शकतील पण प्रत्यक्ष विचार मात्र संस्कारांनीच प्राप्त होतात. विचार सहसा भाषेच्या माध्यमातून व्यक्त होतात, व विचारप्रणालीतून संस्कृती निर्माण होते. एकपेशीय जीवांपासून अनेकपेशीय जीव उत्क्रांत झाले आहेत. परंतु अनेकपेशीय जीवांत नवीन व्यक्ती एकाएकी निर्माण होत नाही. अर्भक जन्मतःच मानवसदृश असले तरी मुळात ते एका पेशीपासून आरंभ होऊन नऊ महिन्यांत आईच्या उदरात प्रगत अवस्थेला पोहोचते. प्रत्येक व्यक्ती जैविक उत्क्रांतीच्या पूर्ण इतिहासातून अल्पावधीत पार होते. हे सर्व जनुकग्रंथांमुळे घडते व त्यात सुदैवाने आपल्याला बाहेरून काहीही करावे लागत नाही. एखादा चित्रपट उलगडत जावा तसे हे घडते. अनभिज्ञाला हा सर्व चमत्कारच आहे असे वाटते. जीवसृष्टी ही ईश्वरी निर्मिती असे त्यामुळेच भासते. आधुनिक विज्ञान मात्र जनुकांच्या अभ्यासातून याचा शोध घेते आहे. ही झाली शारीरिक आनुवंशिकता. यातून मानवाला जैविक जन्म मिळतो. पण जन्मतः त्याची अवस्था प्राण्याप्रमाणेच असते. तो बोलू लागल्यावर प्राण्यांहून भिन्न ठरतो. भाषा आत्मसात केल्यावर त्याला विचार करता येऊ लागतो. संस्कारांमुळे त्याची प्रगती होते. हा त्याचा वैचारिक किंवा दुसरा जन्म. यामुळेच असे शिक्षण झालेला द्विज (दोनदा जन्मलेला) म्हणून ओळखला जाई : '... संस्कारात् भवतो द्विजः ।'

जसे शरीराला एकपेशीपासून सुरुवात होते, तसेच विचारांना साध्या उच्चारांतून सुरुवात होते. आदिमानव सुरुवातीला असेच साधे सोपे बालसुलभ बोलत असेल तर आपण आदिमानवाच्या भाषिक अवस्थेपासून आरंभ करून आजच्या मानवाच्या अवस्थेपर्यंत पोहोचतो. हे घडेपर्यंत 18 वे वर्ष संपते. इतर प्राणी, माकडेसुद्धा पटापट प्रौढ व स्वतंत्र होतात. मानवी बालकाला मात्र इतकी वर्षे लागतात ती मुख्यतः मानसिक प्रगतीमुळे, हा उत्क्रांतीचा परिणाम आहे. या दृष्टीने पाहता 'सर्व मानव जन्मतः समान असतात' (All men are born equal) याची प्रचीती येते. पुढे प्रकांड पंडित होणारा सुद्धा बालपणी ताता बाबा करतच शिकतो. शिक्षण हे आनुवंशिक नाही. श्रीमंताचा मुलगा आपोआप श्रीमंत होतो; पण विद्वानाच्या मुलाला मात्र स्वतःच सर्व विद्या आत्मसात करावी लागते. लॉटरी लागून माणूस रंकाचा राव होऊ शकतो, परंतु असा चमत्कार घडून तो एकदम शिक्षित होऊ शकत नाही.

हे शिक्षण, विचार आपले कुटुंब, परिसर व संस्कृती

यांतून आपल्याला मिळतात. हाच वैचारिक वारसा. आपण कुठे जन्म घेतो व पालवतो यावर हे अवलंबून असल्यामुळे 'यस्मिन्कुले समुत्पन्ने...' याचा असाही अर्थ लागतो. शरीररूपी वारसा म्हणजे Corporeal Inheritance तसे संस्कृतीला 'Culture is extracorporeal inheritance' म्हणजे अशारीरिक किंवा वैचारिक वारसा असे म्हटले जाते. मानवांतील भेद हे मुख्यतः वैचारिक आहेत. शारीरिक सुजननाने रंग, रूप व फार तर शारीरिक आरोग्य मिळविता येईल. श्रेष्ठमानवांचा वंश (Superhuman Race) निर्माण करता येणार नाही. कारण मानवाचे श्रेष्ठत्व विचारांत दडलेले आहे व विचार हे जन्मतः मिळत नाहीत. यामुळेच आपल्याकडे 'द्विज' ही संकल्पना आहे.

दुसरा जन्म गुरूमुळे मिळतो. 'गुरुमाउली' म्हणतात ते उगीच नाही. तसेच आपले नाव सांगताना वाडवडलांची म्हणजे शारीरिक, वांशिक परंपरा आपण सांगतो. त्यापुढे आपले गोत्र सांगतो, ते गुरुपरंपरेचे नाव असू शकते. वांशिक पित्याला शरीरपिता तर गुरूला विद्यापिता म्हणतात. त्याचप्रमाणे गुरू शिष्याला पुत्रवत मानतो. 'शिष्यात् इच्छेत् पराजयम्।' असे त्याला त्यामुळेच वाटते. मातापिता ही कल्पना मुख्यतः शारीरिक जन्माबद्दल आहे. अर्थात मातापिता हे बालकाचे गुरू पण असतात. त्याचप्रमाणे प्रौढावस्थेत गुरू वैचारिक उन्नती घडवतो. गाईबैलांना आईवडील असतात व त्यांचे कूळ तेवढ्यावरूनच ठरते, जसे 'जर्सी' गाय. पण त्यांना गुरू नसतात, कारण त्यांना विचारशक्तीच नसते.

मानवाचे अस्तित्व शरीर व मन (बुद्धी) अशा दोन पातळ्यांवर असते, याचा आपल्या संस्कृतीने फार सूक्ष्म विचार केला आहे. आधुनिक विज्ञान शरीरविचारातच गुंतून पडले आहे. मन हे अभ्यासायला कठीण असल्यामुळे त्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्षच झाले आहे. आपल्या परंपरेत मात्र शेवटी आध्यात्मिक विचारच महत्त्वाचा, असे मानलेले आहे. आधुनिक मानवालाही आता जाणवू लागले आहे की भौतिक व शारीरिक विकासानंतर समाजधारणेसाठी, शांततारक्षणासाठी व सृष्टिसंहार टाळण्यासाठी वैचारिक विकासच महत्त्वाचा ठरणार आहे.

आतापर्यंत आपण शरीरप्रणाली तसेच शारीरिक समाज, व त्यांमधील कर्करोगरूपी दोष यांचा विचार केला. मानवाच्या दुहेरी अस्तित्वात वैचारिक प्रणाली मुख्यतः समाजधारणा करतात. अशा प्रणालींतील कर्करोगसदृश दोषांचा आता विचार करू.

**विकृत व्यक्ती, विकृत विचार :**

**स्थानिक रूढी :**

एखाद्या व्यक्तीचे विचार वा वागणूक विकृत असू शकते. परंतु भोवतालचे लोक तिला ओळखून असल्यामुळे तिच्या वागण्याबोलण्याकडे दुर्लक्ष करतात, त्यामुळे इतरांमध्ये ही विकृती पसरत नाही. काही वेळा मात्र एखादा, निरोगी व्यक्तीलाही सुचलेला विचित्र विचार इतरांना भावतो. अशा विचित्र विचारकांचे स्थानिक कोंडाळे निर्माण होऊ शकते. काही स्थानिक चालीरीती अशा स्वरूपाच्या असतात. पण त्या मूळ ठिकाणीच राहतात. त्यांचा प्रसार होत नाही. बाहेरील लोक या रीतींकडे आश्चर्याने पाहतात. उदा. इंग्लंडमधल्या एका विद्यापीठात भर थंडीत नदीच्या पाण्यात विद्यार्थ्यांनी उडी मारण्याची प्रथा आहे. पण ही प्रथा इतरत्र पसरलेली नाही. अशा प्रथा म्हणजे गौण अंधश्रद्धाच असतात. पण त्यांनी विशेष अपाय होत नसेल तर त्यांचे उच्चाटन करीत बसण्याचे कारण नाही. या प्रथा सर्व स्थानिक लोक पाळतात म्हणजे 1) संख्या असते. त्या निरुपयोगी असतात म्हणजे 2) अकार्यक्षमता असते पण त्यांचा 3) शेजाऱ्यांना उपद्रव इ. होत नाही. त्यामुळे त्या मर्यादित राहतात, कर्करोगाचे रूप धारण करीत नाहीत. कुणालाही त्या ठिकाणाहून निसटून त्यांपासून मुक्त होता येते.

**अफवा, प्रवाद :**

काही विचित्र व निराधार विचार मात्र स्थानिक लोकात पसरतात (1) (संख्या) . ते निराधार असल्यामुळे निरुपयोगी असतात (2) (अकार्यक्षमता). पण ते (3) शेजाऱ्यापाजाऱ्यांतही पसरतात. अफवांचे स्वरूप असे असते. त्यांत सत्य किंवा पथ्यकर काही नसते ; पण आवडण्यासारखे, म्हणजे प्रिय मात्र असते. अफवांना सत्याचा आधार नसल्यामुळे तार्किक विसंगती चालते त्यामुळे त्या अनेक रूपे धारण करू शकतात. अधिक अविश्वसनीय अफवा अधिक वेगात पसरते.

पुण्यात 1961 साली पानशेत धरण फुटल्यामुळे मोठा पूर आला, व नगराचा बराच भाग पाण्याखाली गेला. पुराची खरी बातमी तशी उशिराच समजली, व ती तेव्हा अविश्वसनीय वाटली. दिवसभरात पूर ओसरून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी लोक आपापल्या पूरग्रस्त घरातील सामान शोधत होते. तेव्हा अफवा उठली की, 'धरणातून परत पाणी सुटले आहे.' यामुळे हातातल्या वस्तू टाकून पूरग्रस्त धावत सुटले; व चोरट्यांचे फावले. ज्या भागांत आदल्या दिवशी पुराचे पाणी आले नव्हते त्या भागांतील लोकही धोरणीपणाने दागदागिने बांधून घेऊन उंच इमारतींवर जाऊन बसले. काहींनी तर सावधगिरीचा उपाय म्हणून सरळ पर्वतीच्या उंच टेकडीचा रस्ता धरला. थोड्या वेळाने सर्वांना आपला मूर्खपणा कळून आला.

धरण आदल्या दिवशीच फुटून गेल्यामुळे त्यात पाणीच नव्हते. धरणातच नाही तर नदीत कुठून येणार? पण हा साधा विचार वेळीच कुणालाही सुचला नाही. पुराचे पाणी जसे काही तास अंमल गाजवून ओसरून गेले, तशीच ही अफवा काही तास शहराला अंकित ठेवून विरून गेली.

ही अफवा काही तासच व पुण्यापुरतीच टिकली व नंतर निवर्तली. नंतर, ती अफवा होती हे सर्वांनाच मान्य झाले. पण काही अफवा नगरभरात महिने महिने टिकून राहतात. पुण्यातच तीसएक वर्षांपूर्वी एका 'हाकामारी' नामक प्रकाराचा बोलबाला झाला होता. त्यावेळच्या समजुतीप्रमाणे हाकामारी, भूत इ. जे काही असेल ते, रात्री झोपलेल्याला हाका मारत असे. त्याने ओ दिली तर त्याला बोलवत असे व तो बाहेर निघून तिच्यामागून गेल्यावर... याच्यापुढचे नक्की काय, ते कुणालाच नीटसे माहीत नव्हते. पण अमक्याच्या तमक्याला किंवा कुणाच्यातरी कुणाला असे झाले आहे, असे अनेकजण सांगत होते. अर्थात प्रत्यक्ष अमूक व्यक्तीला झाले आहे , असे कुणी सांगू शकत नव्हते. संपूर्ण शहरात रात्री भीतीचे वातावरण असे.

अर्थात परिस्थिती अगदी वाईट नव्हती. कारण हाकामारीवरचा तोडगा सर्वांना माहीत झाला होता. दारावर फुली केलेली दिसली तर हाकामारी त्या घरातल्या कुणाला हाक मारत नसे. त्यामुळे बहुतेकांनी खडूने आपल्या दारांवर फुल्या केल्या होत्या. काहींनी टिकाऊपणासाठी तैलरंगाचाही उपयोग केला होता. शिवाय हाकामारीला घरात राहोच पण अंगणात तरी कशाला येऊ द्या? म्हणून दूरदृष्टीने काहींनी वाड्याच्या दिंडीदरवाजावरच फुल्या रंगवल्या होत्या. यानंतर मात्र सर्व जण निर्धास्त झाले व हळूहळू हाकामारीला विसरून गेले. हाकामारीही (असलीच तर) सगळ्या दारांवर फुल्या बघून, आता आपल्याला येथे संधी नाही हे ओळखून निघून गेली. नंतर फुल्याही पुसल्या गेल्या, पण हाकामारी मात्र परत आली नाही!

पाणी आल्याची अफवा काही तास टिकली, तर हाकामारीची अफवा काही महिने टिकली. मात्र हाकामारीच्या बाबतीत गूढतेमुळे काहीजणांच्या मनात सुप्त भीती राहून गेली असणे शक्य आहे. पुणेकरांसारख्या सुशिक्षित व स्वतःला इतरांपेक्षा बुद्धीने श्रेष्ठ समजणाऱ्यांची ही कथा, मग इतरांचे काय होऊ शकेल?

अगदी अलीकडचे उदाहरण घेऊ. कुठलीशी गणपतीची मूर्ती चमच्याने पाजलेले दूध पीत आहे अशी आवई उठली. लगेच, देव सर्वत्र एकच असल्यामुळे, आपल्या जवळचा गणपती तसे करतो का हे लोक पाहू लागले. आणि काय आश्चर्य! भेदभाव न करता सर्व ठिकाणचे गणपती मुकाट्याने पाजाल तेवढे दूध पिऊ लागले. ही वार्ता राज्यभर व शेवटी जगभर पसरली, व अनेकांनी हा चमत्कार घडल्याचे दावे केले. नंतर मात्र हे दुग्धप्राशन एकाएकी थांबले. गणपती हा बुद्धीचा देव. तो काय बोंडल्याने दूध पिणार आहे? तसे समजणे हे 'दूधखुळे' पणाचेच ठरेल. आता हे प्रकरण शांत झाले आहे. पण निदान त्या दिवशी तरी असे घडले होते असे काहींना अजूनही वाटते.

अफवा या रोगाच्या साथीप्रमाणे पसरतात. पण त्या बहुधा विरून जातात. एखादे स्वप्न पडावे तशा त्या तात्कालिक असतात. त्यांच्या आधी व नंतर सामान्य परिस्थिती असल्यामुळे त्यांचा खोटेपणा उठून दिसतो. यामुळे अफवांच्या अभ्यासातून पुष्कळ शिकता येते. अफवांची कर्करोगसदृश प्रक्रिया आता पाहू.

**1) अनिर्बंध संख्यावाढ :**

संस्कृती एका प्रकारची असली तरी विकृती अनेक प्रकारच्या असू शकतात. याचप्रमाणे सत्यवार्ता एकच असली

तरी अफवा विविध असू शकतात. कानगोष्टींप्रमाणे त्यांची संख्या अमर्याद वाढत जाते. यालाच अफवांचे 'पेव फुटले' असे म्हणतात. पेवातून ज्याप्रमाणे धान्याचे हजारो दाणे बाहेर पडतात, तशा अफवा मोठ्या संख्येने निर्माण होतात.

सामान्य वार्ता थोड्या जणांपर्यंत पोचतात, कारण सांगणाऱ्यांचा उत्साह ओसरतो; पण अफवा चमचमीत असल्यामुळे त्या सांगण्यात अहमहमिका लागते, व त्या वणव्यासारख्या पसरतात.

2) अकार्यक्षमता :

अफवा असत्यावर आधारलेल्या असतात. त्यामुळे त्या विधायक कार्य करू शकत नाहीत. भुसभुशीत पायावर इमारत उभारता येत नाही, त्याप्रमाणे असत्यावर अवलंबून राहून भौतिक परिस्थितीचा सामना करता येत नाही. यामुळे अफवा अकार्यक्षम असतात.

3) निकटवर्तीयांना उपद्रव :

अफवा जिथून उपजतात तिथे तर त्या सर्वांना व्यापून टाकतात. पण आसपासच्या सामान्यजनांनाही त्यांचा उपद्रव होतो. त्यांच्या विधायक विचारांना फाटे फुटू शकतात. भौतिक शेजाऱ्यांप्रमाणेच वैचारिक शेजाऱ्यांनाही त्यांचा त्रास होतो. उदा. गणपतीची नेमाने उपासना करणाऱ्यांच्या श्रद्धाळू मनातही, गणपती दूध पिऊ लागल्याच्या अफवेमुळे संभ्रम निर्माण होतो.

4) प्रवास :

खरी नाणी देवघेवीमुळे आसपासच्या परिसरातच खेळत राहतात. पण खोट्या नाण्यांचे तसे नसते. खरी नाणी स्वीकारण्यास, राखण्यास प्रत्येक जण उत्सुक असतो. याउलट, खोटी नाणी देऊन टाकण्यात प्रत्येकजण तत्पर असतो. अर्थशास्त्रात, खोटी नाणी खऱ्या नाण्यांना हुसकावतात (Bad money drives out good) असा ग्रेशॅमचा नियम आहे. त्याचप्रमाणे अफवा दूरवर पसरतात. प्रवास करणारी माणसे नव्या ठिकाणी गेल्यावर तेथे नवी कंडी सांगण्यास उत्सुक असतात. त्यामुळे अफवा दूरवर प्रवास करतात.

5) दूरवसाहत :

एकदा अफवा नव्या ठिकाणी पोचली की ती मूळ स्थानाप्रमाणेच कर्णोपकर्णी होत जाते व नवे स्थानही व्यापून टाकते. गणपती दूध पिण्याच्या उदाहरणात प्रथम कुठल्यातरी नगरात सुरुवात झाली व मग हे लोण राज्यभर, व शेवटी जगभर पसरले. येथे कुणी प्रत्यक्ष प्रवास करून हे पसरविले नसेलही, पण दूरध्वनीच्या माध्यमातून ते पसरले. यात आधुनिक तंत्रज्ञानाचा सहभाग लाभला. माध्यमामुळे चुकीचा संदेश तत्परतेने पसरू शकतो, याप्रमाणे अफवा कुठेही उगवली तरी ती सर्वत्र पसरू शकते, जशा कर्करोगपेशींच्या वसाहती. ज्याप्रमाणे नंतर कर्करोगाचे मूलस्थान समजत नाही तसेच अफवेचा उगमही सापडतोच असे नाही, व सापडून उपयोगही नसतो. कारण मूलस्थानी भ्रमनिरास केला तरी तो अफवा जिथे जिथे पसरली आहे तिथपर्यंत तो भ्रमनिरास पोचवता येत नाही.

6) समाजकार्यावर परिणाम :

अफवेमुळे तत्संबंधी क्षेत्रात वेळ व पैशाचा अपव्यय होतो. गणपतीला दूध पाजण्यासाठी कामधंदा व परकाम बाजूला ठेवून अनेकजण देवळांकडे धावत सुटले होते. शिवाय दूध खर्चावे लागले, ते वेगळेच. हा खर्च कदाचित करमणुकीप्रमाणे परवडू शकेल, पण नेहमीच काम न झाल्याचे संधिमूल्य (Opportunity Cost) भरावेच लागते. तसेच असत्यावर श्रद्धा ठेवल्यामुळे सत्यासत्यविवेक कमी होतो व समाजाच्या एकंदर विचारक्षमतेवर परिणाम होतो. कधीमधी अफवा उठल्या तर तो रटाळ जीवनात विरंगुळा ठरतो. पण सारख्याच वावड्या उडत राहिल्या तर मात्र लोक विधायक कार्याऐवजी अफवांशी सामना करण्यातच गुंतू लागतात. अशा भोळसर समाजाचा ह्रास होतो.

छोट्या गावात, करमणुकीची साधने नव्हती तेव्हा अशा गावगप्पांना ऊत येई. कोण कुणाचा हात धरून पळाले, शकुनापशकुन, भुतेखेते यांच्या कथांची चलती असे. पण अशा समाजाची बौद्धिक प्रगती खुंटते. निरक्षरांना, ऐकण्यावर अवलंबून राहावे लागते, त्यामुळे असे घडत असेल. मोठ्या नगरांत कानोकानी अफवा थोड्या पसरतात.

विशेषतः शिक्षितजन ऐकीव गोष्टींवर कमी विश्वास ठेवतात, व छापील गोष्टींवर जास्त विश्वास ठेवतात. परंतु वरील उदाहरणांवरून असे दिसते की नागरी लोकही काही तास किंवा काही महिने एखाद्या अफवेला बळी पडू शकतात. पूर्वी दळणवळणाची साधने नव्हती, प्रवास दुष्कर होता, ग्रंथ दुर्मिळ होते तेव्हा कधीकाळी येणारा वाटसरू जे सांगेल त्यातूनच दूरदेशांविषयी काही समजे. यात कल्पनारंजन व अतिशयोक्ती असणे शक्य होते, कारण ताडून पाहण्याची काही सोय नव्हती. यामुळेच, 'दूरस्य कथा रम्या' असे म्हटले जाई.

बोललेला शब्द विरून जातो, पण लेखन टिकते व पुरावा म्हणून मागे राहते. त्यामुळे साक्षर, अफवांना कमी बळी पडत असावेत. परंतु ते अफवांना अजिबात दाद देत नाहीत असे मात्र नाही. लिखित वाक्य जबाबदारपणाचे, म्हणून खरे असते, हा देखील भ्रम असू शकतो. 'गुळाचा गणपती' चित्रपटात नायक (पु.ल.देशपांडे) पुडीच्या कागदावरचे अभंग वाचून 'नाही निर्मळ मन। तेथे काय करील साबण।' असे, साबण खरेदी करण्यास आलेल्या गिऱ्हाइकाला उपदेशू लागतो. दुकानमालक 'अण्णा' 'अरे, छापलेल्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवायचा नसतो (म्हणजे तारतम्य बाळगायचे असते)' असा त्याला उपदेश करतात. नंतर नायकाच्या भाषणनिपुणतेचा गैरफायदा घेऊन काही समाजकंटक स्वार्थासाठी त्याच्या भाषणाचे वृत्तांत छापवून आणतात. अण्णांना, 'हा पुढारी झाला हे कशावरून ?' असे विचारल्यावर ते सांगतात, 'हे काय, इथे छापून आले आहे !' याप्रमाणे ते वृत्तपत्रातील भ्रामक वार्तेवर विश्वास ठेवतात. नायिका मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहून पावले उचलते, व नायकाची सुटका करते.

मुद्रण, विशेषतः वृत्तपत्रे व नियतकालिके सत्यवार्ता किंवा ज्ञान यांचा प्रसार करण्यासाठी आदर्श माध्यमे आहेत. पण मेंढ्यांच्या कळपात काही मेंढीचे कातडे पांघरलेले लांडगेही असू शकतात. वृत्तपत्र मिळाल्यापासून काही तासातच शिळे होते. कालचे वृत्तपत्र ही आजची रद्दी होते. काल काय छापून आले होते हे आज विसरले जाते. एकंदरीतच 'लोकांना स्मरण अल्पकालीन असते' (Public memory is short). त्यामुळे वृत्तपत्रात खोटे छापले तरी खपून जाऊ शकते. वृत्तपत्र रोजच्या रोज समयबंधनात छापावे लागते. 'पत्रकारिता म्हणजे घाईघाईने केलेले लेखन' (Journalism is Authorship in a hurry) असे त्यामुळेच म्हटले जाते. खऱ्याखोट्याची शहानिशा करण्यास पुरेसा वेळ नसतो. या सर्व घटकांचा फायदा घेऊन काही वेळा चक्क खोट्या बातम्या पेरून छापल्या जातात. यात कधी तात्कालिक खप वाढण्याचा फायदा असतो. पण हे तंत्र दूरगामी आहे, व त्याने इतर अनेक हेतू साध्य करता येतात हे आपण पुढे प्रचारकी तंत्रांचा विचार करताना पाहू.

रोज असे काही चटपटीत छापले तर रोजचा खप वाढू शकतो. वाचक जर याकडेच लक्ष देत असेल तर असा मजकूर चटकन लक्षात येईल अशा ठिकाणी, म्हणजे मथळ्यातच असतो. त्यामुळे मुख्यवार्ता (Headline) हीच अशी असते. साधारण छपाई व लेखन म्हणजे 'पांढऱ्यावर काळे करणे' असते. पण लक्ष वेधण्यासाठी मथळा काळ्यावर पांढरा असा ठळक छापला जातो. कधी काळ्याऐवजी लाल किंवा गुलाबी रंगही वापरला जातो. सनसनाटी मथळा हे अशा वृत्तपत्राचे वैशिष्ट्य असते. सहज वाचता येतील अशी मोठी अक्षरे योजलेली असतात.

असे एकूण वृत्तपत्र एक कागद म्हणजे चार पानेच असते. पण अल्पसाक्षरांना एवढे पुष्कळ होते. लहान मुलाला जसे मोठ्या भडक अक्षरात छापलेले, कल्पनारंजनाने भरलेले छोटे पुस्तक आवडते तसेच हे वृत्तपत्र असते. बौद्धिकबालकांसाठी, जे समाजात बहुसंख्य असतात, ते छापले जाते. संख्येने यांचा खप प्रतिष्ठित वृत्तपत्रांपेक्षा जास्त असू शकतो. कामगार, रिक्शा-टॅक्सीवाले हे यांचे प्रमुख ग्राहक. लहान मूल सांगितलेले चटकन विसरते, तीच गोष्ट नंतर परत सांगितली तरी त्याला चालते, किंबहुना आवडते, तसेच ठरावीक धाटणीच्या बातम्या आलटून पालटून अशा वृत्तपत्रात येतात. यात धूमकेतू आपटणार, युद्धाची धमकी, अमुक दिवशी बॉम्बस्फोट घडवण्याचा बेत, इथपासून तीन तोंडांचे वासरू, पुरुष गरोदर राहिला किंवा माणूस कुत्र्याला चावला (असे होणे हे बातमीचे व्यवच्छेदक लक्षण समजले जाते) येथपर्यंत काहीही असू शकते. पूर्वी अशा गोष्टी कानोकानी पसरत. आता वृत्तपत्राद्वारे एकाच वेळी अनेकांचे कान फुंकण्याची सोय झाली आहे.

ज्ञानप्रसारमाध्यमातून ज्ञानच पसरते असे नाही; अज्ञानही पसरते. गणेशदुग्धप्राशनाच्या प्रसंगात दूरभाषाच्या उपयोगाने जगभर ही अफवा पसरली, ही प्रसारमाध्यमांचीच किमया. पूर्वी बोटीने जावे लागत असे तेव्हा इथल्या गणपतीनंतर अमेरिकेतल्या गणपतीला दूध पिण्यास आठपंधरा दिवस लोटले असते. आता ती मर्यादा राहिलेली नाही. जगभर जवळजवळ एकाच वेळी दुग्धप्राशन होण्याची शक्यता आहे. माध्यम हे संदेशनिरपेक्ष असते. टपालवाला, नातू झाल्याची किंवा मेरिटलिस्टमध्ये आल्याची तार आणतो, तशीच कुणी निवर्तल्याची किंवा नापास झाल्याची. माध्यम हे रस्त्याप्रमाणे असते. चिं. वि. जोशींच्या 'ओसाडवाडीचे देव' मध्ये चौकातल्या पोलिसाला, 'हा रस्ता कुठे जातो ?' म्हणून विचारल्यावर तो, 'हा रस्ता कुठेही जात नाही. तो इथेच पडून आहे. रस्त्यावरून माणसे मात्र कुठेकुठे जाऊ शकतात,' असे उत्तर देतो.

सर्व संचार व प्रसारमाध्यमांचे असे आहे. भाषा हे संदेशवहनाचे आद्य माध्यम असल्यामुळे आपण या सर्व अंगोपांगांचा विचार करीत आहोत. प्राणिशरीरात रक्त हे प्रसारमाध्यम असते त्यातून सर्व ऊतींना अन्न, प्राणवायू व जैवरासायनिक संदेश मिळतात. याच रक्तप्रवाहातून प्रवास करून कर्करोगपेशी रोगप्रसार घडवून पूर्ण शरीर पोखरून टाकतात. विहिरींचे पाणी पिणाऱ्या गावाला विषबाधा करणे सोपे नाही, पण नळाचे पाणी पिणाऱ्या गावाच्या मुख्य नळात विष सोडले तरी सर्व गाव विषग्रस्त होऊ शकते. हेच जंतुसंसर्गालाही लागू पडते. सर्व केंद्रशासित प्रणालींत हा तोटा असतो.

वरील उदाहरणांवरून, खोट्या बातम्यांवर किंवा प्रवादांवर चालणारी वृत्तपत्रे मुख्यतः खेडवळ व अल्पशिक्षित लोकांवर परिणाम करतात, बहुशिक्षितांना असा धोका नाही, असे वाटण्याचा संभव आहे. उच्चशिक्षितांना त्यांच्या श्रेष्ठत्वामुळे गुदगुल्या होऊ लागतील. परंतु अशा भ्रमात राहण्याचे काही कारण नाही. उच्चभ्रू वृत्तपत्रे व नियतकालिकेही अशा असत्यवार्ता प्रसिद्ध करतात. कधी त्या मुखपृष्ठावर न देता आत दडवलेल्या असतात. काही वृत्तपत्रीय स्तंभ हेही असे असतात. चारपानी वृत्तपत्रे मटक्याचे आकडे देऊन खप वाढवीत असतील, तर मोठी वृत्तपत्रे प्रौढभाषेत राशिभविष्य देतात. छोट्या वृत्तपत्रात उघडव्यभिचाराच्या खऱ्याखोट्या बातम्या असतात. मोठ्या वृत्तपत्रात 'तुमची अडचण बाबीआत्याचा सल्ला' अशा सदरांत तशाच विकृतींची चविष्ट चर्चा असते. काही इंग्रजी वृत्तपत्रे तर इतर रूपात छापल्यास जप्त होतील अशी वर्णने 'लोकांच्या अडचणी' च्या नावाखाली छापतात व त्याखाली सोज्वळ सल्ल्याचे लज्जारक्षण जोडतात. अलीकडे यात पारंपरिक नीतिविचाराच्या ऐवजी मनोविश्लेषणाच्या नावाखाली, भिंतीआडच्या गोष्टी उघड्यावर मांडण्याची शास्त्रीय(?) सोय झाली आहे. असभ्य याचा अर्थ अ + सभ्य म्हणजे चारचौघांसमोर मांडू, म्हणजे बोलू किंवा करू, नये ते. पण आता असा निर्बंध राहिलेलाच नाही. खाजगीत आचार किंवा विचार स्वातंत्र्य पूर्वी देखील होते पण आता उच्चारस्वातंत्र्याच्या नावाखाली सर्व गोष्टी राजरोस मिरवता येतात. हा झाला निनावी स्वैराचार. यात सोज्वळ सल्लागाराचे टोपणनाव मात्र असते.

पण एवढ्यावरच भागत नाही. उच्चपदस्थांचे स्वैराचार मुक्तपणे मांडले जातात. त्यांच्या विषयीच्या कंड्या चर्चिल्या जातात. असे स्तंभ, प्रवादस्तंभ (Gossip Columns) म्हणून ओळखले जातात. गिधाडांनी लचके तोडावे तसे हे स्तंभलेखक इतरांच्या शयनगृहांत डोकावून बघतात. त्यांच्या डोळ्यांनी वाचकांचीही भूक भागते. साहित्यात प्रसंग खरे पण पात्रे काल्पनिक असतात. इथे पात्रे खरी व सर्वज्ञात असतात; प्रसंग खरे की खोटे हे सांगणे कठीण असते. वाचकालाही खरेखोटेपणाची तमा नसते. काहीतरी अतिरंजित वाचायला मिळाले म्हणजे झाले. अशी एकामागून एक प्रकरणे शिजताना, बुडबुडे यावे तशी उगवून फुटत असतात. पुढल्या आठवड्यात कोण कुणाबरोबर लफडे करणार आहे हे स्तंभलेखकांना आधीच ठाऊक असते. चित्रगुप्ताला भूतकाळातील पापांचे लेखन करता येते, यांना तर भविष्यातील संभाव्य पापेही दिसतात व तशा सूचना ते आधीच्या अंकात देऊन ठेवतात. उच्चपदस्थांविषयी प्रवाद पूर्वीही असत, पण ते लिखित नसत. आता ते लिहून पसरविण्याचे तंत्र उपलब्ध आहे. सन्मार्गी उच्चपदस्थ अशा अफवांचे वा चारित्र्यहननाचे बळी ठरू शकतात. स्वैराचाऱ्यांना मात्र, अशी प्रसिद्धी म्हणजेच प्रतिष्ठा, असे

वाटून ते आपल्याबद्दलच्या अफवांना खतपाणी घालायलाही कमी करीत नाहीत. काही, विशेषतः चित्रपटसृष्टीशी संबंधित नियतकालिके अशा प्रवादांनाच वाहिलेली असतात. त्यांना प्रवाद नियतकालिके (Gossip Periodicals) म्हणूनच संबोधिले जाते. असत्यकथन करणाऱ्यांचा एक वेगळा धंदेवाईक वर्ग आहे व असे प्रकाशन हा एक धनदायी उद्योग झाला आहे. साधारण वर्तमानपत्रे चवीसाठी असे एखादे सदर घालतात, पण प्रवादनियतकालिके यांना वाहिलेलीच असतात. यामुळे वाचकवर्ग भरपूर मिळतो, प्रसिद्धी व पैसाही मिळतो, पण प्रतिष्ठा तितकी मिळत नाही. संस्काराची डूब देण्यासाठी मग अशी नियतकालिके एखादा लेख किंवा सदर, गंभीर विषयावर किंवा उपरतिपर ठेवतात, जेणेकरून थोडीशी लाज राखली जावी.

हा असभ्यपणा लेखनावरच थांबत नाही. रक्तपात, मृत्यू, उत्पात यांविषयीची भीतिदायक किंवा किळसवाणी छायाचित्रे दिली जातात. अपराधवार्तांना वाहिलेली नियतकालिके प्रेतागारात फेरफटका मारून आणतात. जे हिंसेबाबत, तेच शृंगाराबाबत. सिनेअभिनेत्रींची छायाचित्रे नगण्य वस्त्रांत, किंवा पूर्णवस्त्रांत पण आह्वानात्मक शरीरावस्थांत छापली जातात. ही लेखासोबत संदर्भासाठी असतात असे नाही. काही वेळा चित्रासाठी चित्र असते. काही वृत्तपत्रे व नियतकालिके अशा चित्रांचा नियमित रतीबच घालतात. या स्तंभांची 'दिन-सखी' किंवा अशी नावे असतात. काही वाचक (दर्शक) केवळ या चित्रांसाठीच ही वृत्तपत्रे खरीदतात. अलीकडे वृत्तपत्रांनाही कृष्णधवल छपाईने भागेलसे वाटत नाही. मुखपृष्ठ किंवा काही पृष्ठे जाहिरातींच्या मिषाने रंगीत होऊ लागली आहेत. साप्ताहिक पुरवणीत लेखनापेक्षा चित्रांवरच भर असतो, व रंगीत छपाई नसेल तर साप्ताहिक मागासलेले समजले जाईल अशी परिस्थिती आली आहे. पुस्तकरूपी साप्ताहिकांना ही चैन परवडत नाही. त्यांचा कागदही सुमार दर्जाचा असतो. पण हे दारिद्य गुळगुळीत वेष्टनात लपवलेले असते. वेष्टन रंगीत चित्रमय लागते, व ते चित्र स्त्रीचे नसेल तर नियतकालिकाला वाचकांचा प्रतिसाद कदाचित मिळणार नाही. याप्रमाणे उच्चभ्रू व प्रतिष्ठित नियतकालिकेही खपाच्या लोभाने रंगीत चित्रे, स्त्रियांची छायाचित्रे उपयोजू लागली आहेत. त्यामुळे अशा गोष्टींचा नियमित रतीब चालू झाला आहे. अफवांप्रमाणे याचा परिणाम तात्कालिक वाटला तरी असा दिनक्रम चालू राहिला तर त्याचा दूरगामी अनिष्ट परिणाम वाचकांवर झाल्यावाचून राहणार नाही. येथवर नियतकालिकांच्या असत्यगामी रूपाचा विचार केला. असत्य कोणकोणत्या प्रकारचे असू शकते ते नंतर पाहूच, पण त्याआधी अशीच दूषणप्रक्रिया घडणारी इतर सर्वपरिचित क्षेत्रे पाहू, म्हणजे वैचारिक तुलना करणे सोपे जाईल.

**प्रदूषणप्रसार :**

रोगराई - अंतर्गत कारणांमुळे होणारे रोग ज्याचे त्याला होतात. 'ज्याचे कर्म त्याने भोगावे', त्याप्रमाणे विशिष्ट व्यक्तीच रोगग्रस्त होतात. आसपासच्या किंवा दूरच्या व्यक्तींना त्यापासून त्रास होत नाही. अर्थात असे दोष आनुवंशिक असतील तर त्या व्यक्तीच्या वंशजांना त्याचा त्रास होईल, तसेच त्या वंशाशी संबंध जोडणाऱ्या कुलांना त्रास होईल, पण एकूण समाजावर त्याचा परिणाम होणार नाही.

याउलट जंतुजन्य रोग संसर्गाने पसरतात. एकदा कुणाला लागण झाली की अशा रोगाची साथ सुरू होते. पूर्वी पटकी, विषमज्वर व कधी कधी प्लेग यांच्या साथी येत. जेवढा संसर्ग जास्त तेवढा साथीचा प्रसार अधिक, त्यामुळे गावात व नगरात असलेल्या गर्दीमुळे साथ चटकन पसरे. अप्रत्यक्ष सहवासामुळे हवापाण्यातून हे रोग पसरत. आता अशा साथींवर नियंत्रण मिळाले आहे; पण साथी नाहीशा झाल्या असे मात्र नाही. प्रत्यक्ष संबंधांमुळे गुप्तरोग पसरतात व आतातर 'एड्स' (AIDS) हा अनुपचारणीय रोग व्यक्तिगत आचारातून पसरतो आहे. पूर्वीच्या साथी संपर्क व संसर्ग यांमुळे येत; आता त्या अनिर्बंध संबंधांमुळे येत आहेत. समाजातील संबंध व संपर्क हे तर प्रगतीचे द्योतक मानले जातात. पण त्यातूनच साथी उद्भवतात. मानव फार मिळून मिसळून व गर्दीने राहू लागल्यामुळे रोगजंतूंचे चांगलेच फावते. रोगजंतूंच्या पसरण्यात त्यांचे नुसते टक्का दिल्यासारखे हस्तांतर होत नाही, तर त्यांची संख्या प्रत्येक संपर्कात वाढत जाते व या संख्यावाढीमुळे पुढे अनर्थ घडतो. जंतू हे वर्धनक्षम जैविक प्रदूषणच आहे. पण जंतूंशिवाय इतर प्रकारच्या प्रदूषणातही असेच दिसते.

प्रदूषण :

निसर्गात, विशेषतः जीवसृष्टीत, काहीही टाकाऊ नसते. एकाचा उत्सर्ग दुसऱ्याचे अन्न असतो. चयापचयाची चक्रे चालू असल्यामुळे समतोल राखला जातो. कुठे काही साचून राहत नाही. शेत किंवा रान कचऱ्याने भरून निरुपयोगी होत नाही. पालापाचोळा, काटक्या, मृत वृक्षाचे लाकूड काही म्हणून साठत नाही. नैसर्गिक प्रणाली एखाद्या समाजाप्रमाणे किंवा शरीराप्रमाणे संतुलन राखतात.

तसेच निसर्गात कुठल्याही जीवाचा लोकसंख्यास्फोट होत नाही. गाईने कुरणातून परतताना केलेला राडा इतर जीव निस्तरून ठेवतात. गाय गवत खाऊन संपवीत नाही, की सिंह गुरांना नामशेष करीत नाही. तसेच गावोगावच्या वस्त्यांचे सांडपाणी नदीत गेले तरी काही किलोमीटर अंतरानंतर पाणी परत शुद्ध होते. 'प्रमाणामधे सर्व काही असावे' या तत्त्वाचे या सर्व उदाहरणांत पालन होते. ते होते म्हणूनच जीवसृष्टी कोट्यवधी वर्षे टिकली आहे. मानव जरी इतरांपेक्षा जास्त उचापती करीत असला तरी या शतकापर्यंत त्यामुळे निसर्गावर विशेष परिणाम झालेला नव्हता. आता मात्र मानवाचा स्वार्थीपणा प्रमाणाबाहेर जात चालला आहे व त्याचे पारिसरिक दुष्परिणाम दिसू लागले आहेत. हे मुख्यतः दोन प्रकारचे असतात. हवे त्याचे दौर्लभ्य, व नको त्याचा प्रादुर्भाव.

सुरचना आणि गोंधळ :

सर्व जग हे सुरचना (Order) आणि गोंधळ (disorder) यांच्या द्वंद्वाने व्यापलेले आहे. रोज सूर्य नेमाने उगवतो, पृथ्वी सूर्याभोवती फिरते, ऋतू पालटतात. यावरूनच 'नेमेचि येतो मग पावसाळा । सृष्टीचे हे कौतुक जाण बाळा ।' असे कवीने म्हटले आहे. याउलट पर्वतांची झीज होते, नदी पात्र बदलते, अवर्षण किंवा अतिवर्षा होते, पेरलेल्या सर्वच बिया रुजत नाहीत, माणूस आजारी पडतो, अपघातात सापडतो, म्हातारा होतो व मरतो ही सर्व गोंधळांची उदाहरणे आहेत. भौतिकशास्त्रात तापगतिशास्त्र(Thermodynmics) च्या प्रसिद्ध 2ऱ्या नियमाप्रमाणे 'कुठल्याही भौतिक प्रणालीची नैसर्गिक प्रवृत्ती सुरचनेकडून गोंधळाकडे जाण्याची असते' यावरून, 'सृष्टीतील एकूण गोंधळ वाढतच जाणार' व 'अंततः विश्वात सर्वच गोंधळच भरून राहणार ' असेही वर्तवले जाते. ही काही प्रलयगामी विश्वाची तात्त्विक कल्पना नाही. भौतिकीत गोंधळ (Entropy) मोजता येतो. तसेच एखाद्या प्रणालीत पुढे काय घडेल हे वर्तवता येते. सुरचना हा आदर्श, व गोंधळ तर त्याच्या विरुद्ध. जग हे आदर्श नाही हे आपल्याला सामान्यज्ञानाने माहीत असतेच, पण त्याला वैज्ञानिक आधारही आहे.

सर्व जग गोंधळाकडे अगतिकपणे जात असताना जीवसृष्टीत मात्र सुरचना दिसते हे भांगेत तुळस उगवण्यासारखेच आहे. जीवपेशीतल्या रासायनिक प्रणाली सुरचना वाढवीत जातात व नव्हत्याचे होते करतात. यामुळे गोंधळाच्या भौतिक तत्त्वाला बाध येतो काय ? नाही ! कारण आतली सुरचना वाढली तरी बाहेरचा गोंधळ त्यापेक्षा जास्त वाढतो. पेशी आतला गोंधळ उचलून बाहेर फेकते. यामुळेच पेशीला किंवा कुठल्याही जीवाला अलिप्त अवस्थेत जगता येत नाही. गोंधळाचे उत्सर्जन व विसर्जन करण्यासाठी परिसराचा उपयोग करून जीव 'आत कीर्तन बाहेर तमाशा' अशी स्थिती निर्माण करतात.

ही सुरचना अर्थातच जनुकांमध्ये सांकेतिक स्वरूपात असते. त्यातूनच 'कचऱ्यातून कला' कशी करावी याचे ज्ञान मिळते. असे असले तरी जनुकरचनेतही गोंधळ उडत असतात, चुका होत असतात. त्यावर उपाय म्हणून अशा चुका हुडकून दुरुस्त करण्याच्या प्रणाली देखील कार्यरत असतात. आपल्या शरीराच्या प्रत्येक पेशीत असा प्रचंड उपद्व्याप अव्याहत चालू असतो, पण आपल्याला त्याची यत्किंचितही जाणीव होत नाही व आपले त्यावर नियंत्रणही नसते. आपण आपल्या शरीराचे स्वामी असतो पण नियंत्रक नसतो, त्यामुळे या नियंत्रणहीन स्वामित्वाचा विशेष अहंकार बाळगण्यात काही अर्थ नाही.

जैवरासायनिक प्रक्रिया मूलतः भौतिक असल्यामुळे त्यांच्यात गोंधळ उडणे अपरिहार्य आहे. याचे विविध दुष्परिणाम दिसतात. पेशी किंवा जीव बिघडू शकतो, जसा माणूस आजारी पडतो. निरामय जीवन जगला तरी वृद्धत्व काही कुणाला चुकत नाही. शरीरातील पेशींचे आयुष्य पूर्ण शरीरापेक्षा कमी असते. म्हणजे काही पेशी मरून त्यांची जागा नवीन पेशी घेत असतात. मज्जापेशी सोडून इतर सर्व

पेशी अल्पायुषी असतात. मज्जापेशी आधी मरत नाहीत, व मेल्या तरी त्यांची जागा भरून येत नाही. त्यामुळे मेंदूतील हानी भरून येत नाही. एकंदरीत शरीरातल्या पेशींमध्ये विघटनात्मक बदल होत जाऊन वृद्धत्व येते व शेवटी मृत्यू येतो. हा झाला गोंधळातून प्रलय. पण व्यक्ती मेली तरी वंश मात्र टिकतो, कारण पुढची पिढी निर्माण झालेली असते.

बिरबलाच्या एका कथेत एक शेजारी, मालकाकडून भांडी उसनी घेऊन जातो. काही दिवसांनी तो काही छोटी भांडी मालकाला आणून देतो व म्हणतो, '' तुमची भांडी व्यायली, त्यांची ही मुले.'' नंतर काही दिवसांनी मालकाने मूळ भांडी परत मागितल्यावर शेजारी सांगतो, ''तुमची भांडी मेली, आता ती परत मिळणार नाहीत.'' बिरबल निवाडा करतो, की भांडी जर व्यायली असतील तर ती मरणार हे मान्य केलेच पाहिजे. तात्पर्य जन्म आणि मृत्यू या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

जो जन्माला आला तो मरणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. मानव (व्यक्ती) मर्त्य आहे; पण मानवजात अमर आहे. जरामरण हे शरीराच्या भौतिक घटनेमुळे अनिवार्य असण्याची शक्यता आहे. याला कुणी ईश्वरेच्छा समजतात. पण ईश्वराचे अस्तित्व न मानता सुद्धा भौतिक नियमांनीच याचे स्पष्टीकरण देणे शक्य आहे. ईश्वरेच्छा हा निसर्गनियमांवरचा 'चेतनगुणोक्ती' अलंकार असे लक्षात घेतले की धर्म व विज्ञान यांची संगती लावता येते.

मानवच मर्त्य आहे असे नाही. सर्वच जीव मर्त्य आहेत. अक्षयवट देखील पारंब्यांच्या पुनरुज्जीवनामुळे (की नवे खोड कलम केल्यामुळे ?) दीर्घजीवी होतो. ६व्या लेखातही आपण शारीरिक अमरत्वाची सांस्कृतिक चर्चा केली. इतर पंथांचे काहीही समज असले तरी आपली संस्कृती मात्र शरीर = शीर्यते इति, म्हणजे जे झडून नष्ट होते ते, असेच समजते. शरीराला, एक भौतिक यंत्र यापलीकडे काहीएक महत्त्व नाही. मोडलेले यंत्र जसे मोडीच्याच लायकीचे असते त्याप्रमाणे मृतदेहाची भौतिक विल्हेवाट लावणेच उचित आहे. माणसाला काय कुठपर्यंत पुरते हे सांगताना 'धनानि भूमौ (धन, गाडलेले, भूमीतच राहते)... आप्त श्मशाने ...देहश्चितायाम् (देह चितेवरच सोडावा लागतो.) असे म्हटले आहे.

आधुनिक विज्ञानाने रोगांवर मात केली तशीच त्याने जरामरणावर मात करता येईल असाही एक भ्रम आहे. परंतु विज्ञानाने सर्व रोगांवर मुळीच मात केलेली नाही. आपण कर्करोगाचे ढळढळीत उदाहरण अभ्यासत आहोतच. विज्ञानामुळे आयुष्य वाढले असेही म्हटले जाते. याचा अर्थ सरासरी आयुष्य वाढले असा होतो. बालमृत्यू व रोगजन्यमृत्यू यांचे प्रमाण घटल्यामुळे हे मुख्यतः झाले. पण पूर्वी नसणारे अपमृत्यू, उदा. मोटारीचे अपघात, तसेच पूर्वी नसणारे अकाली रोग उदा. तरुणांना येणारे हृदयविकाराचे झटके हेही वाढले आहेत. जे या सुरुवातीच्या अडथळ्यांतून पार होतात ते जास्त जगतात असे विशेष दिसत नाही. अतिवृद्ध व्यक्ती पूर्वीसुद्धा असत. वृद्धत्वाच्या काही विकारांवर उपचार आहेत. पण एकंदरीत परावलंबी वृद्धत्वाचे अतिरिक्त आयुष्य फारसे लाभदायक नाही. हे सरासरी आयुष्य सतत वाढतच राहील असेही भासवण्यात येते. पण तसे होईलसे वाटत नाही. फार तर बहुसंख्य व्यक्ती सत्तरऐंशी वर्षांपर्यंत जगतील एवढेच. जरेवरच विजय मिळवता येत नाही; मग मृत्यूवर मात करणे दूरच राहिले.

वाळूच्या घड्याळातला वरचा कप्पा रिकामा व्हावा त्याप्रमाणे कालांतराने व्यक्तीचा मृत्यू व्हावा हा निसर्गनियम दिसतो व त्याला भौतिक आधारही दिसतो. यामुळे शारीरिक अमरत्व हे भौतिकदृष्ट्या अशक्य असण्याची शक्यता आहे. मानवी जनुकांची नुसते अक्षरे वाचण्यासच दहावीस वर्षे लागतील. त्यांचा अर्थ लावणे दूरच राहिले. जरेचे व मरणाचे जनुक कुठेतरी असेल व तेवढे खुडून टाकून जरामरण टाळता येईल, किंवा 'अमर रहा' अशा अर्थाचे एखादे नवे जनुक कलम करून अमरत्व मिळेल असे समजणे भ्रामक दिसते. आपल्याला जनुकग्रंथाची केवळ अक्षरओळख झाली आहे. त्यावरूनच हुरळून गेल्यास निराशा पदरी येण्याची शक्यता आहे. जनुकांच्या अभ्यासातून असे काही घडेल असे समजणे अशावादी असेल, पण वास्तववादी नसेल.

आधुनिक विज्ञान भौतिकवादी असल्यामुळे शरीररूपी यंत्रावर त्याची फार भिस्त आहे. शरीर म्हणजेच माणूस अशी सोयीस्कर व्याख्या रूढ केली जात आहे.

त्यामुळे शरीर टिकवले तर माणूस अमर होईल असे ओघानेच वाटते. पण शरीराची सुरचना झाली म्हणजे त्यात गोंधळही उद्भवणारच हे भौतिक सत्य आहे. खरे म्हणजे मानवी जीवनाचा साकल्याने विचार केला तर शरीर हे केवळ साधन आहे, साध्य नाही. 'शरीरमाद्यम् खलु धर्मसाधनम्' शरीर हे आद्य साधन असले तरी साध्य 'धर्म' आहे. शरीर शक्य तितके नीट वापरून मानसिक व वैचारिक कार्य करणे हे श्रेयस्कर आहे. मृत शरीरात मसाले भरून ते मोठ्या भौतिक थडग्यात, उदा. पिरॅमिड, ठेवणे हे अप्रगल्भतेचे दिसते. याउलट विचार व भाषा यांना संहितेतून, उदा. वेद, टिकवणे हे जास्त प्रागतिक दिसते व त्यातूनच संस्कृती टिकेल.

शारीरिक अमरत्वाची भौतिक अशक्यता व सांस्कृतिक अनावश्यकता आपण पाहिली. आता जन्ममृत्यूचा जैविक अर्थ पाहू. जीव हा भौतिक जडसृष्टी व सांस्कृतिक चेतन सृष्टी यातला दुवा आहे. भौतिक कारणांमुळे शरीर मरणार हे निश्चित, पण वंशसातत्य रहावे म्हणून शरीरपेशींपासून बीजपेशी निराळ्या काढल्या जातात. स्त्रीपुरुष बीजांच्या संयोगातून नवीन जीवशरीर निर्माण होते. अमैथुनिक जीव प्रगत झालेले दिसत नाहीत. सर्व प्रगत जीव मात्र मैथुनिक सृष्टीत मोडतात. यावरून स्त्रीपुरुषभेदाचा व जैविक प्रगतीचा संबंध असावा. याला आध्यात्मिक व मानससामाजिक तसेच शारीरिक परिमाण आहे. परंतु मुळात ही योजना काही भौतिक मर्यादांवर मात करण्यासाठी झाली असावी. यातून वंशसातत्यासाठी आवश्यक ती सुरचना राखली जात असावी. याउलट वाढत्या क्लिष्टतेबरोबर गोंधळ वाढल्यामुळे अमैथुनिक जीव उदा. जंतू बिचारे एकटेच मागासलेले राहून गेले आहेत. पुढे उत्क्रांतीचा अभ्यास करताना यातील मर्म ध्यानात येईल.

भौतिक गोंधळ हा जीवनास घातक ठरतो. भौतिक जग आदर्श सुरचनात्मक असते तर काय झाले असते? जीव अमर झाले असते काय? देव अमर असतात, ते स्वर्गात राहतात व पुण्यवान आत्मे स्वर्गात अमरत्व उपभोगतात अशी कल्पना आहे. शरीर अस्तित्वात असताना कुणी गोंधळाला आळा घालू शकले तर हे शक्य म्हणता येईल. परंतु अशा आदर्श जगात जीव मुळी अस्तित्वातच आले नसते! जीव हे एकदम जन्माला न येता निर्जीव रसायनांतून उत्क्रांत झाले आहेत. तसे होण्यासाठी एकामागून एक पिढ्या व्हायला हव्यात म्हणजे जरामरण हवेच. याशिवाय पिढ्यापिढ्यांत भेद हवा, तर निवडीला वाव राहील. हा भेद गोंधळातूनच निर्माण होतो. अशा रीतीने भौतिक गोंधळ व सुरचना या द्वंद्वातून जीवोद्गम व जीवोत्क्रांती झाली आहे. जन्ममृत्यू हे जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. नुसत्या जगण्यापलीकडे प्रगती साधायची असेल तर गोंधळ न करता क्लिष्टता साधली पाहिजे. त्यासाठी जोडीने काम करून एकमेकांतील उणिवा दूर करीत राहिले पाहिजे. हे स्त्रीपुरुष द्वंद्वाने साध्य होते. स्त्रीपुरुषभेद हा शारीरिक उत्क्रांतीचाही महत्वाचा घटक आहे. कदाचित तो मानसिक उत्क्रांतीचाही महत्त्वाचा घटक असू शकेल. सिगमंड फ्रॉइडची मनोविश्लेषणप्रणाली (Psychoanalysis) स्त्रीपुरुषविचारातच सर्व काही शोधू पाहते. आधुनिक माध्यमेही भ्रष्टपणे हेच करतात. पण विकृतीपेक्षा संस्कृतीसाठी स्त्रीपुरुषभेद महत्त्वाचा असेल.

सुरचना व गोंधळ यांमुळे जन्ममृत्यू व मुळात जीवोद्भव व उत्क्रांती घडते. वंशजनन व वंशसातत्यासाठी ही जोडी महत्त्वाची आहे, पण वंशाप्रमाणे व्यक्तिजनन व व्यक्तिजीवन यासाठीही ती तितकीच महत्त्वाची आहेत. वंशसातत्य हे बीजपेशींमुळे राहते व त्यात जनुकांच्या सुरचनेला महत्त्व असते. जनुकांमध्ये सुधारणा झाली किंवा भर पडली तर सुरचना वाढते व उत्क्रांती होते. याउलट जनुकांत विकृती वा त्रुटी निर्माण झाल्या तर गोंधळ वाढून अध:पतन होते. यामुळे वंशघातही होऊ शकतो.

शरीरपेशीमध्ये सर्व जनुके असली तरी ती पेशीविभाजनाच्या सवयीतून झालेली असतात. प्रत्यक्षात त्यातली बरीचशी निःष्क्रिय असतात. परंतु पेशीच्या उर्वरित भागात विविध जीवरसायने असतात. यात साध्या $CO_2$, $H_2O$ (पाणी) यांपासून ग्लुकोज इ. शर्करा, अमिनो आम्ले व प्रथिने इ. चा समावेश असतो. सोप्यातून क्लिष्ट रेणू तयार केल्यास सुरचना होते याला संघटन (Synthesis) म्हणतात. अशा जैवरासायनिक प्रक्रियांना अनुक्रमे चय (Anabolism) व अपचय (Catabolism) म्हणतात. पेशीत दोन्ही

(पान क्र. ३६ वर)

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (६)
# दक्षिण भारतीय शैलीचे देवालय

डॉ. र. पु. कुलकर्णी

दक्षिण भारतीय शैलीचे म्हणजे द्राविड पद्धतीचे देवालय अनेक मजल्यांचे असते. अनेक मजली प्रासाद हे द्राविड पद्धतीच्या देवालयाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. शेवटच्या मजल्यावर ग्रीवा म्हणजे कंठ किंवा मान हा काहीसा अरुंद विभाग असतो, त्यावर मस्तकाप्रमाणे असलेले घुमटाकार शिखर असते. या शिखराला जरी घुमटाकार म्हटलेले असले तरी याचा आकार ताजमहालावरील घुमटाप्रमाणे नसतो. ताजमहालावरील घुमटाची उंची त्याच्या जास्तीत जास्त रुंदीपेक्षा जास्त आहे. याउलट द्राविड प्रकारच्या देवालयाच्या शिखराची रुंदी त्याच्या उंचीपेक्षा जास्त असते. हा या दोन घुमटाकृती शिखरांमध्ये फरक आहे. शिखरावरती कळस असतो त्याला 'स्थूपि' किंवा 'स्तूपि' म्हणतात.

'समरांगण सूत्रधार' तसेच 'अपराजितपृच्छा' या प्रामुख्याने उत्तर भारतीय शैलीच्या देवालयांची माहिती देणाऱ्या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत एकदोन अध्याय द्राविड शैलीच्या प्रासादांची माहिती देणारे असतात. या ग्रंथांतही द्राविड प्रकाराचे देवालय म्हणजे अनेक मजली देवालय असेच त्याचे वर्णन येते. या ग्रंथांत द्राविड शैलीच्या देवालयाच्या उंचीरुंदीच्या प्रमाणाबद्दल एक फार वैशिष्ट्यपूर्ण विधान केलेले आढळते. त्यात दिले आहे की, द्राविड प्रासादाच्या उंचीत त्याच्या चौथऱ्याची (Plinth) म्हणजेच अधिष्ठानाची व कळसाची उंची धरली नाही तर प्रासादाची उंची /प्रासादाची रुंदी यांचे परस्परांतील प्रमाण $\sqrt{२}$ (=१.४१४) इतके असते; प्रासादातील मजल्यांची संख्या कितीही असली तरी हे कायम राहते असेही ते म्हणतात. आज दक्षिण भारतात जी द्राविड शैलीची देवालये उभी आहेत त्यांच्या उंचीची व रुंदीची मापे घेऊन या विधानाप्रमाणे द्राविड प्रासाद खरोखरच बांधतात का याचा तपास करावयास हवा.

द्राविड शैलीच्या देवालयांना 'षड्वर्ग' देवालये असेही म्हणतात; कारण त्यांचे सहा प्रमुख अवयव असतात. सर्वांत खाली चौथरा म्हणजे अधिष्ठान असते. याचे अनेक थरविभाग असतात. यावरती येतात खांब, हा 'स्तंभवर्ग'. खांबांच्या आधारावर उभ्या व आडव्या तुळ्या येतात, त्यांना 'प्रस्तर' म्हणतात. शिखराखाली असलेला अरुंद भाग याला कंठ म्हणतात, हे चवथे अंग. त्यावर असते ते शिखर व त्यावर असलेली स्तूपी म्हणजेच कळस हे अनुक्रमे पाचवे व सहावे अंग होत. या प्रासादाला हे सहा प्रमुख अवयव असल्याने त्याला षड्वर्ग प्रकारचा प्रासाद म्हणतात. द्राविड शैलीच्या प्रासादांचा 'चतुर्वर्ग' असाही प्रकार आहे. या प्रासादाला प्रस्तरवर्ग नसतो. तसेच कण्ठवर्ग देखील नसून याचे शिखर हे घुमटाकृती नसून उतरत्या छपराप्रमाणे असते, कौलारू घराला जसे उतरते छपर असते. या छपराला जे दांडे (rafters) असतात त्यांना 'लुपा' म्हणतात म्हणून छपराच्या या प्रकाराला 'लुपाकार' शिखर असेही म्हणतात. असे शिखर असलेल्या देवालयाला वरती कळस (अनेक कळस) स्तूपी असतात. तेव्हा या देवालयाला फक्त चार प्रमुख अवयव (अधिष्ठान, खांब, छप्पर व स्तूपी) असल्याने ते 'चतुर्वर्ग' प्रकारात मोडते.


द्राविड प्रासादाची माहिती देताना प्रथम अधिष्ठान ते स्तूपी या सहाही वर्गांची माहिती देतो, आणि त्यानंतर द्राविड प्रकारच्या देवालयांचे प्रमुख प्रकार, त्यांचे उपप्रकार वगैरे माहिती देऊ.

**अधिष्ठान वर्ग :**

द्राविड प्रासादाच्या अधिष्ठानाची उंची प्रासादाच्या मजल्यांच्या संख्येवर अवलंबून असते. अधिष्ठानाची उंची प्रासादाच्या मजल्यांची संख्या जशी वाढते तशी उत्तरोत्तर वाढत जाते. द्राविड प्रासाद तीन मजली असेल तर त्याच्या अधिष्ठानाची उंची १ १/४ हात ठेवावी असा नियम 'मयमत'


तसेच 'शिल्पराग' या द्राविड पद्धतीच्या शिल्पशास्त्राची माहिती देणाऱ्या पुस्तकांत दिला आहे. येथे १ हात = १ १/४ अंगुले = १/२ मीटर असे लांबीच्या मापाचे कोष्टक लक्षात ठेवावयास हवे. तेव्हा तीन मजली प्रासादाच्या अधिष्ठानाची उंची १/४ मीटर ठेवावी. मजल्यांची संख्या जशी वाढेल तशी अधिष्ठानाची उंची प्रत्येक मजल्यासाठी १२ किंवा ६ अंगुलांनी (१ अंगुल = २ सें. मी.) वाढवावी. तेव्हा देवालयाच्या मजल्यांची संख्या चार असेल तर अधिष्ठानाची इंची २ १/४ किंवा २ हात (१.१२५ किंवा १ मी.) ठेवावी. अशाच रीतीने १२ मजली प्रासादाच्या अधिष्ठानाची उंची १२ अंगुलांनी की ६ अंगुलांनी (२५ किंवा १२ सें. मी.ने) वाढवावयाची हे स्थपतीच्या सौंदर्यदृष्टीच्या अनुषंगाने ठरते, किंवा स्थपती जर मयमताप्रमाणे देवालय बांधत असेल तर तो या काळात मयमताने दिलेले मत (वाढ ६ अंगुलांनी) योग्य समजून त्याप्रमाणे अधिष्ठानाची उंची ठरवील.

अधिष्ठानाचे अनेक थरविभाग (mouldings) असतात. त्यातील प्रमुख थर विभागांची नावे आहेत उपान, जमती (कंठ किंवा गळ), पद्म, कुमुद, कुंभ, कपोत, कंप, कंठ, पट्टिका, अंतरित, वाजन आणि प्रती. उपान हा थरविभाग कमळाच्या पाकळीप्रमाणे असून तो अधिष्ठानाचा सर्वात खालचा विभाग असतो. पद्म हा थरविभाग त्याच्या नावाप्रमाणे कमळाच्या पाकळीप्रमाणे असतो. उरलेले कंप ते प्रती हे थरविभाग हे पट्टाप्रमाणे असतात. यातील कुमुद हा थरविभाग महत्वाचा आहे. याचा आकार गोलाकार असतो किंवा तीन पट्ट मिळून त्याचा आकार होतो. गोलाकार कुमुदाला वृत्तकुमुद म्हणतात व तीन पट्टांनी मिळून होणाऱ्या कुमुदाला अष्टाश्र, त्रिवर्ग किंवा त्रिपट्ट कुमुद म्हणतात. कुंभ या थरविभागाचा आकार त्याच्या नावाप्रमाणे मडक्यासारखा किंवा घटाकार असतो. कपोत या थराचा आकार कबुतराच्या चोचीसारखा असतो. या थर विभागांच्या आकारांची कल्पना आकृती १ पाहून येऊ लागेल.



आकृती १ अधिष्ठानाचे थरविभाग

अधिष्ठानांचे वर्गीकरण तीन प्रकारांत होते. मंचक, पादबंध व प्रतिबंध. मंचक प्रकारच्या अधिष्ठानात 'पद्म' थरविभाग नसतो. पादबंध व प्रतिबंध प्रकारच्या अधिष्ठानांत 'पद्म' थरविभाग असतो, त्याशिवाय 'कुमुदा' चा थरविभाग असतो. या दोन प्रकारच्या अधिष्ठानांत मुख्य फरक होतो तो 'कुमुदा' च्या थरविभागामुळे. पादबंधातील कुमुद हे अष्टाश्र म्हणजेच त्रिपट्ट प्रकारचे असते तर प्रतिबंधातील कुमुद हे वर्तुळाकृती असते.



आकृती २. मंचक व प्रतिबंध

आकृती २ मध्ये शिल्परागात वर्णन केल्याप्रमाणे मंचक व प्रतिबंध प्रकारच्या अधिष्ठानांचे थरविभाग (mouldings) दाखविले आहेत. मंचकात 'पद्म' चा थरविभाग नाही व प्रतिबंध प्रकारच्या अधिष्ठानातील 'कुमुद' वृत्ताकार

आहे हे लक्षात घ्या. आता तुम्ही जेव्हा एखादे जुने हेमाडपंती दगडाचे देऊळ बघाल, उदाहरणार्थ अंबरनाथ येथील शंकराचे देऊळ, तेव्हा त्याच्या अधिष्ठानाचे नीट निरीक्षण करा व ते कोणत्या प्रकारचे आहे, त्यातील थरविभागांची नावे काय असतील हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

दक्षिणेकडील द्राविड पद्धतीच्या देवालयांच्या अधिष्ठानांचा अभ्यास करताना असे आढळून आले, की पादबंध तऱ्हेचे अधिष्ठान तेथील स्थपतींना अधिक पसंत होते, कारण त्रिपट्ट प्रकारचे कुमुद हा थरविभाग असलेले पादबंध तऱ्हेचे अधिष्ठान येथील बहुतांश देवालयांसाठी वापरलेले आढळून येते.

या अधिष्ठानाच्या तीन प्रकारांपैकी मंचक प्रकारच्या अधिष्ठानात थरविभागांची संख्या कमी असते, तसेच ते निरनिराळ्या आकारांच्या पट्टांनी बनलेले असते त्यामुळे त्याच्यासाठी दगडाची घडई देखील ऐवढी अवघड नसते. या दोन्ही कारणांनी हे अधिष्ठान बांधण्यास सर्वात कमी खर्च येतो. त्यामानाने पादबंध व प्रतिबंध प्रकारची अधिष्ठाने अधिक खर्चिक असतात. त्यातही प्रतिबंध प्रकारचे अधिष्ठान सर्वात जास्त खर्चिक असते , कारण त्यात असलेल्या थरविभागांची संख्याच जास्त असते असे नव्हे, तर त्यातील जे पट्टांचे थरविभाग आहेत त्यावर अनेक तऱ्हेची नक्षी कोरलेली असते. सिंहमुख, किंवा हंसपक्षी यांची लांबलचक रांग या पट्टांवर कोरलेली असते. याशिवाय फुले, पाने, वेली यांच्या अनेक प्रकारच्या नक्ष्या त्याच्या निरनिराळ्या थरविभागांवर कोरतात. तेव्हा साहजिकच प्रतिबंध तऱ्हेचे अधिष्ठान बांधण्यासाठी बराच खर्च येतो.

स्तंभवर्ग :


अधिष्ठानाच्या वरती खांब उभारतात. खांबांचे दोन प्रकार आहेत. एक प्रकार म्हणजे मोकळा स्तंभ व दुसऱ्या प्रकारचा खांब हा भिंतीत असतो. भिंतीच्या बाहेर त्याची एक बाजू येत असल्याने या खांबाचे भिंतीमधले स्थान समजते. या खांबाला 'कुडम स्तंभ' (pilaster) म्हणतात. कुडम म्हणजे भिंत व हा भिंतीतील खांब म्हणून त्यास 'कुडमस्तंभ' नाव दिले आहे. खाली खांबांच्या निरनिराळ्या अवयवांची माहिती दिली आहे ती काही प्रमाणात कुडमस्तंभाला देखील लागू होते.

सामान्यतः खांबाची उंची ही अधिष्ठानाच्या उंचीच्या दुपट्ट असते. हे मत 'काश्यपशिल्प', 'मरिचि संहिता' यात दिले आहे. मात्र मयमताप्रमाणे खांबांची उंची अधिष्ठानाच्या उंचीच्या २, २१/२ किंवा ३ पट देखील असू शकते. परंतु अधिष्ठानाच्या दुप्पट खांबांची उंची हा नियम अधिक सर्वमान्य आहे व बहुतेक देवालयांत खांबाची उंची अधिष्ठानाच्या उंचीच्या दुप्पट असते.

द्राविड प्रासाद एक ते बारा मजली असतो. प्रत्येक मजल्याला खांब व प्रस्तर असे दोन विभाग असतात. येथे देखील प्रस्तराच्या उंचीच्या दुप्पट उंची त्या प्रस्तरावर जो खांब असतो त्याची असते. खांबाची रुंदी त्याच्या उंचीच्या १/८, १/९ किंवा १/१० असते. दुसऱ्या काही शिल्पशास्त्राच्या ग्रंथांनुसार खांबाची रुंदी त्याच्या उंचीच्या १/६, १/७, १/१० किंवा १/१२ इतकी देखील असू शकते. अर्थात हे खांब दगडाचे बनविलेले असतात. दगड जर मजबूत असेल, ग्रॅनाईट सारखा, तर खांबाची रुंदी त्याच्या उंचीच्या १/१२ इतकी कमी घेता येते. पण महाराष्ट्रात सापडणाऱ्या काळ्या दगडाचा (trap किंवा basalt) खांब करावयाचा असेल तर या खांबाची रुंदी त्याच्या उंचीच्या १/७ इतकी जास्त ठेवतात. याशिवाय तुम्ही जर खांबांचे नीट निरीक्षण केले तर तुम्हाला आढळून येईल की खांबाची रुंदी खालपासून वरपर्यंत कमी कमी होत जाते. खांबाच्या वरच्या टोकाची रुंदी ही त्याच्या खालच्या पायापासच्या रुंदीपेक्षा १/८, १/६, १/१० किंवा १/१२ ने कमी असते. म्हणजे खांबाची पायाची रुंदी क्ष असेल तर वरच्या अग्राची रुंदी ७/८ क्ष, ५/६ क्ष, ९/१० क्ष, १०/११ क्ष किंवा ११/१२ क्ष असते. कुडमस्तंभाची रुंदी ही खांबाच्या रुंदीच्या १/२, ३/४ किंवा १/४ असते. खांबाच्या रुंदीची कल्पना अंगुल मापातही दिली आहे. समजा बारा मजली प्रासाद आहे तर सगळ्यात खालच्या मजल्यावरील (Ground Floor) खांबांची रुंदी २८ अंगुले (५६ सें.मी) ठेवावी व प्रत्येक मजल्याच्या खांबांची रुंदी सहा अंगुले (१२ सें. मी) ठेवावी अशीही माहिती मयमतात दिली आहे.

आता देवालयांतील खांबांच्या अवयवांची माहिती घेऊ. आकृती ३ मध्ये खांबांचे अवयव दाखविले आहेत. खांबाच्या सगळ्यात खालच्या भागाला मूल व वरच्या


भागाला, म्हणजे कुंभ किंवा घट दाखविला आहे त्याच्या खाली असलेल्या भागाला, कंठ म्हणतात. याच्यावर घट, त्यावर फ लिका, वीरकाण्ड व बोधिका किंवा पोतिका हे अवयव येतात.



आकृती ३ खांबाचे अवयव

द्राविड पद्धतीच्या खांबाच्या उंचीचे, म्हणजे मुळापासून बोधिकेच्या वर पर्यंतच्या उंचीचे, ४५ भाग करतात. यात मुळाची उंची दोन भाग, त्यावरील कंठ २२ भाग उंचीचा असतो. त्यावर असलेल्या कलश घट किंवा कुंभ या अवयवाची उंची ८ भाग, फलिका ५ भाग, वीरकाण्ड ४ भाग व त्यावरील बोधिकेची उंची पुन्हा चार भाग असते. खांबाचे जे वरचे टोक त्याची म्हणजे कंठाची रुंदी तिला दण्ड म्हणतात. ही रुंदी कशी ठरवितात ते आपण वर पाहिलेच आहे. खांबाच्या मुळापाशी त्याची रुंदी √२ दण्ड असते. कंठाची रुंदी साहजिकच एक दण्ड असते. त्यावर जो घटाचा विभाग येतो त्याचे चार प्रकार आहेत व ते त्यांच्या उंचीवरून ठरवितात. घटाची उंची १ १/४ दण्ड असेल तर त्याला 'श्रीकर' घट म्हणतात. हीच उंची जर १ १/२ दण्ड, १ ३/४ दण्ड किंवा २ दण्ड असली तर अनुक्रमे त्यांना चन्द्रकान्त, सौमुख्य आणि प्रियदर्शन घट म्हणतात. घटाच्या वर फलिका(abacus) असते. हिची रुंदी घटाच्या जास्तीत जास्त रुंद भागाच्या √२ पट असते. तिची उंची ३/४ दण्ड असते. फलिकेची लांबी जर ३, ३ १/२ किंवा ४ दण्ड असेल तर ती फलिका अनुक्रमे कनिष्ठ, मध्यम व श्रेष्ठ प्रकारची असते. वीरदण्ड हा एक दण्ड लांब व रुंद असतो. व त्याची उंची ३/४ दण्ड असते. त्याच्यावर बोधिका (capital) हा खांबाचा अवयव असतो. मापाप्रमाणे तिचे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार होतात. खांबाच्या मूलाच्या रुंदीच्या १ १/४ पट रुंदी असलेली, रुंदी इतकीच उंची असलेली व ५ दण्ड लांबीची बोधिका श्रेष्ठ प्रकारची समजतात. खांबाच्या मुळाइतकीच रुंदी असलेली, रुंदीच्या २/३ उंच व ४ दण्ड लांबीची बोधिका मध्यमप्रकारची असून एक दण्ड रुंद, १/२ दण्ड उंच व ३ दण्ड लांबीची बोधिका कनिष्ठ दर्जाची असते. खांबाच्या बोधिकेवर नक्षी काढलेली असते.


खांब जर मुळापासून कंठापर्यंत चौरस असेल तर त्यास 'ब्रह्मकान्त' म्हणतात. खांब जर मुळापासून कंठापर्यंत अष्टकोनी किंवा वर्तुळाकृति असेल तर त्याला अनुक्रमे 'विष्णुकान्त' व 'रुद्रकान्त' म्हणतात. खांबाच्या उंचीचे तीन सारखे भाग करून त्याचा खालचा एक तृतीयांश भाग चौरसाकृती असतो, मधला एक तृतीयांश भाग अष्टकोनी व वरचा एक तृतीयांश भाग वर्तुळाकृती असतो. अशा खांबाला 'शिवच्छंद' म्हणतात. खांबाच्या उंचीत खालून वरती प्रथम चौरस, मग अष्टकोनी, त्यानंतर वरती १६ कोनी त्याच्यावर पुन्हा अष्टकोनी व नंतर वर्तुळाकृती असे आकार असतील तर त्याला श्रीखंड स्तंभ म्हणतात. या खांबांपैकी काही खांब आकृती ४ मध्ये दाखविले आहेत.



आकृती ४ स्तंभांचे काही प्रकार

प्रासादाचा खांबाचा भाग हा भिंतीचाही भाग असतो. तेव्हा प्रासादाच्या भिंतीची माहिती पाहू. द्राविड शैलीच्या देवालयाची भिंत, प्रामुख्याने तळमजल्याची भिंत, ही नक्षीदार कोनाडे व त्यांच्यात असलेल्या सुंदर मूर्ती यांनी सजवितात. हे कोनाडे एवढे मोठे असतात की माणसाच्या उंचीइतकी उंची असलेल्या मूर्ती देखील त्यात ठेवता येऊ शकतात. या कोनाड्यांना खालच्या बाजूला अधिष्ठानासाठी जसे निरनिराळे थरविभाग असतात तसे थरविभाग असून ते पाने, फुले, वेली यांच्या अनेक नक्ष्यांनी सौंदर्यपूर्ण केलेले असतात. या भागाला कोनाड्याचा 'अधिष्ठान वर्ग' म्हणतात. कोनाड्याच्या दोन्ही बाजूंना अनेक, आकाराने सुंदर दिसणारे खांब असतात. या खांबांच्यावर देवालयाला जसा प्रस्तराचा अवयव असतो त्याचप्रमाणे 'प्रस्तर वर्ग' असून प्रस्तराप्रमाणे तेथील थरविभाग असतात (प्रस्तराची माहिती खाली दिली आहे) त्यावरती एक तर शिखराचा आकार कोरलेला असतो किंवा अत्यंत रुचिपूर्ण नक्ष्यांनी सुंदर दिसेल असे तोरण असते. थोडक्यात हा कोनाडा म्हणजे ज्या देवालयाच्या भिंतीवर हा कोनाडा असतो त्या देवालयाची द्विपरिमाणामध्ये (लांबी व रुंदी) प्रतिकृतीच असते. पुष्कळदा देवालयाचे शिखर पडून गेलेले असते तेव्हा हे शिखर कोणत्या प्रकाराचे असेल त्याची कल्पना या कोनाड्यावर जे शिखर कोरलेले असते त्यावरून येते. भिंतीच्या दोन खांबांमध्ये एक कोनाडा याप्रमाणे हे कोनाडे ठेवलेले असतात.

वरच्या मजल्यांवर जी भिंत असते तीवर काहीही नक्षी कोरलेली नसते, कारण एकतर ही भिंत खालून दिसत नाही व दुसरे कारण असे की या भिंतीला लागूनच पण बाहेरच्या बाजूला कर्णकूट, कोष्ठ, पञ्जर वगैरे भिंतीच्या अलंकारांप्रमाणे असलेले अवयव असतात. कर्णकूट व कोष्ठ यांची कल्पना आकृती ५ वरून येईल. देवळाच्या भिंतीच्या चारी कोपऱ्यांवर चौरसाकृती अथवा वर्तुळाकृती कूट असते. याची जागा कोपऱ्यांवर निश्चित केली असल्याने त्याला कर्णकूट म्हणतात. वरच्या मजल्याच्या भिंतीच्या लांबीच्या मध्यभागी कोष्ठ अथवा शाला असते. हे कोष्ठ आयताकृति असून त्याला लांबट ढोलाकार शिखर (barrel vault roof) असते व त्यावर अनेक स्तूपी म्हणजे कळस असतात. या कर्णकूट व कोष्ठ यांच्या वरती जो भाग दाखविला आहे तो प्रस्तराचा (तुळयांचा) आहे. आकृती ५ मध्ये जे कोष्ठ दाखविले आहे त्याच्या कळसांचे वरचे टोक या 'प्रस्तर वर्गाच्या' खालच्या बाजूपर्यंत आहे. परंतु काही वेळा या कोष्ठाची किंवा शाळेची उंची इतकी वाढवितात की कळसांचे वरचे टोक हे प्रस्तराच्या वरच्या बाजूपर्यंत असते. (आकृती ६) अशा प्रकारच्या कोष्ठाला 'सान्तरप्रस्तर कोष्ठ' म्हणतात.




आकृती ५ कर्णकूट व कोष्ठ



आकृती ६ सान्तरप्रस्तर कोष्ठ

आकृती ५ मध्ये दाखविल्याप्रमाणे या कर्णकूटाला तसेच कोष्ठाला खालच्या बाजूला, वेदी म्हणजे जणू काही त्यांचे आसन हा थरविभाग असतो. त्यावरती कंठाचा थरविभाग आहे, या कंठ विभागांत खांब व त्यांच्यामध्ये कोनाडा असतो. या कोनाड्यात मूर्ती ठेवतात. अर्थात मूर्ती असलीच पाहिजे असे नाही. या कोनाड्याला 'नासी' किंवा 'नासिका' म्हणतात. हा कोनाडा अर्थात पाने, फुले, वेली, पक्षी यांच्या अनेक प्रकारच्या रुचिपूर्ण नक्ष्यांनी अलंकारिलेला असतो. या कंठाच्या वर शिखर व स्तूपी असतात. कर्णकूटाचे शिखर त्याच्या आकाराप्रमाणे चौरस अथवा गोल असते, तर कोष्ठाचे शिखर वर सांगितल्याप्रमाणे कोष्ठाचा आकार आयताकृति असल्याने लांबट गोलाकार (barrel vault) असते.

पञ्जर या विषयाची, त्याचप्रमाणे 'प्रस्तर वर्ग' 'शिखर वर्ग' व 'स्तूपि वर्ग' यांची माहिती पुढल्या लेखांत पाहू. 'भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय' या विषयावरील हा सहावा लेख आहे. परंतु मी ही जी या विषयावर माहिती देतो आहे ती वाचकवर्गास कितपत समजते तसेच कितपत रुचते, रुची निर्माण करते, याबाबत मला काहीच कल्पना येत नाही. तसेच याबाबत वाचकांच्या जर काही सूचना असतील, उदा. विषयावरील विवेचन फार सखोल, वाचकांच्या आवाक्याबाहेर आहे, किंवा उलट विषयाची मांडणी फार वरवरची आहे अधिक माहिती द्यावयास हवी, किंवा वास्तुशास्त्राच्या अमक्या मुद्द्यावर माहिती हवी आहे अशी काही तुमची प्रतिक्रिया जर मला मिळाली तर पुढील लेखांत त्याप्रमाणे सुधारणा करता येईल.

•••

(पान क्र. १० वरून)

शिक्षण, साक्षरता व विज्ञान

प्रचीती आम्ही अनुभवत आहोत.

२० व्या शतकातील मानवाचा 'अहंकार' त्याच्या आधीच्या 'सभ्यता' व 'संस्कृती' ने केलेल्या 'प्रगतीला' योग्य तो न्याय देऊच शकत नाही. आधीच्या संस्कृत्या ह्या 'शैशवावस्था' किंवा 'बाल्यावस्थे' तील परिस्थिती म्हणून धरल्या जातात (period of infancy) व 'प्रगती' ही श्रेणीयुक्त (linear) आहे असा समज करून दिला जातो. खरे म्हणजे इथे तरी तटस्थता सुटलेलीच असते. भारतासारख्या अत्यंत प्राचीन परंपरा असलेल्या देशाने, आपल्याकडे एवढी अपराधीपणाची, 'मागासलेपणाची' भूमिका घेणे हे त्याच्या पूर्वसंस्कृतीवर घोर अन्याय करणारे आहे. एवढेच नाही तर त्याच्या भविष्याकरिताही हे अत्यंत घातक ठरणार आहे.

अमेरिका आदी देशांचे 'प्रगतीचे', यशाचे 'निर्देशांक' जेवढे धोकादायक आहेत तेवढेच सिद्धान्तवाद्यांच्या 'विज्ञान', 'मानवतावाद' इ. घोषणा शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये प्रवेश करू देणे अहिताचे आहे. काही मूलभूत संकल्पनांमधील प्रचलित फसवेपणाचा मी येथे ऊहापोह केला आहे. 'शिक्षण'ला अधिक 'सृजनशील' करायचे असेल तर आजच्या या फसव्या 'साक्षरतावाद', 'विज्ञानवादाच्या' पलीकडे जाऊन, व्यापक मानवी अनुभव देणारे व जीवनमूल्यांकडे घेऊन जाणारे 'शिक्षण' आणि ते देणारा 'शिक्षक' आपल्याला निर्माण करावा लागेल. भारत आजही 'अप्रगत' देश नाही, पूर्वीही कधी नव्हता आणि पुढे त्याला 'प्रगति' पथावर न्यायचे असेल तर 'प्रगती'च्या व्याख्या आपल्याला पुन्हा तपासून घ्याव्या लागतील. सध्याच्या सर्वच 'शिक्षण' संकल्पनामध्ये 'आमूलाग्र' बदल घडवून आणावा लागेल.

(मूळ संहिता मो. ह. विद्यालय स्मरणिका 'मंथन', १९९२ मध्ये प्रकाशित.)

•••

# स्मृती : मेंदू संबंध किती ?

**श्री. वसंत वि. अकोलकर**

मानसशास्त्र असे सांगते की आपल्या इंद्रिय अनुभवांचे ठसे (traces), मेंदूपेशीं मध्ये साठवले जात असतात. अर्थात त्या ठशांचे अस्तित्व अनुमानानेच मान्य करावे लागते; त्यांचे स्वरूप अद्यापि मानसशास्त्रज्ञांना समजलेले नाही. मेंदूतील निरनिराळी साहचर्य क्षेत्रे (association -areas) विद्युत लहरींनी उद्दीपित केली की पूर्वीचे अनुभव आठवू लागतात हे Wielder Penfield यांनी प्रयोगाद्वारे दाखवून दिलेले आहे.

मेंदूच्या स्मृतिक्षेत्रांना इजा झाली तर स्मृती लोप पावते. वृद्धपणी जर मेंदूच्या पेशी क्षीण झाल्या तर देखील स्मृती लोप पावते. दोष उत्पन्न होतो. या गोष्टींमुळे स्मृतीचा मेंदूशी संबंध असतो हे स्पष्ट होते. तथापि तो संबंध कोणत्या प्रकारचा असावा हा प्रश्नही मनात आल्यावाचून राहत नाही.

संमोहन तंत्राचा अवलंब करून रुग्णांवर उपचार करीत असताना गेल्या शतकातील मनोवैद्यांच्या दृष्टोत्पत्तीस, अतींद्रिय ज्ञानाचे निदर्शक असे काही प्रकार आले होते. संमोहित व्यक्तीचे डोळे बंद असले तरीही तिला दिसू शकते, मिटलेल्या पुस्तकातील मजकूर सांगता येतो, असे मेस्मेरिझमविषयक चौकशीसाठी नेमलेल्या दोन आयोगांनी नमूद केले होते. डॉ. आझम यांनी स्वतःच्या जिभेवर ठेवलेल्या मीठ वगैरे पदार्थांची चव संमोहित अवस्थेतील स्त्रीला जाणवली होती व त्यांनी स्वतःला घेतलेले चिमटे तिच्या शरीरास जाणवले होते. (याला organic sympathism म्हणतात). डॉ. Pierre Zanet यांनी संमोहित अवस्थेत नेलेल्या 'लिओनी' नामक स्त्रीने 'मनोमन' पॅरीसला जाऊन प्रो. चार्ल्स रिये यांच्या प्रयोगशाळेत आग लागल्याचे सांगितले होते व त्या वेळी, खरोखरीच ती प्रयोगशाळा पेटलेली होती.

संमोहित अवस्थेत व्यक्तीला तिच्या ऐहिक भूतकाळात, मागे मागे नेले जात असताना ती स्वतःच्या जन्माच्या वेळच्या घटना सांगू लागली, अशी उदाहरणे आहेत. संमोहित व्यक्ती, पूर्वजन्माचा उल्लेख करू लागल्याची निःसंदिग्ध उदाहरणेही आहेत. जन्माच्या वेळच्या घटनांची स्मृती तसेच पूर्वजन्माची स्मृती हे दोन प्रकार लक्षात घेतले की अत्यंत महत्त्वाचा असा मानसशास्त्रीय प्रश्न उपस्थित होतो. तो म्हणजे व्यक्तीच्या स्मृती पूर्णपणे मेंदूवरच अवलंबून असतात काय ?

पुढील वृत्तांत वाचकांच्या विचारांना अधिक चालना देईल. सॅन फ्रांसिस्को येथील प्रसूतिज्ज्ञ डॉ. डी. बी. चीक यांनी त्यांच्या संमोहनोपचार अनुभवाच्या आधारे असा निष्कर्ष काढला की व्यक्तीला जडलेल्या डोकेदुखीचे मूळ, प्रसूतिसमयी घडलेल्या गोष्टींमध्ये असू शकते, तसेच व्यक्तीच्या पचनाच्या तक्रारींचे मूळ तिला, प्रसूतीनंतर न दिल्या गेलेल्या स्तनपानात असू शकते

डॉ. चीक यांच्या निष्कर्षात तथ्य असेल काय हे पाहण्याच्या उद्देशाने डॉ. David Chamberlain यांनी दोन स्त्रियांवर संमोहन केले. या स्त्रियांना भयगंड (phobia) नामक सौम्य मनोविकृती होती. एकीला वयाच्या चौदाव्या वर्षी विमानात बसण्याचा योग आला होता व तेव्हापासून तिला विमान कोसळण्याची व विमानाच्या उड्डाणाची अवाजवी भीती वाटू लागली होती. तिला संमोहित अवस्थेत नेले तेव्हा, आईच्या पोटातून बाहेर येत असतेवेळी नर्सच्या हातातून निसटले होते, ही आठवण तिला झाली. तिच्या त्या अवाजवी भीतीचे हे मूळ तिच्या लक्षात आणून दिल्यानंतर तिची ती भीती कायमची गेली. दुसऱ्या स्त्रीला विजेच्या पाळण्याची (Lift) भीती वाटे. संमोहित अवस्थेत तिने सांगितले : - 'मला पेटी मध्ये घालून पेटीचे झाकण बंद करीत आहेत' वस्तुस्थिती अशी होती की ती जन्मल्याबरोबर तिला Incubator मध्ये ठेवण्यात आले होते.

डॉ. Chamberlain यांनी एकूण 100 cases संकलित केल्या आहेत. त्यापैकी 20 cases चा त्यांनी संपूर्ण अभ्यास केलेला आहे. D. Chamberlain : Birth

& Before : What people say about it is hypnosis (1982).

काही रुग्णांनी संमोहित अवस्थेत सांगितले : 'आईच्या शरीरापासून मला अलग केले जात होते, त्या वेळी मी व्यथित झाले.' काही जणांनी संमोहित अवस्थेत तक्रार केली की 'मला धसमुसळेपणाने हाताळण्यात आले होते.' कांही जणांनी सांगितले, 'सभोवती हजर असलेल्यांच्या उद्गारांनी माझे मन दुखावले.' एका व्यक्तीने जन्माच्या वेळचा अनुभव असा सांगितला, 'पायाचा नेट देऊन मला आईच्या पोटातून बाहेर पडता येईना म्हणून मी अंग आकुंचित करण्याचा प्रयत्न केला, पण मस्तकावर दाब पडल्यावर मी अडकलो : डॉक्टर, माझे होके ओढून काढीत आहेत. त्यांनी माझ्या जबड्यावर दाब दिला व जबडा दुखू लागला. push, push, push असे डॉक्टर ओरडत आहेत'.

ज्या अर्थी त्या व्यक्तींच्या मातांनी प्रसूतिसमयी तसे खरोखरच घडले होते असे सांगितले आहे, त्या अर्थी त्या व्यक्तींनी संमोहित अवस्थेत सांगितलेल्या घटना कल्पित (Fantasies) नसून वास्तव घटनांच्या स्मृती होत्या असे म्हणणे प्राप्त ठरते.

साहजिकच पुढील प्रश्न उपस्थित होतो. गर्भाचा मेंदू काय अथवा आईच्या गर्भाशयातून बाहेर येत असलेल्या अर्भकाचा मेंदू काय, तो तर फारच अविकसित असतो. तर मग जन्माच्या वेळच्या अनुभवाची स्मृतिरूपाने साठवण होणे कसे शक्यआहे ?

या प्रश्नाची दोन पर्यायी उत्तरे संभवतात. १) जन्म क्षणी अर्भकाचा मेंदू अनुभवांचे संस्कार ग्रहण व धारण करू शकत नाही, ही समजूत चुकीची म्हटली पाहिजे. अथवा, २) मेंदूमध्ये, जन्म झाल्यानंतरचे अनुभव, स्मृतिरूपाने जरी साठत असले तरी मेंदू हे स्मृतींचे एकमेव अधिष्ठान नसून मन हे मेंदूहून निराळे असावे व ते स्वतंत्रपणे स्मृती साठवून ठेवते असे मानले पाहिजे. आता काही विचारवंत मनाचे मेंदूहून निराळे असे अस्तित्व स्वीकारीत नाहीत-ही गोष्ट खरी आहे. उदा. G. B. Ryle यांचे शब्द वापरून सांगावयाचे तर, 'मन ही शरीराहून (मेंदूहून) निराळे मानणे म्हणजे शरीरयंत्रात एक भूत कल्पिणे (Ghost in machine) होय'. स्मृतिविषयक जे मानसशरीरशास्त्रीय प्रयोगात्मक संशोधन झालेले आहे, त्याच्या आधारे हे प्रतिपादन केले जात असते. तथापि मेंदू आणि मन यांचे अद्वैत न मानणारे म्हणजेच मेंदू आणि मन यांचे द्वैत मानणारे, मातब्बर शरीरवैज्ञानिकही आहेत. नोबेल पारितोषकाचे मानकरी सर जॉन इक्लस व Dr. Wielder Penfield ही दोन उदाहरणे देता येतील. सर्जनात्मक उत्क्रांतिवादी Bergsoan यांनी असे म्हटले आहे की 'स्मृती हा उच्च मनोव्यापार म्हणजे, क्षीण झालेले इंद्रिय संवेदन नव्हे, कारण स्मृती हे मेंदूचे कार्य नाही'. 'Brain prepares the Frame, it does not Furnish the recollections.' जन्मल्यानंतरच्या घटनांच्या स्मृती साठवून ठेवण्यास मेंदू हे साधन उपयोगी पडत असते असा या विचारवंतांचा अभिप्राय आहे. P.R. Chamberlain हे देखील म्हणतात की, 'जन्मक्षणीच्या स्मृतींशी मेंदूचा संबंध असतो असे मला वाटत नाही. त्या स्मृतींचा संबंध मनाशी असतो व मन हा प्रत्येक व्यक्तीचा अशारीरिक (non-physical) घटक असतो'.

स्मृतींच्या संदर्भात विचार करावयास लावणारा व स्मृतींचे मूळ केवळ मेंदूमध्येच असते काय असा प्रश्न निर्माण करणारा आणखी एक प्रकार आहे. तो म्हणजे काही बालकांच्या तोंडून त्यांच्या पूर्वजन्माच्या सूचक अशा गोष्टी आल्याची अनेक उदाहरणे देशोदेशी आढळलेली आहेत, व कसोशीपूर्वक तपासांती त्या गोष्टींचा प्रत्यक्ष पडताळा मिळालेला आहे. मी अमूक गावचा/ची, अमूक नावाचा, अमूक आई/वडलांचा वगैरे सांगणाऱ्या लहान मुलांना त्या गावी नेले असता त्याने (तिने) आपणहून ते घर दाखवले आणि 'त्या' कुटुंबात नेले असता, आपले नातेवाईक नावाने व नात्याने ओळखले व नात्यानुसार वागले अशी कैक उदाहरणे प्रसिद्ध आहेत.

संमोहित अवस्थेत व्यक्तीला तिच्या भूतकाळात टप्प्याटप्प्याने नेले असता ती जन्मक्षणापर्यंतच नव्हे तर पूर्वजन्मात गेली व त्या जन्मीच्या घटना सांगू लागली, अशीही अनेक उदाहरणे मानसशास्त्रज्ञांनी प्रसिद्ध केलेली आहेत. अशा केसेसमध्ये (व्यक्तीने) पूर्वजन्मीच्या म्हणून सांगितलेल्या गावाचे नाव, त्या गावातील स्थळांचे वर्णन,

नातेवाइकांची नावे, त्यांच्या जीवनातील खाजगी गोष्टी इ. सारखे काहीही त्याच्या ऐकण्यात किंवा वाचनात कधीच आलेले नव्हते याची सर्वातोपरतरी खात्री करून घेतलेली असेल तर तो प्रकार म्हणजे त्या व्यक्तीच्याच मनाच्या कडेकपारीत असलेल्या गोष्टींचे स्मरण (cryptomnesia) असू शकेल असे म्हणता येणार नाही, हे उघड आहे. अशा वेळी विचारात घेण्यासारखे तीन पर्याय उरतात, आणि त्यां पैकी कोणताही स्वीकारला तरी त्या व्यक्तीच्या तोंडून आलेल्या गोष्टींना तिच्या मेंदूत साठवलेल्या व्यक्तिगत अनुभवमूलक स्मृती म्हणता येत नाही. ती व्यक्ती खरोखरीच, स्वतःचा पूर्वजन्म आठवते आहे हा एक पर्याय होय. हा पर्याय स्वीकारला तर व्यक्तीने सांगितलेल्या गोष्टींचे मूळ तिच्या जन्मानंतरचे अनुभव स्मृतिरूपाने तिच्या मेंदूत साठवले होते असे म्हणता येणार नाही. त्या स्मृती अमस्तिष्क स्मृती (extra cerebral memory) म्हणाव्या लागतील.

पूर्वजन्मीच्या म्हणून सांगणाऱ्या व्यक्तीला, अतींद्रिय ज्ञानक्षमता विशेष प्रमाणात असावी, व इतिहास कालीन एखादी व्यक्ती त्यांचे नात-गोत, तसेच तिच्या जीवनातील प्रसंग इ. तिच्या मनःचक्षूसमोर आले असेल, आणि कल्पना व वास्तव हा भेद करण्याइतकी मानसिक पात्रता नसल्यामुळे 'त्या' व्यक्तीशी तादात्म्य पावून 'मी ती व्यक्ती होतो (होते)' असे ती व्यक्ती (मूल) बोलू लागली असेल, हे दुसरे पर्यायी स्पष्टीकरण बरेच जण देऊ पाहतात. समजा ही शक्यता स्वीकारली तरी पण मूल बोलत असलेल्या गोष्टी त्याच्या स्वतःच्या जन्मानंतर त्याने अनुभवलेल्या गोष्टी नसतात. त्यामुळे त्याच्या मेंदूने, त्या गोष्टींची साठवण केलेली असते असे म्हणताच येत नाही. तेव्हा अतींद्रियरीत्या प्राप्त झालेल्या माहितीचा प्रत्यय जरी स्मृतीच्या रूपात येत असला तरी त्या माहितीचे मूळ मेंदूमध्ये साठवून ठेवलेल्या व्यक्तिगत अनुभवांच्या संस्कारात (traces) नाही हे स्पष्ट आहे.

तिसरा पर्याय म्हणजे, कोणी दिवंगत व्यक्ती (मृतात्मा) पूर्वजन्म सांगणाऱ्या मुलाचा खरोखरीच ताबा (genuine possession) घेत असेल व ती अवस्था काही दिवस किंवा काही महिनेही टिकून राहत असेल. [ अस्सल संचार (genuine possession) व pathological possession syndrome या दोहोंत फरक करावयास हवा. कारण possession, अंगात येण्याची, काही उदाहरणे मनोविकृतीची द्योतक असतात. ]

आता 'संचार' हा पर्याय स्वीकारला तर मूल ज्या गोष्टी बोलते त्या त्याच्या स्वतःच्या मेंदूमध्ये साठवलेल्या स्मृती नसतात हे मान्य करावे लागते. त्या स्मृती व्यक्तिगत अनुभवाच्या स्मृती नसून दिवंगत व्यक्तीच्या असतात.

सारांश, स्मृतीचा मेंदूशी संबंध असतो, तो कोणत्या स्वरूपाचा असतो व कितपत असतो, हा प्रश्न चिंतनीय आहे. व्यक्तीचा मृत्यू झाला आहे असा डॉक्टरांचा निर्णय झाल्यानंतर थोड्या वेळाने ती पुन्हा जीवंत झाली व दरम्यानच्या कालावधीतील अनुभव सांगू लागली अशी १५० उदाहरणे Raymond Moody यांनी अभ्यासली आहेत: R. Moody : Life after Life 1975. अशी उदाहरणे देखील स्मृतीचा मेंदूशी कितपत संबंध असतो हा प्रश्न उभा करतात. अशा वेळी एक तर असे म्हणावे लागेल की व्यक्तीचा मृत्यू झाला आहे की नाही याचा अंतिम निकष वैद्यकशास्त्रास उपलब्ध झालेला नाही - व वैद्यकविज्ञानात या बाबतीत अज्ञान आहे. अथवा असे म्हणावे लागेल की व्यक्तीचा कायिक मृत्यू झाल्यानंतर देखील ती अनुभवक्षम राहू शकते.

• • •

# आला संतांचा मेळा

## श्री. शं. बा. मठ

### संतांचा देश

भारत हा संतांचा देश आहे. 'देव शिरी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा । ' या समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणे स्वधर्म, स्वभाषा, आणि स्वराष्ट्र यांना उजाळा देण्यासाठी संतांनी आसेतुहिमाचल प्रयत्न केले. जन सामान्यांत ईश्वरनिष्ठा जागृत करून ईश्वरी कार्यासाठी त्यांना उद्युक्त केले. ईश्वरी कार्याची संकल्पना स्पष्ट केली. सत्प्रवृत्तीचे पालन, दुष्ट प्रवृत्तीचे निखंदन आणि स्वधर्माचे आचरण हा गीतेतला विचार संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवण्याचे महत्कार्य संतांनी केले. धन्य ती भरतभूमी, धन्य तो महाराष्ट्र, इथे प्रदीर्घ काळ संतांची परंपरा निर्माण झाली. संतांनी सद्भावना आणि एकोपा याचे शिक्षण जनतेला दिले. त्यासाठी आध्यात्मिक बैठक स्वीकारली. यायोगे येथील जनजीवन सांस्कृतिक दृष्ट्या विकसित झाले. संतांनी जनतेतील सुप्त चैतन्यशक्ती जागी केली. आणि तिची विचारसरणी उच्च व उदात्त केली. ही काही अगदीच सामान्य घटना असे म्हणता येणार नाही. आपल्या विपुल अभंगाने, कवनाने, दोह्याने , भारुडाने अगदी सामान्यापर्यंत आपली शिकवण पोचविण्यासाठी त्यांनी प्रयास केला. आजही त्यांचे साहित्य आम्हा सर्वांना मार्गदर्शक ठरते आहे.

### भक्तीची सोपी व्याख्या - ईश्वरनिष्ठा

संतांच्या कार्याचा विचार करताना सर्वप्रथम त्यांच्या ईश्वर निष्ठेचा करावा लागेल. भक्ती म्हणजे दिव्य आणि उत्कट प्रभुप्रेम. भक्तीचे बीज या आर्यभूमीत अनादिकाळापासून रुजलेले आहे. वसिष्ठकृत वरुणप्रार्थनेत ऋग्वेदात हे बीज आढळते. भक्तीचा विलास हा पुरातन आहे. सगुणरूपात देवपूजा इत्यादी ज्यात नाही तो धर्म सामान्यांना समजत नाही. भगवान श्रीकृष्णांनी सामान्यांसाठी 'एखादे पान, फूल, फळ वा नुसते जल भक्तिभावाने अर्पण केल्यास त्याचा मी आनंदाने स्वीकार करतो' अशी ग्वाही दिली. अशा प्रकारे भक्तीचा पहिला पाठ समाजाला शिकवला आणि हा मार्ग सर्वांसाठी खुला असल्याचे जाहीर केले. प्रभुप्रेमाची ठेकेदारी केवळ काहींनाच नसून सर्वांनाच आहे हे उघड केले. उत्कट भक्तिभावाच्या सरितेत कोणीही खुशाल स्नान करावे असे सांगितले. अशा प्रकारे भक्तीचा झेंडा सर्वप्रथम भागवंतांनीच उभारला. तोच पुढील काळात भागवतांनी महाराष्ट्र भूमीत पंढरीच्या वाळवंटात फडकविला. त्या दिव्य प्रेमाच्या समाधीत देहभानही कसे हरपून जाते हे गोपींनीच जगाला सर्वप्रथम दाखवून दिले. किंबहुना भक्ती कशी करावी याला ' यथा व्रजगोपिकानाम्' - गोकुळातील गोपीजनांसारखी, असे उत्तर भक्तिसूत्रात नारदाने दिलेले आहे. तेच दिव्य चित्र महाराष्ट्रीय संतांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेवून अशा अजोड भक्तीची शिकवण जनतेला करून दिली.

### महाराष्ट्रीय संत

महाराष्ट्रीय संतांची उत्कट ईश्वरभक्ती, त्यांचा जाज्वल्य स्वभाषाभिमान, शिवाशीव व जातिभेद आदींचे बंड मोडण्यासाठी त्यांनी उभारलेला भागवतधर्माचा झेंडा, त्यासाठी बांधलेले कंकण, दलितापासून तहत विद्वानापर्यंत सर्वांनाच मोक्षाचे अधिकारी बनविण्याचे त्यांचे व्रत, एकाच प्रभूचे सारे भक्त आहेत असे मानून महाराष्ट्रधर्माची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी भागवत धर्माचा घातलेला पाया व त्यावर पुढील काळात महाराष्ट्रस्मितेची उठलेली उत्तुंग इमारत या साऱ्या गोष्टी एखाद्या साखळीतील दुव्यांसारख्या एकमेकीत गुंतलेल्या आहेत. हे करत असताना संतांना फार मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागले, कारण त्यावेळी या भरतभूमीत सर्वत्र यावनी सत्ता होती. परधर्म आणि परचक्र यांच्या छळाच्या जहरी विषाचा - अमलाचा - ताप सहन करण्यास तशाच प्रकारची दुर्दम्य निष्ठा संतांनी निर्माण केली. विषारी जाच सहन करण्याची क्षमता निर्माण केली. भक्तीचा - प्रेमाचा उन्माद निर्माण केला. देहासक्ती आपल्या अमोघ व दिव्य वाणीने बाजूला सारावयास लावली. सर्व जनांना भक्तिरसाने भारून टाकले. ' चहु वर्णासि नामाधिकार। नामी नाही लहान थोर। जडमूढ पैलपार। पावती नामे। ' सर्वांनाच

अशा प्रकारे दिलासा देत अगदी पददलितांच्या झोपडीपर्यंत ते जाऊन पोहोचले.

### ज्ञानदेवे रचिला पाया

काव्यात नवरसाच्या जोडीला दहाव्या शांतरसास - भक्तिरसास ज्ञानेश्वरांनी प्रथमच नेऊन बसविले. महाराष्ट्रात या भक्तीची ज्योत त्यांनीच प्रथम उजळविली आणि तिचा प्रकाश अगदी गरिबाच्या झोपडीपर्यंत पोचावा म्हणून त्यांनी ती इतर संतांच्या हाती दिली. नामदेवाने ती ज्योत पंजाबापर्यंत नेली. अशा रीतीने ज्ञानदेवांनी घातलेल्या भक्तिमंदिराच्या पायावर जी इमारत उठली तिच्यावर तुकोबारायांनी कळस चढविला. " संत कृपा झाली । इमारत फळा आली । नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार । जनार्दनी एक नाथ । ध्वज उभारिला भागवत । भजन करा सावकाश । तुका झालासे कळस । " आणि म्हणूनच "ज्ञानोबा माऊली तुकाराम" - अशा प्रकारे कृतज्ञतेने स्मरण आजही महाराष्ट्रीय जनता अत्यंत गौरवपूर्वक करीत असते.

### वारकरी पंथ

भागवत धर्मालाच महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय या नावाने संबोधले जाते. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर टिळा, आषाढी, कार्तिकी पंढरपूर व आळंदी इथे वारी, ज्ञानेश्वरी, नामदेव व तुकाराम यांच्या गाथा, एकनाथी भागवत ही यांची प्रस्थानत्रयी. तेराव्या शतकात या धर्माचा पाया प्रथम ज्ञानदेवाने घातला, नामदेवाने त्याचा विस्तार केला. सोळाव्या शतकात एकनाथांनी त्यात ओज निर्माण केले, महाराष्ट्रात भागवत धर्माचा सूर्य प्रकाशू लागला. पुढील काळात भागवत धर्माला अत्यंत पराकोटीला नेणारा एक थोर संत लाभला, त्याचे नाव तुकोबाराय. त्यांनी प्रत्येकाच्या अंतःकरणात ईश्वरनिष्ठा निर्माण केली. रामदासाने आपल्या समर्थ वाणीने संपूर्ण महाराष्ट्र खडबडून जागा केला. स्वधर्म, स्वराष्ट्र याबद्दलचा अभिमान बाळगणाऱ्या शिवछत्रपतींना स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवता येणे शक्य झाले. आणि त्याचे दृश्य फळ म्हणजेच हिंदवी स्वराज्य होय. महाराष्ट्रातील संतांची धारणा विलक्षण होती. आध्यात्मिक आणि लौकिक जीवन यात अभेद असून ती दोन्ही मानवी जीवनपूर्णतेच्या दृष्टीने आवश्यकच आहेत, तसेच भक्तीमुळे सामाजिक जीवन सुस्थिर पायावर उभे करण्यात ते यशस्वी झाले. सदाचाराने आध्यात्मिक जीवन संपन्न झाले, भौतिकतेमुळे लौकिक जीवनालाही महत्त्व प्राप्त झाले. या दोहोंच्या समन्वयाने नैतिक पायावर सामाजिक बैठक उंचावली. यामुळे सामाजिक जागरण करणे त्यांना सोपे गेले. शेकडो वर्षे रुजून गेलेल्या प्रमुख जीवनमूल्यांवर आधारित असलेली शिकवण संतांनी या देशातील लोकांना दिली. जीवनसफलतेसाठी ईश्वरनिष्ठा, मानवी जीवन सुखी करण्यासाठी जनसेवा या गोष्टींचा संतांनी पुरस्कार केला. किंबहुना जनसेवेतूनच ईश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग असू शकतो ह्याची शिकवण दिली.

### देवभक्तीतून निर्भय वृत्ती बाणविली

प्रभूच्या समाधीत देहाचा विसर पडतो. तुकोबाराय म्हणतात, 'तुका म्हणे व्हावे देहासी उदार । रखुमादेवीवर जोडावया।' देहावरील आसक्तीला तिलांजली देऊन प्रत्यक्ष मरणाला सामोरे जाण्याची धमक व महत्त्वाकांक्षा देवभक्तीतून निर्माण केली. 'वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पाया पडे।' अशा प्रकारचे अलौकिक निश्चयाचे व कट्टर दृढतेचे भक्तवीर संतांनी जन्मास घातले. काळ आपल्यासमोर उभा ठाकला असताना सुद्धा - 'आकाश कडकडोनि पाहे। ब्रह्मगोल भंगा जाये । तरी मी तुझीच वास आहे । पांडुरंगा ।' अशी कळकळीची व निर्धाराची हाक प्रभूस मारणारे - ' फुटो हे मस्तक । तुटो हे शरीर। नामाचा गजर सोडू नये । ' अगर 'देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो । ' म्हणणाऱ्या नामदेवासारखे निधड्या छातीचे संत यातून निर्माण झाले. सर्व जनांना या विचाराने भारून टाकले. संतांनी सर्व जनतेच्या ठिकाणी ही निर्भय वृत्ती निर्माण केली. ज्ञानरायांची ओवी, नामदेव, तुकोबाराय यांचे अभंग, नाथांची प्रेमळ वाणी आदी संत वाङ्मयाने भक्तीच्या उत्कट प्रेमाबरोबरच निधडी छाती निर्माण केली. शिवप्रभूंना पेरणी करता यावी यासाठी जमीन भाजून नांगरून उत्तम मशागत करून ठेविली. ही संतांची फार मोठी कामगिरी मानावी लागेल.

### महाराष्ट्रभाषेचा अभिमान

भागवत धर्माची इमारत भरभक्कम पायावर उभी करण्यासाठी जनतेच्या हृदयाची भाषा स्वीकारली. त्या भाषेत धर्मकारण राबविले. मराठी भाषेसंबंधी विलक्षण

तेजस्वी अभिमान संतांच्या ठिकाणी आढळतो. ज्ञानेश्वर म्हणतात -' माझा मराठाची बोल कौतुके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन। इये मराठीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळ करी।' ब्रह्मविद्या म्हणजे आत्मज्ञान सर्वांना त्यांच्या भाषेत शिकवले. हेच कार्य एकनाथांनी पुढे चालविले. ते म्हणतात -' देवासी नाही वाचाभिमान। संस्कृत प्राकृत त्या समान। ज्या वाणी जाहले ब्रह्मकथन। त्या भाषा श्रीकृष्ण संतोषे॥ माझी मराठी भाषा चोखडी। परब्रह्मे फळली गाढी। संत सज्जन जाणती गोडी। ह्या लागी जोडी। जोडिला ग्रंथ।' श्रीकृष्णाप्रमाणे भक्तीच्या प्रांगणात संतांनी सर्व समाजाची बाजू उचलून धरलीच, शिवाय एक पाऊल पुढे टाकून भक्ती, प्रेम ज्या भाषेत सर्वांना समजेल त्या लोकभाषेत - जनसमुदायाच्या बोली भाषेत - मराठीत - त्यांनी आपल्या ग्रंथांची रचना केली. सामान्य माणूसही मोक्षाला अधिकारी आहे असे केवळ सांगून न थांबता मोक्षाला जाण्याची साधना ज्या भाषेच्या बळावर करावयाची ती भाषाही त्यांना समजेल अशीच स्वीकारली.

### जातिभेद गाडला

संतांनी सामान्य जनांच्या बाजूने झगडा केला हे त्यांच्या औदार्यास धरूनच आहे. किंबहुना पंढरीच्या प्रांगणात, काव्यदेवीच्या मंदिरात सर्व भेदभाव हरपून जाऊन, ब्राह्मण, शिंपी, कुंभार, चांभार, न्हावी, महार, अठरापगड जाती, तसेच एकनाथ, नामदेव, गोरोबा, सेना, चोखोबा आदी संत एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून आनंदाने नाचले. सर्व जातीच्या साधुसंतांनी भेदभाव, उच्चनीचपणा, श्रेष्ठकनिष्ठवृत्ती विसरून जाऊन पंढरीचा प्रसाद आणि काव्यदेवीची कुसुमे सारख्याच प्रेमाने उचलून घेतली. जातिभेद समाजाच्या धारणपोषणाला आवश्यक असला तरी जातिमत्सर हा समाजाला घातक आहे हे जाणून दैवी प्रेमाचा डाव चंद्रभागेच्या काठी मांडत असताना, विठूचा गजर करता करता, नामाचा झेंडा रोवून, त्या झेंड्याखाली भेदाचे, मत्सराचे भूत गाडून टाकले असल्याचे संतांनी दाखविले. प्रभूजवळ भेदभाव कसा असेल ? 'उंच नीच काही नेणे भगवंत। तुटे भावभक्ती देखोनीया। भगवंत सर्वांनाच जवळ करतो : फक्त त्याजबद्दल अनन्य भाव पाहिजे.' ही शिकवण संतांनी भागवत धर्माच्या झेंड्याखाली लोकांना दिली. रामदासांनी महाराष्ट्र भाषा, महाराष्ट्र धर्म - मृत हाडांनी देखील खडबडून जागे व्हावे - जीवंत व्हावे अशा पद्धतीने - आपल्या तेजस्वी वाणीने संपूर्ण महाराष्ट्र दुमदुमवून टाकला. स्वराज्यसंस्थापक, स्वराष्ट्राभिमानी, स्वधर्माभिमानी, स्वभाषाभिमानी अशा शिवरायाचे ते गुरू होते.

सर्व समाजात संतांनी एकोपा निर्माण केला. वैष्णवांचा झेंडा खांद्यावर घेऊन सर्व लोकांसह वारकऱ्यांचा मेळा काढण्यास सुरुवात केली. हा ऐक्याचा झेंडा चंद्रभागेच्या तीरावर हरिनामाच्या गजरात नाचविला आणि भेदाभेदाला जलसमाधी दिली. असे अलौकिक कार्य संतांनी केले. कोणीही यावे, विठ्ठलाच्या पायावर मस्तक ठेवून पुनीत व्हावे, असे प्रत्यक्ष परब्रह्माचे दर्शन घडवून देणारी ही पंढरी आहे. अशी प्रेमळ वागणूक मिळू लागली. सर्वांना मायेने वागविले, प्रेमाने कुरवाळले, ममतेने जवळ केले आणि पाठीवरून हात फिरविला गेला तर आजही सर्व मंडळी ईश्वरनिष्ठ बनल्यावाचून राहणार नाहीत, हे संतांच्या शिकवणुकीतील मर्म ध्यानात घ्यावे.

### संतांचा प्रेमळभाव

एकनाथ म्हणतात ' भक्ती म्हणजे सर्वाभूती। सप्रेम भजन युक्ती।' तुकोबाराय म्हणतात ' जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुले।... ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयी।' नाथ हाडाचे प्रेमळ, कष्टाने कावडीत वाहून आणलेली गंगा तहानेने तळमळणाऱ्या गाढवाच्या मुखात घालून त्या जगदात्म्याला संतुष्ट केले. आईपासून चुकलेले महाराचे पोर 'आई आई !' करत रडत असताना त्याला आपल्या कडेवर घेऊन त्याचे डोळे पुसून त्याचे समाधान केले. महारवाड्यात जाऊन त्याच्या आईकडे त्याला दिले. पितरांसाठी केलेले अन्न महारांना वाढून त्यांचा आत्माराम संतुष्ट केला. नाथांची हृदयाची श्रीमंती काही विलक्षण होती. त्यांनी स्पृश्यापृश्य उच्चनीच भाव पुसून टाकला. दिव्य भक्तीच्या अमृत संजीवनीने सर्व समाज एकत्र केला. संतांनी समतेचा प्रकाश सर्वत्र पसरविला. धर्म ऐक्याचा, समाज ऐक्याचा अरुणोदयाने सुरंजित झालेला प्रगतीचा भास्कर वर

आला. त्याच्या प्रकाशात महाराष्ट्राने आपले खड्ग सज्ज केले. त्या तीक्ष्ण खड्गाचे पाणी शत्रूला पाजले. स्वातंत्र्याचे निशाण गृह, देव आणि राज मंदिरावर फडकविले.

### उपसंहार

भेदाला गाडून टाकून भक्ती, भाषा, धर्म यांचा विशाल कोट परधर्म आणि परचक्र या उभयविध आक्रमणांविरुद्ध उभा केला. यावनी सत्तेच्या व धर्माच्या प्रचंड लाटेस परतवून लावण्यासाठी चिकाटीचा व शिकस्तीचा प्रयत्न केला. मनाची मशागत करून समाजाचे अंतःकरण एकाच भावनेने भारून टाकले. स्वधर्म, स्वभाषा, स्वराष्ट्र यांच्या अस्मितेच्या रज्जूने सर्वांची हृदये सांधली व अभेद्य तट बनविला. ही भूमिका संतांनी केली. भगवंताचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. चळवळीला प्रथम भगवंताचे अधिष्ठान लागते, तरच ती यशस्वी होते - समर्थ म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।' धर्मपुनरुज्जीवन व रक्षण हे संतांनी केले. समाजतटाला पडलेल्या भेगा बुजविल्या. या त्यांच्या भूमिकेवर स्वराष्ट्राची टोलेजंग इमारत संपूर्ण वैभवानिशी उभी राहिली.

### संतांचा संजीवनी मंत्र

भक्ती व भाषा, वासुदेव व वाग्देवी ही कोणत्याही एका धर्माची मिरासदारी नाही. कोणीही त्या अमृतत्वाचा यथेच्छ स्वाद घेऊ शकतो. असा अलौकिक पायंडा महाराष्ट्रातील संतांनी पाडला, त्याला खरोखर तोड नाही. उत्तुंग आदर्श, श्रेष्ठ नीतिमत्ता, बंधुभाव आदींनी संतमंडळी प्रभावित होती. त्यांनी आपले सारे जीवन ईश्वरनिष्ठा व जनसेवा यांतच घालविले. स्वतःच्या आचरणाने जनतेत कर्तव्याची जाणीव निर्माण केली व तिचे जीवन पार बदलून टाकले. भक्तीचा मार्ग चोखाळावयास लावला आणि पशुमानवातून देवमानवाकडे त्यांना नेले. सामान्य माणूसही भक्तीचा मार्ग अवलंबून देवत्वाप्रत जाऊ शकतो हे प्रयोगाने सिद्ध करून त्याच्या ठिकाणी आत्मविश्वास वाढविला. कर्म देवाची भक्ती म्हणूनच आचरावे, धर्म केवळ अभिमानावर सिद्ध होत नसून आचरणातून सिद्ध होतो. त्यासाठी स्वतःलाच बदलावे लागते. संतांनी अशा पद्धतीने स्वाभिमानी समाज बनविला. त्या समाजाला नवीन जोम दिला. कर्तव्याची जाण दिली. समानतेची भूमिका प्रस्थापित केली. मानव हा केवळ भौतिक संपन्नतेने मोठा होत नसून ईश्वरबुद्धीने जनसेवा करणे, त्यासाठी नीतिसंपन्न होणे यातून जीवनाचा विकास होतो, असे शिकविले. संतजनांचे आम्हावर अनंत उपकार आहेत. सातशे वर्षे लोटून गेली . ज्ञानोबापासून तुकोबापर्यंतची शिकवण आजही आम्हाला संजीवनी मंत्र देत आहे.

• • •

(पान क्र. २३ वरून)

### अफवा, प्रवाद; सुरचना व गोंधळ

तऱ्हेच्या प्रक्रिया सतत चालू असतात. अन्नघटकांपासून रेणुनिर्मिती होते व नको असलेल्या रेणूंचे विघटन होते. दोन्ही प्रक्रियांना मिळून चयापचय (Metabolism) म्हणतात. अशा रीतीने सुरचना व गोंधळाचे द्वंद्वच. म्हणजे प्रत्येक शरीरपेशीमध्ये ही रसायनांची जन्मजरामरणप्रक्रिया जनुकांच्या नियंत्रणाखाली सुरू असते.

कर्करोगात तरी काय होते ? जनुकांमधली सुरचना बिघडून गोंधळ वाढतो व त्यामुळे अशी पेशी शरीरविरोधी पेशीनिष्ठ स्वार्थी वर्तन करू लागते. अयनकारी किरण, रसायने इ. कर्करोगकारी घटक हे गोंधळ वाढवणारे आहेत हा काही योगायोग नव्हे. त्यातून कर्करोगाच्या मूळ भौतिक कारणांवर प्रकाश पडतो.

या लेखात वैचारिक प्रणालीतील विकृतींमध्ये अफवा, प्रवाद नियतकालिके या तात्कालिक माध्यम प्रक्रियांचा प्रामुख्याने विचार केला, व मानवी प्रदूषणाशी साम्य बघितले. सुरचना व गोंधळ हे भौतिक द्वैत उत्क्रांती, चयापचय व कर्करोग समजण्यासाठी महत्त्वाचे आहे हेही पाहिले. पुढील ९व्या लेखात विचारप्रणालींतील विकृतींचा विचार करून भाषा व संस्कृतीपर्यंत पोहोचू.

• • •

## श्री. मोहन पाठक

गेल्या महिनाभरात महाविद्यालय परिसरात लक्षात येतील असे ठळक बदल जाणवायाला लागले. एक तर गॅदरिंगचा मूड संपून परीक्षेचे वेध लागले त्यामुळे पडलेला फरक. ''वर्षभर मजा मारली, आता तरी घासायला हवे'' असे म्हणत विद्यार्थी मित्र अभ्यासाला लागलेले दिसत आहेत. प्रिलीम्स्, ॲन्युअल्सच्या आगमनाचे लागलेले आणि पर्यायाने एक्झाम टेन्शनचे दिवस महाविद्यालयाच्या पूर्वेस उगवणाऱ्या सूर्याबरोबर गतीने उगवायला लागले. महाराष्ट्रातल्या थंडीच्या लाटेनेही परिसर सुखावून टाकला आहे. सकाळी सकाळी ग्रंथालयाच्या रीडिंग हॉल मध्ये जाण्यापूर्वी चहाची लज्जत घ्यायला मित्रमैत्रिणींचे घोळके कँटीनकडे वळताना दिसतात, तर दुपारी ११॥ - १२ लाही, '' काय गारठा आहे नाही ... '' म्हणत चहा पिणाऱ्यांची गर्दी कँटीनभोवती घुटमळते आहे. अर्थात अशा थंडीतही पेप्सी वगैरे शीत पेये पिणारे बहाद्दर असतातच.

जाणवणारा दुसरा ठळक बदल म्हणजे कँटीन समोरून जाणाऱ्या रस्त्याने घेतलेला आकार. इतके दिवस खडी येऊन पडली होती आणि आता चांगला रुंद रस्ता आकार घेत आहे. रोलची ये जा, रोलरचा आवाज, होऊ घातलेल्या रस्त्याची सूचना देत असतो. या रस्त्याचे काम होताना एक मात्र फार छान झाले. आमच्या इमारतीमागील झाडे तोडली गेली नाहीत, तर रस्त्याने या वृक्षांचे अस्तित्व जपले. प्रवेशद्वाराचे (म्हणजे पूल रुंदीकरणाचे) कंपाउंड वॉलचे काम चालू आहे. हे सर्व पूर्ण होईल तेव्हा आमचा परिसर किती छान झालेला असेल याची चित्रे मनात तरंगत असतात.

### एक कार्यक्रम . . . महत्त्वाचा

आमच्या विद्याप्रसारक मंडळाने शैक्षणिक क्षेत्रात जे भरीव कार्य गेली साठहून अधिक वर्षे केले आहे त्याची दखल घेतली जावी असे मला नेहमी वाटायचे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ. धों. टिल्लू यांना मी ही कल्पना अनेकदा बोलून दाखविली. विद्या प्रसारक मंडळाच्या अतिशय बहुमोल सहकार्यातून , अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रेरणेमुळे व कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांच्या मार्गदर्शनामुळे ही कल्पना ग्रंथरूपाने साकार करण्याच्या आमच्या धडपडीचे बीज झाले व 'त्याचा वेलु गेला गगनावरी' हा विद्या प्रसारक मंडळाचा इतिहासग्रंथ सिद्ध झाला. या ग्रंथाच्या बरोबरीनेच कार्याध्यक्षांच्या आत्मचरित्राचे कामही पूर्ण झाले.




कुलगुरू प्रा. प्रधान यांचे स्वागत करताना
प्राचार्य सी. जी. पाटील

या दोन्ही ग्रंथांच्या प्रकाशनाचा हृद्य असा सोहोळा थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. आम्हा सर्वांचे प्रेरणास्थान असणारे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेला हा समारंभ अतिशय अविस्मरणीय बनला, या अत्यंत महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी मराठीतील ख्यातनाम लेखक, साहित्य संस्कृती मंडळाचे एक सदस्य श्री. रवीन्द्र पिंगे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी, हितचिंतक, शाळा, महाविद्यालयातील शिक्षक व या संस्थांचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अ. धों. टिल्लू यांनी केले. इतिहासग्रंथाबद्दलचे माझे मनोगत मी व्यक्त केले, तर आत्मचरित्राबाबतचे मनोगत श्री. करंदीकर यांनी व्यक्त केले. श्री. अशोक चिटणीस यांनी श्री. पिंगे यांचा परिचय करून दिला.

या दोन्ही ग्रंथांचे टाळ्यांच्या गजरात श्री.पिंगे यांनी प्रकाशन केले. आपल्या भाषणात या दोन्ही ग्रंथांच्या महत्त्वासंबंधात त्यांनी आपले विचार मांडले '' मंडळाने काय काम केले हे वीस वर्षांनीही कोणी विचारले तर त्याला हा ग्रंथ उपयोगी ठरणार आहे. या ग्रंथाला संदर्भमूल्य आहे.'' मराठीमध्ये झालेल्या चरित्रलेखनाचा व इतिहास लेखनाचा धावता आढावा त्यांनी घेतला.

या कामात सहकार्य करणाऱ्या सर्वांबद्दल पुष्पे देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्या प्रसारक मंडळाचे एक पदाधिकारी श्री. मा. गोखले यांनी ऋणनिर्देशाचे काम संभाळले. या आटोपशीर, सुनियोजित समारंभाचे शैलीदार सूत्रसंचालन प्रा. दामोदर मोरे यांनी केले.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

आमच्या महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८ जानेवारी रोजी संपन्न झाला. या समारंभासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य अशोक प्रधान यांना आम्ही आमंत्रित केले होते. प्राचार्य प्रधान या कार्यक्रमासाठी आलेले असतानाच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदी त्यांची निवड झाल्याचे घोषित झाले.

या समारंभाचे प्रास्ताविक व परिचय प्राचार्य सी.जी.पाटील यांनी करून दिला. तसेच त्यांनी महाविद्यालयाच्या गेल्या वर्षातील शिक्षणशिक्षणेतर उपक्रमांचा अहवाल सादर केला.

प्राचार्य प्रधान यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले, 'विद्यापीठातर्फे अनेक नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. महाविद्यालयांनी हे अभ्यासक्रम घेण्याकरिता पुढे आले पाहिजे. त्यातून अनेक प्रकारच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील' प्रसाधनशास्त्रातील पदविकेचा त्यांनी उदाहरणादाखल उल्लेख केला.

प्राचार्य प्रधान यांच्या हस्ते, विविध विषयात विशेषनैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली.

समारंभाचा समारोप डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी. म. सारंग यांनी आभारप्रदर्शन केले. श्री.श्री. वि. करंदीकर, कार्यवाह श्री. टिळू व अन्य पदाधिकारी, निमंत्रित, प्राध्यापक, प्राध्यापकेतर, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विशेष विनंती**

'दिशा' हे नियतकालिक विद्या प्रसारक मंडळाच्या व घटक संस्थांच्या दृष्टीने चालू केलेले आहे. यातील 'परिसर वार्ता' मध्ये मंडळाच्या शाळा, महाविद्यालये यातील सर्व लहानसहान समारंभांचे वृत्त देऊन आपल्या वाटचालीची नोंद करता येणार आहे. तेव्हा सर्व घटक संस्थांना, संस्थाप्रमुखांना 'दिशा' तर्फे मी विनंती करतो की आपल्या घडामोडींचा तपशील माझ्याकडे पाठवा, म्हणजे त्याची संकलित वृत्तलेखात मांडणी करणे मला सोयीचे होईल. आपला मजकूर कृपया दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत पाठवावा.

• • •

## SEMINAR ON

Sir/Madam,

## SPORTS AND PASTIMES IN ANCIENT INDIA

I have great pleasure in inviting you to participate in the forthcoming seminar organised by the Institute for Oriental Study, Thane, on the subject, " SPORTS AND PASTIME IN ANCIENT INDIA", to be held on, Saturday, the 26th April 1997, at Thane.

Indian contribution in the fields of language and grammar, philosophy, polity, fine and performing arts, architecture, physical sciences and spirituality is wellknown.

Indians also have their own contribution to the science of sports and recreation in the society. However, as in other branches of learning, Indians have a distinctly different outlook about this field of human activity. The Encyclopedia Britannica says, " history of sports and games is a part of the history of the man, as a social animal, his inter-relations with other individuals and groups, his civilisation and culture and specially his play". For Indians " sport" did not mean only bodybuilding or individual excellence at any cost, but it was an individual and collective exercise for the satisfaction of both. There was an integrated and holistic approach to body, mind and nature. A sound body was a pre-condition for cultural, spiritual and intellectual education. Altekar A. S. ( Educational system of ancient India, Varanashi, 1934) has speculated that the gymnasium, swimming pools and grounds for military exercises were a part of Indian Royal schools. Kantawalla S. G. ( Cultural History from Matsya Purana, Baroda, 1964 ) on the Matsya Purana noticed hunting, water-sports, pleasure sports on mountains, games of balls, visits to gardens and garden tanks, and swings as popular games and pastimes. Agrawal V. S. ( India as known to Panini, Lukhnow, 1953) finds mention of Wrestling, Dice, Jousts, Garden pastimes, Hunting etc. and also terms related to sports like Krida and Akridi for sportsmen. Mansollasa of King Someshwar, a manuscript of 11th / 12th century describes about 40 sports and pastimes enjoyed by the King in the company of Royal harem. The epics, Ramayana and Mahabharat are rich in descriptions of sports and past-times. Scholars like Phadake A. S. ( Sports and games as referred to in Sanskrit literature, Varanashi, 1938 ) and Tribidnath Ray, ( The indoor and outdoor games in ancient India, Calcutta 1939 ) have done some pioneering work in this field. We have also rich archaeological evidence. However epigraphic sources need a detailed survey. A fresh look at the Sanskrit and prakrit literature will provide a rich mine of information about this subject.

Today Sports exhibits highest human efforts and excellence, but it has been frighteningly encroached upon by technology. It is also getting increasingly dependent upon moneypower. As a result, very few can really participate in this activity. Competition is very important for the game, but this must be for improving individual and team excellence, and not as an end goal. If we connive at this aspect of competition, dangerous and un-natural tendencies creep in. The use of drugs seen now, is one such tendency. It not only distorts spirit of sports but also destroys the sportsman. Due to distinctly different outlook towards life we, find absence of such tendencies in ancient Indian Sports and Pastimes. For a correct understanding of Indian psyche and lifestyle we have to purge ourselves of all western and ideological bias. Inspection of history of sports and past-time with this view in our mind will help rediscover methods of sports and pastimes as practiced in ancient India, which are simple and not complex, economical and not expensive, meant for all and not for exclusive few, and accommodative to all ages and sexes, suitable to all climates and geographical variations. I hope this seminar will help us to have a new insight in the history of sports and pastime in ancient India.

Yours faithfully.

V. V. Bedekar

**Address for all correspondence :**
Dr. Vijay V. Bedekar
"Shivashakti" , Dr. Bedekar's Hospital, Maharshi Karve Marg, Naupada, THANE (W) -400 602. (India).
Phones : 5421438, 5423260, 5424518.

### Seminar Details

**Subject :** **Sports and Pastime in Ancient India.**
**Date :** **Saturday the 26th April 1997.**
**Time :** **9.00 a. m. onwards**

# SYMPOSIUM
# ON
# RELEVANCE OF ISO 9000
# TO EDUCATION

## PREAMBLE

It is widely recognized that to be able to meet demands of the 21st century, education in terms of its contents and delivery systems needs restructuring and revamping. Probably , as industries are going through process of liberalization, little more freedom and autonomy in education may be of great help. However, freedom calls for selfimposed quality standards. On this background it is pertinent to evaluate usefulness of ISO9000 and other quality management systems in context of education.

To initiate the above process, a symposium will be held on Saturday 1st March 1997 at Thorale Bajirao Peshawe Sabhagriha, Thane. In this symposium, eminent personalities associated with education, and senior executives from industries conversant with modern management systems will share their views on the subject, with the participants of the symposium.

Heads of educational institutions, their management representatives, teachers with flair for doing something extra, and industry's HRD managers who are concerned about our education system for their human resources, are invited to participate. The symposium will cover topics like Overview of ISO9000, Total quality management in service sector, and present status and improvement opportunities in quality of education. To arrive at something concrete at the end of the day , a panel discussion will be held in the last session of the symposium.

## REGISTRATION

Delegates interested to participate in the symposium should contact Dr. Atul Bedekar or Prof. V. S. Burkule, Department of Chemistry, B.N. Bandodkar College of Science, Thane. Registration fee per delegate is Rs. 200/- which will include tea, lunch and other material to be given during the symposium.

**Day and Date :** Saturday, 1st March 1997.

**Time :** 9.00 a. m. to 5.00 p.m.

**Venue :** Thorale Bajirao Peshawe Sabhagriha,
Thane College Campus,
Chendani Bunder, Thane - 400 601.

(मलपृष्ठ क्र. २ वरून)

### ऐ मेरे वतनके लोगो...

घराणेशाही आणि एकाधिकारशाहीमध्ये 'पात्रता' आणि 'प्रामाणिक' पणाचा बळी दिला जातो. आपले पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची मुलगी, नातवंडे, बहिणी, इतर नातेवाईक आणि नातेवाइकांचे नातेवाईक यांना या देशातील सर्व उच्च पदे विनासायास मिळाली. तत्कालीन भारतात त्यांच्या या नातेवाइकांपेक्षा अधिक बुद्धिमान आणि पात्र नागरिक या देशात नव्हते असे नाही, परंतु नेहरू घराण्यात जन्मण्याचा अपघात त्यांच्या बाबतीत घडला नव्हता. 'राष्ट्रहिताला फाटा आणि कुटुंबहिताला वाटा' हा न्याय आजतागायत चालू आहे. रावांची मुले खासदार, आमदार तर आहेतच; पण भ्रष्टाचारातही ती पुढे आहेत. देवेगौडांचा मुलगाही खासदार आहे, व त्यांचे सर्व नातेवाईक परदेशदौऱ्यात त्यांच्या बरोबर असतातच. राज्यसभेवर राजकारणाव्यतिरिक्त इतर कला, साहित्य इ. मध्ये विशेष निपुण व्यक्तींची नियुक्ती पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार राष्ट्राध्यक्ष करतात. आपले सध्याचे पंतप्रधान श्री. देवेगौडा यांनी हे सर्व निकष धाब्यावर बसवून राजकीय तडजोडीचा एक भाग म्हणून सहा 'राजकारण्यां'ची राज्यसभेसाठी राष्ट्राध्यक्षांकडे शिफारस केली आहे. काही अपवाद वगळता; मंत्री, न्यायाधीश, महामंडळे व बँकांचे अध्यक्ष यांच्या नेमणुका त्यांच्या पात्रतेपेक्षा, मेहेरबानी, सिद्धांतवाद आणि राजकीय सोय हे निकष डोळ्यासमोर ठेवूनच स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षांत झालेल्या आहेत. यातूनच मोठ्या प्रमाणावर 'अकार्यक्षम' नोकरशाही तयार झाली. ही अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार झाकण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांची सवलतकेंद्री धोरणे राबू लागली. धापा सोडून जगात 'फुकट' काहीच मिळत नाही. लोकांना 'मूर्ख' बनविण्याचा हा खेळ स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजपर्यंत अव्याहतपणे चालू आहे. फक्त त्याचे स्वरूप आधी व्यक्तिगत होते ते आज सार्वत्रिक झाले आहे. पात्रतेला जिथे दुय्यम स्थान असते तिथे अपात्र पहिल्या स्थानावर येऊन बसतात. पात्र व्यक्तीला नीती, संयम आणि चारित्र्य यांची बंधने असतात. अपात्र मात्र या बंधनांतून मुक्त असतो. साहजिकच चारित्र्यहीनता कशी वाढेल हेच अपात्र बघत असतो. शिक्षित अपात्रांपेक्षा अशिक्षित पात्रच स्वातंत्र्य टिकवू शकतील. ज्या राष्ट्रात शिक्षण 'असंस्कृत' शिक्षित निर्माण करते तेथे दूरदर्शनवरून अशी गाणी वारंवार ऐकावी लागतात. भारत याला अपवाद ठरो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

•••


## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा उपलब्ध,

प्रसन्न नैसर्गिक वातावरण, उपाहाराची व्यवस्था

संपर्क

कार्यवाह, विद्याप्रसारक मंडळ, ठाणे

दूरध्वनी : ५४२ ६२७०

## वाढत्या खर्चाला हवे वाढते उत्पन्न
## आमच्याकडे ठेव ठेवून व्हा सम्पन्न

### आकर्षक व्याज दर

# १५%

**मुदत ठेव**

| ठेवींची मुदत | व्याज दर |
|---|---|
| ३० दिवस ते १ वर्ष | १०.५% |
| १ वर्षावरील २ वर्षापर्यंत | १५ % |
| २ वर्षावरील | १४ % |

**६२ महिन्यांत दामदुप्पट**

**पुनर्गुंतवणूक ठेव योजना**

| ठेवींची मुदत | लाभ |
|---|---|
| १२ महिने | १०.९२% |
| २४ महिने | १७.१३% |
| ३६ महिने | १७.०४% |
| ४८ महिने | १८.३५% |
| ६० महिने | १९.८०% |

त्वरित व तत्पर सेवेसाठी 'भारत ध्वनी' व 'भारत मुद्रा' योजनांचा लाभ घ्या.

भारत ध्वनी

( TELE BANKING )

भारत मुद्रा

भारत सहकारी बँक लि. ठाणे

( BTM )

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत संपर्क साधा.

## भारत सहकारी बँक लिमिटेड,

'शततारका', बाजीप्रभू देशपांडे मार्ग, विष्णुनगर, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२९४३२/३३, ५३३५२३७, ५३४६२६७, ५४२९४३१